म. ग्रं. सं. ठाणें
ग्रंथ काव्य
२०४१.
९२

काव्य

व पाठ करण्याकारितां

# समर्थबोधरत्नमाला

अथवा

## बालदासबोधमाला.

यादव शंकर वावीकर

यांनीं समर्थांचे ग्रंथ शोधून गुंफिली.

REFBK-0000796
REFBK-0000796

१९१२

किंमत सहा आणे.

मुलामुलींना मनन व पाठ करण्याकरितां

# समर्थबोधरत्नमाला

अथवा

# बालदासबोधमाला.

यादव शंकर वावीकर

यांनीं समर्थांचे ग्रंथ शोधून गुंफिली.

शहाणे करावे जन । पतित करावे पावन ।
सृष्टीमध्यें भगवद्भजन । वाढवावें ॥

दास० १४-७-३३

सन १९१२

किंमत सहा आणे.


शब्द
निस्पृह
निस्पृहता
सत्वगुणल
विरक्त लक्ष
सन्मार्ग बो
विवेक
ज्ञा
कवि ..
कवित्व ...
ग्रंथ... ...
गुरु... ...
सद्गुरु महिमा
सद्गुरु सेवा
शिष्य .
श्रवण .
श्रवण आणि



REFBK-0000796
ग्रंथसंग्रहालय ठाणे

मुद्रक–रा. रा. चिं. स. देवळे, यांनीं मुंबईवैभव
स्टीम प्रेस ५४ कांदेवाडी, नं. ४ मुंबई येथें छापिलें.

प्रकाशक.—रा. रा. यशवंत महादेव वावीकर यांनीं
झावबाचीवाडी चाळ नं. ३८ मुंबई येथें प्रसिद्ध केलें.

(हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजि
करून सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यानें आपणाकडे ठेविले आहेत

# अनुक्रमणिका.


प्रास्ताविक दोन शब्द ... १
चरित्र ... ... ... ४

**नीति-प्रकरण १ लें.**

संगति ... ... ... १७
सत्संग ... ... ... १८
संत ... ... ... ... १९
अभिमान ... ... ... २०
चित्तशुद्धि ... ... ... २१
आयुष्य सद्व्यय ... ... २२
शब्द आणि क्रिया ... २३
निस्पृह लक्षण ... ... २४
निस्पृहता ... ... ... २५
सत्वगुणलक्षण ... ... २६
विरक्त लक्षण ... ... २७
सन्मार्ग बोध ... ... २८
विवेक ... ... ... २९

**ज्ञान-प्रकरण २ रें.**

कवि ... ... ... २९
कवित्व ... ... ... ३१
ग्रंथ... ... ... ... ३२
गुरु... ... ... ...३३-३४
सद्गुरु महिमा ... ... ३५
सद्गुरु सेवा ... ... ३६
शिष्य ... ... ... ३७
श्रवण ... ... ... ४०
श्रवण आणि मनन ... ४२
मनन ... ... ... ४२
ज्ञानार्जन ... ... ... ४३
अभ्यास ... ... ... ४३
नित्यनेम ... ... ... ४४
एकान्त ... ... ... ४५
संशय ... ... ... ४५
निश्चय ... ... ... ४६
प्रचीति अथवा अनुभव ... ४६
कल्पना ... ... ... ४७
विवेक आणि वैराग्य ... ४८

**व्यवहार-प्रकरण ३ रें.**

आळस ... ... ... ४९
दक्षता ... ... ... ५०
उद्योग ... ... ... ५१
व्यवहारज्ञान ... ... ५१
चातुर्यलक्षण ... ... ५२
जाणतेपण... ... ... ५५
सदैव लक्षण ... ... ५७
उत्तम लक्षण ... ... ५८
उत्तमपुरुषलक्षण ... ... ६०
महंत लक्षण ... ... ६१
गृहस्थाश्रम... ... ... ६३

**बोधप्रकरण ४ थें.**

नरदेह ... ... ... ६६
दुश्चित्तपण ... ... ६६
कुबुद्धि ... ... ... ६६

कुविद्यालक्षण ... ... ६७
करंट लक्षण ... ... ६८
मूर्ख लक्षण... ... ... ६९
पढत मूर्ख ... ... ... ७१
बद्ध अथवा अविवेकी जन ७३
प्रत्ययनिरूपण ... ... ७४
सारशोधन ... ... ... ७६
**मुलांस उपदेश** ... ... ७७

**परमार्थ प्रकरण–५ वें.**

प्रपंच आणि परमार्थ ... ७८
क्षणभंगुर जग ... ... ८०
मायाजाल ... ... ... ८१
आत्मज्ञान... ... ... ८२
साधक ... ... ... ८३
मुमुक्षु ... ... ... ८४
श्रद्धा ... ... ... ८५
भक्ति निरूपण ... ... ८७
नवविधा भक्ति ... ... ८८
(१) श्रवण (२) कीर्तन
(३) स्मरण (४) पादसेवन
(५) अर्चन (६) वंदन
(७) दास्य (८) सख्य
(९) आत्मनिवेदन
देवाविषयीं विविध कल्पना ९३
देव ... ... ... ... ९५
ईश्वराची अतर्क्य शक्ति ... ९६

**प्रकरण ६ वें**

मनाचे श्लोक ... ... ९७

**प्रकरण ७ वें.**

**स्फुट अभंग.**

प्रपंच ... ... ... १०६
सोवळें ओवळें ... ... १०६
चित्तशुद्धि ... ... १०७
कल्पना ... ... ... १०८
मन ... ... ... १०८
माया ... ... ... १०८
लोकाचार ... ... १०९
ज्ञान ... ... ... १०९
सत्संगति... ... ... ११०
कुसंगति ... ... ... ११०
सज्जन ... ... ... १११
क्रोध ... ... ... ११२
मत्सर ... ... ... ११२
दंभ ... ... ... ११३
करुणापर अभंग... ... ११३
उपदेशपर अभंग ... ११५
**करुणाष्टकें** ... ... ११७
**अमृत तुषार** ... ... ११९
**कठीण शब्दांचा कोश** १२२
**शुद्धिपत्र** ... ... १३०

श्रीरामदासस्वामी समर्थ.



# प्रास्ताविक दोन शब्द.

मराठी कविवर्य साधुश्रेष्ठांच्या अमृत वाणीचा लाभ मुलामुलींना घडावा, त्यांच्या कोमल मनावर त्या वाणीचा अखंड व उत्तम ठसा वठावा, या हेतूनें मी तुकारामाचे निवडक **अभंग** अथवा **बालगाथा** हें पुस्तक तयार केलें व तोच हेतु मनांत बाळगून समर्थांच्या ग्रंथांचें मंथन करून ही **समर्थबोधरत्नमाला** तयार केली आहे. ही रत्नमाला मुलामुलींनीं कंठीं धारण केल्यास ती त्यांना भूषणावह होईल इतकेंच नाहीं तर, तिजपासून त्यांच्या मनावर सुपरिणाम होऊन तीं सुशील, कर्तव्यदक्ष, व विचारवंत निपजतील; त्यांचें वर्तन अनुकरणीय होईल. ज्याप्रमाणें साधु जपमाळ हातीं घेऊन भगवच्चिंतन करितात, त्याप्रमाणें मुलांकरितां ही लघुचिंतनिका होय. शाळांतील क्रमिक पुस्तकांवर मुलें फारसा विचार करीत नाहींत किंवा पुढें जीं विविध प्रकारचीं पुस्तकें त्यांच्या वाचण्यांत येतात, त्यांतील रहस्याकडे तीं फारसें लक्ष देत नाहींत. त्याप्रमाणें हें पुस्तक केवळ वाचण्याचें नसून त्यावर वारंवार मनन केलें पाहिजे व त्यांतील कित्येक उपयुक्त भाग तर पाठ केले पाहिजेत. व त्याप्रमाणें वागण्याचा निश्चय केला पाहिजे.

समर्थ एकान्तप्रिय असल्यामुळें विचारवंत होते. तसेच ते मर्मज्ञ व मितभाषणी असल्यामुळें त्यांच्या थोड्या शब्दांत विशेष अर्थ असे. याची साक्ष त्यांच्या ग्रंथांवरून पटत आहे. त्यांनीं व्यावहारिक गोष्टींविषयीं जेवढा उपदेश केला आहे, तेवढा कोणीही प्राचीन मराठी कवींनीं केलेला नाहीं. त्यांची ग्रंथरचना स्वतंत्र आहे. ते प्रवृत्तिमार्गाचे मोठे भोक्ते होते. त्या काळच्या स्वामीपंचायतनांत त्यांना विशेष मान असे. शिवाजीसारखे राजे

त्यांच्या शिष्यशाखेंत असल्यामुळें त्या काळचे अनेक राजकारणी पुरुष त्यांच्या शिष्यमंडळांत असत. महाराष्ट्रांत ते महापुरुष समजले जात असत. त्यांचें वैराग्य, निस्पृहता व बाणेदार वर्तन पाहून सर्वांच्या मनांत त्यांच्याविषयीं वचक व आदरबुद्धि उत्पन्न होत असत. अशा नरश्रेष्ठास समर्थ पदवी मिळावी, हें उचितच होय! नामदेव व ज्ञानेश्वर यांनीं पंढरपूरचा वारकरी पंथ स्थापन केला व तो आज तागायत चालू आहे. तसाच समर्थांनीं नवीन धर्तीवर रामदासी पंथ स्थापन केला असून महाराष्ट्र, तंजावर, मध्यप्रांत इ. ठिकाणीं या सांप्रदायाचे मठ स्थापन केले होते. हल्लींही हा सांप्रदाय थोडाफार अस्तित्वांत आहे.

अशा श्रेष्ठ पुरुषानें ज्या ग्रंथांत आपलें हृद्गत ओतिलें आहे, तो दासबोध ग्रंथ ह्मणजे रामदासी लोकांची गीता होय. माझ्या पश्चात् मजशीं भाषण करणें असेल तर दासबोध ग्रंथ वाचा, असें खुद्द समर्थांनीं शिष्यवृंदास सांगितलें. यावरून हा ग्रंथ किती वाचनीय असेल, याचा वाचकांनीं विचार करावा.

समर्थांचे सर्व ग्रंथ पाहून मुलांमुलींना वाचण्यास व पाठ करण्यास अत्यंत उपयुक्त असे जे भाग दिसले, त्यांचा यांत विषयवार संग्रह केला आहे. ठिकठिकाणीं भरपूर टीपा देऊन शेवटीं कठिण शब्दांचा कोश दिला आहे. तो मुलांनीं एकदां साधारण पाठ केला असतां त्यांना बहुतकरून कोणताही कठिण शब्द अडणार नाहीं, अशी आशा आहे.

रा. देव यांनीं जी दासबोधाची (कल्याणस्वामींनीं लिहिलेली) शुद्ध प्रत छापिली आहे, तीतून या पुस्तकांत पाठ घेतले असून ते इतर कांहीं प्रतींशीं ताडून पाहिले आहेत.

मुलांमुलींना पाठ करण्यास योग्य अशा व्यावहारिक व नैतिक बोधास यांत प्राधान्यस्थळ दिलें असून व्यापक व सर्वसामान्य असे धार्मिक विचारांचे भाग यांत ग्रथित केले आहेत. काव्यदृष्टीनें अभ्यास करण्यास हें पुस्तक योग्य

असून यापासून रामदासांच्या कवितेची थोडक्यांत चांगली ओळख होईल. शाळाखात्यांत कवितेच्या अभ्यासाकरितां नवनीताप्रमाणें हें पुस्तक चालू केल्यास मुलांना रामदासाच्या कवितेची ओळख होऊन त्यांच्या ग्रंथांतील उत्तमोत्तम व बोधपर अशा विविध वेंचांचा त्यांना अनायासें परिचय होईल. सारांश भाषापरिज्ञान व नैतिक बोध असा दुप्पट लाभ विद्यार्थ्यांना या पुस्तकापासून सहज होईल. शाळाखात्यांत या पुस्तकाचा प्रवेश व्हावा, अशी लेखकाची इच्छा असून त्याच धोरणानें पुस्तकाची रचना करण्यांत आलेली आहे.

शाळाखात्यांत पुस्तक मंजूर होईल कीं नाहीं, हें आज सांगतां येत नाहीं. तथापि धार्मिक व नैतिक शिक्षणाकरितां खाजगी शाळांत, अनाथबालाश्रमांत, विद्यार्थीवसतिगृहांत हें पुस्तक चालू करतां येण्यासारखें आहे. ज्यांच्या ताब्यांत अशा संस्था आहेत ते ग्रंथकर्त्याचा हेतु सफळ करतील, अशी आशा आहे. मुलांच्या धर्मशिक्षणाची सोय प्रत्येक घरांतून झाली पाहिजे. हल्लीं मुलांमुलींना धर्मशिक्षणाचा गंधही नसल्यामुळें तीं उच्छृंखळ व आचारहीन निपजत आहेत. ही घातक हेळसांड सर्वत्र चालू असून तिचे दुष्परिणाम आपण प्रत्यक्ष पहात आहों. ही अनिष्ट स्थिति घालविण्यास वडील मंडळींनीं मुलांना जवळ घेऊन असलीं पुस्तकें त्यांना समजावून दिलीं पाहिजेत. तीं त्यांच्याकडून पाठ करवून घेतलीं पाहिजेत. मुलामुलींना चांगल्या प्रकारचें गृहशिक्षण, धर्मशिक्षण व व्यावहारिक शिक्षण देऊन त्यांना सन्मार्गास लावणें, यासारखें पवित्र कर्तव्य नाहीं व तें आमची मंडळी लवकर करूं लागतील अशी आशा आहे.

मुंबई. ता. २।१०।११. ग्रंथकर्ता.

## रामदासांचें संक्षिप्त चरित्र.

अल्लाउद्दीन खिलजीच्या स्वारीमुळें व दुष्काळामुळें दौलताबाद प्रांत उध्वस्त झाल्यावर कांहीं लोक स्वसंरक्षणार्थ गंगाकिनारीं रहावयास गेले. त्यांत **कृष्णाजीपंत ठोसर** जामदग्न्य गोत्री देशस्थ आश्वलायन ब्राह्मण आपल्या मुलामाणसांसह गेले होते. त्यांचे कुळांत **दशरथपंत** ह्यांनीं कुळकर्णपणाची वृत्ती संपादन करून **जांबगांवीं** वस्ती केली. त्यांचे वंशज **सूर्याजीपंत**. हे स्वभावानें सात्विक व मोठे ईश्वरभक्त होते. कुळकर्ण्याचें काम करून बाकीचा वेळ हे भजन पूजनांत घालवीत असत. त्यांची बायको **राणुबाई** ही सात्विक वृत्तीची व महान्‌पति-व्रता होती. त्यांना पुष्कळ वर्षेंपर्यंत संतती नव्हती. पुढें ईश्वरकृपेनें दोन पुत्र शके १५२७ व १५३० सालीं झाले. वडील मुलाचें नांव **गंगाधर** व धाकट्याचें नांव **नारायण**. वडील मुलास सूर्याजीपंत **श्रेष्ठ** ह्मणत असल्या-मुळें त्याचें नांव **श्रेष्ठ** असें पडलें. हे रामउपासक असून यांनीं **भक्तिरहस्य** नामक ग्रंथ लिहिला आहे. यांचे कांहीं अभंग वगैरे प्रसिद्ध आहेत. त्यांत त्यांनीं आपणांस **रामीरामदास** असें नांव धारण केलें आहे.

**कुलवृत्त.**

**नारायण** लहानपणापासून बुद्धिमान्, चंचल व धाडसी असे. झाडावर चढण्यांत, खेळण्यांत, पोहण्यांत व खोड्या करण्यांत तो पटाईत असे. **नारायण** सात वर्षांचा असतांना **सूर्याजी-पंतांचा** काळ झाला. यामुळें संसाराचा सर्व भार **राणुबाई** व **गंगाधर** यांजवर पडला. **राणुबाईनें नारायणाचा** व्रतबंध केला. दोन्ही मुलांचा संभाळ करून **राणुबाई** मोठ्या दक्षतेनें प्रपंच चालवीत होती. **श्रेष्ठाचें** लग्न केल्यावर **नाराणाच्या** लग्नाची तिला काळजी लागली. तिला वाटे कीं, **नारायणाचे** असेच दोहोंचे चार हात होऊन तो संसार करूं लागला कीं, आपण कृतकृत्य झालों ! साहाजिकच **नारायणाच्या** लग्नाच्या गोष्टी घरीं व शेजाऱ्यापाजाऱ्यांपाशीं काढी. मुलींचा शोध करी. त्या गोष्टी

**बाळपण.**

 ८/०५

कानीं पडतांच नारायणाची तळची आग मस्तकांत जात असे. एकदां अशा गोष्टी घरीं फार वेळ चाललेल्या पाहून नारायणाचा संताप झाला. तो रानांत जाऊन उंच अशा एका झाडावर बसला व कोणी समजूत करण्यास आला कीं, त्याला दगड मारूं लागला. शेवटीं ती वृद्ध मातुश्री व श्रेष्ठ गेले व त्यांनीं खालून ओरडून नारायणाची अनेक प्रकारें समजूत घातली व त्याला घरीं आणलें. पुनः अशीच लग्नाची वाटाघाट ऐकतांच गंगातीरीं एक गगनचुंबित वटवृक्ष होता, त्यावर तो जाऊन बसला. तेव्हां घरचीं मनुष्यें पुनः तेथें जाऊन विनवण्या करूं लागलीं. त्या ऐकून त्याला एवढा त्रास व वैताग आला कीं, त्यानें तेथून एकदम खालील डोहांत बुडी मारली. दुर्दैवानें तेथें खडक होता त्यावर त्याचें कपाळ आपट-ल्यामुळें टेंगुळ आलें व तें पुढें जन्मभर तसेंच राहिलें. या गोष्टीस कांहीं दिवस गेल्यावर पुनः त्या ममताळु आईनें लग्न करण्या-विषयीं नारायणाचें मन वळविण्याचा प्रयत्न चालविला. शेवटीं, 'अंतरपट धरींपर्यंत तरी मी नाहीं ह्मणणार नाहीं' असें वचन त्या भाबड्या ह्मातारीनें जेव्हां नारायणापासून घेतलें, तेव्हां त्या ममता-ग्रस्त झालेल्या आईस मोठा आनंद झाला ! तिनें लवकरच लग्नाचा बेत जुळवून आणिला. नवरी मिळाली. साहित्य झालें. वऱ्हाडी मंडळी जमली. सर्व आनंदी आनंद झाला. परंतु इकडे नारायण मात्र उद्विग्न असून कोणांशीं कांहींच बोलेना. असें होतां होतां लग्न घटका आली. बायका-पुरुषांची गर्दी झाली. लग्नमंडपांत नवरानवरी सन्मुख उभीं करून मध्यें अंतरपट धरण्यांत आला. त्यांवर मंगल आशीर्वादयुक्त अक्षतांचा वर्षाव चालू झाला. भिक्षुक मंगळाष्टकें ह्मणूं लागले. वाजंत्री वाद्यांचा घोष करण्याची व मांडवांत शिष्ट लोक लग्नटाळी वाजविण्याची वाट पहात होते. भटांनीं शुभलग्न सा-व-धा-न असे शब्द उच्च स्वरानें उच्चारून सर्वांना सावचित्त केलें. इतक्यांत नवरदेवानें लग्नमंडपांतून धुम पळ काढला

आणि गांवाबाहेर गंगानदीकिनारीं पिंपळाच्या ढोलींत जाऊन तो दडून बसला. हें काय विघ्न आलें असें म्हणत लग्नास जमलेली मंडळी वरामागें धांवत सुटली. परंतु त्याच्या वायुगतीपुढें कोणाचाच टिकाव लागला नाहीं. नारायण तीन दिवसपर्यंत त्यां ढोलींत लपून बसला होता. वरानें लग्नमंडपांतून पळ काढल्यापासून घरीं एकच हाहाःकार उडाला ! नवरी घरीं परत गेली. त्या मुलीचें दुसरें लग्न करण्यास हरकत नाहीं, असें ब्राह्मणांनीं शास्त्राधार काढले. घरांतील मंडळी नद्या, तळीं, विहिरी, जंगलें शोधण्यास निघाली. शोध करतां करतां पिंपळांतील ढोलींत नारायण बसला आहे, असें समजलें. तेव्हां श्रेष्ठ व मातुश्री तेथें गेलीं व त्यांनीं कबूल केलें कीं, "आह्मी पुन्हां तुझ्या लग्नाच्या भानगडींत पडणार नाहीं. झालें तें झालें. खालीं. ये." आईपासून व भावापासून असें वचन घेतल्यावर नारायणाची स्वारी खालीं आली.

**विरक्ती.** घरीं आल्यावर सर्वांनीं नारायणाशीं बोलण्याचें टाकिलें. त्यानेंही सर्वांशीं बोलणें वर्ज्य केलें असून तो उदासवृत्तीनें राहूं लागला. त्याच्या भावी चरित्रक्रमाचा हाच प्रारंभ होता. याप्रमाणें वैराग्यवृत्तीनें कांहीं दिवस राहून आईस व श्रेष्ठास नमस्कार करून तीर्थयात्रेचें निमित्त करून ही बालस्वारी जी घराबाहेर पडली ती तडक नाशिक पंचवटीस गेली. तेथें श्रीरामचंद्राचें दर्शन घेऊन तेथून अर्ध कोसावर गंगातीरीं टाकळी नामक गांव आहे, तेथें जाऊन तपश्चर्येस प्रारंभ केला. पहाटेस उठून नित्यविधी आटोपून स्नान करावयाचें व गंगाप्रवाहांत कंबरभर पाण्यांत उभें राहून जप व ध्यान करावयाचें, नंतर पंचवटींतून मधुकरी मागून आणून ती श्रीरामचंद्रास समर्पण केल्यावर खावयाची, दुपारीं अध्ययन, ग्रंथावलोकन व मनन करावयाचें व रात्रौ ईश्वरचिंतन व भजन करावयाचें. याप्रमाणें बारा वर्षें पुरश्चरण झाल्यावर त्यांना 'कृष्णातीरीं जाऊन जगदुद्धार करावा' असा दृष्टान्त झाला !

टाकळीस उद्धव गोसावी नामक शिष्यास ठेवून रामदास तीर्थयात्रेस निघाले. त्यांना प्रवासाची फार आवड असे. पायांत खडावा,

**तीर्थयात्रा.** शिरीं जटाभार, अंगांत भगवीं वस्त्रें, काखेंत कुबडी व हातांत स्मरणी अशा वेषानें निघून ते काशी, अयोध्या, गोकुळ, वृंदावन, बदरीनारायण, हिमालय, जगन्नाथ, मथुरा, द्वारका, मल्लिकार्जुन, गोकर्ण, रामेश्वर, पंढरपूर इत्यादि अनेक क्षेत्रें करून पुनः पंचवटीस परत आले. प्रवासांत त्यांनीं अनेक सत्पुरुषांच्या व विद्वानांच्या भेटी घेतल्या; समाज स्थितीचें अवलोकन केलें. धर्मविषयांवर चर्चा केली व मठ स्थापन केले. पंचवटींत कांहीं दिवस राहून पूर्वीं दृष्टांत झाल्याप्रमाणें ते पुनः कृष्णातीरीं जाण्यास निघाले.

वाटेनें जातांना आपल्या वृद्ध मातोश्रीचें एकदा दर्शन घ्यावें अशी इच्छा झाल्यावरून ते घरीं गेले. राणूबाई आतां वृद्ध झाली

**मातृदर्शन.** असून डोळ्यांनीं तिला दिसेनासें झालें होतें. माझा नारायण मला आतां कधीं तरी भेटेल काय, ही तिला रात्रंदिवस चिंता लागली होती. एके दिवशीं म्हातारी ओटीवर बसली असतांना 'जयजय रघुवीर समर्थ' अशी कोणी भिकाऱ्यानें उच्चस्वरानें आरोळी ठोकली.तेव्हां म्हातारी म्हणाली 'मुली दारीं कोणी भिक्षेकरी आला आहे. त्यास भिक्षा घाला.' मुलगी भिक्षा घेऊन येते, तोंच गोसावी वर आला आणि म्हातारीपाशीं जाऊन म्हणाला, 'भिक्षा घेऊन जाणारा हा गोसावी नव्हे.' हे शब्द कांनीं पडतांच 'बाळा नारायणा तूं केव्हां आलास?' हें वाक्य सद्गद वाणीनें तिच्या तोंडून निघालें ! तिच्या अंगावर रोमांच उभे राहिले व नेत्रांतून अश्रुधारा चालल्या ! समर्थांनीं आईस साष्टांग नमस्कार केला. तिनें त्याचें मस्तक हुंगलें व त्यांस पोटाशीं धरलें. तिचा आनंद गगनांत माववेना ! इतक्यांत श्रेष्ठही येऊन भेटले. नंतर समर्थ कांहीं दिवस घरीं राहिले. पहाटेस उठून गंगेवर स्नान करून नित्य-नैमित्तिक

आणि गांवाबाहेर गंगानदीकिनारीं पिंपळाच्या ढोलींत जाऊन तो दडून बसला. हें काय विघ्न आलें असें म्हणत लग्नास जमलेली मंडळी वरामागें धांवत सुटली. परंतु त्याच्या वायुगतीपुढें कोणाचाच टिकाव लागला नाहीं. नारायण तीन दिवसपर्यंत त्यां ढोलींत लपून बसला होता. वरानें लग्नमंडपांतून पळ काढल्यापासून घरीं एकच हाहाःकार उडाला ! नवरी घरीं परत गेली. त्या मुलीचें दुसरें लग्न करण्यास हरकत नाहीं, असें ब्राह्मणांनीं शास्त्राधार काढले. घरांतील मंडळी नद्या, तळीं, विहिरी, जंगलें शोधण्यास निघाली. शोध करतां करतां पिंपळांतील ढोलींत नारायण बसला आहे, असें समजलें. तेव्हां श्रेष्ठ व मातुश्री तेथें गेलीं व त्यांनीं कबूल केलें कीं, "आह्मी पुन्हां तुझ्या लग्नाच्या भानगडींत पडणार नाहीं.झालें तें झालें. खालीं. ये." आईपासून व भावापासून असें वचन घेतल्यावर नारायणाची स्वारी खालीं आली.

घरीं आल्यावर सर्वांनीं नारायणाशीं बोलण्याचें टाकिलें. त्यानेंही सर्वांशीं बोलणें वर्ज्य केलें असून तो उदासवृत्तीनें राहूं लागला.

**विरक्ती.** त्याच्या भावी चरित्रक्रमाचा हाच प्रारंभ होता. याप्रमाणें वैराग्यवृत्तीनें कांहीं दिवस राहून आईस व श्रेष्ठास नमस्कार करून तीर्थयात्रेचें निमित्त करून ही बालस्वारी जी घराबाहेर पडली ती तडक नाशिक पंचवटीस गेली. तेथें श्रीरामचंद्राचें दर्शन घेऊन तेथून अर्ध कोसावर गंगातीरीं टाकळी नामक गांव आहे, तेथें जाऊन तपश्चर्येस प्रारंभ केला. पहाटेस उठून नित्यविधी आटोपून स्नान करावयाचें व गंगाप्रवाहांत कंबरभर पाण्यांत उभें राहून जप व ध्यान करावयाचें, नंतर पंचवटींतून मधुकरी मागून आणून ती श्रीरामचंद्रास समर्पण केल्यावर खावयाची, दुपारीं अध्ययन, ग्रंथावलोकन व मनन करावयाचें व रात्रौ ईश्वरचिंतन व भजन करावयाचें. याप्रमाणें बारा वर्षें पुरश्चरण झाल्यावर त्यांना 'कृष्णातीरीं जाऊन जगदुद्धार करावा' असा दृष्टान्त झाला !

**तीर्थयात्रा.**

टाकळीस उद्धव गोसावी नामक शिष्यास ठेवून रामदास तीर्थयात्रेस निघाले. त्यांना प्रवासाची फार आवड असे. पायांत खडावा, शिरीं जटाभार, अंगांत भगवीं वस्त्रें, काखेंत कुबडी व हातांत स्मरणी अशा वेषानें निघून ते काशी, अयोध्या, गोकुळ, वृंदावन, बदरीनारायण, हिमालय, जगन्नाथ, मथुरा, द्वारका, मल्लिकार्जुन, गोकर्ण, रामेश्वर, पंढरपूर इत्यादि अनेक क्षेत्रें करून पुनः पंचवटीस परत आले. प्रवासांत त्यांनीं अनेक सत्पुरुषांच्या व विद्वानांच्या भेटी घेतल्या; समाज स्थितीचें अवलोकन केलें. धर्मविषयांवर चर्चा केली व मठ स्थापन केले. पंचवटींत कांहीं दिवस राहून पूर्वीं दृष्टांत झाल्याप्रमाणें ते पुनः कृष्णातीरीं जाण्यास निघाले.

**मातृदर्शन.**

वाटेनें जातांना आपल्या वृद्ध मातोश्रीचें एकदा दर्शन घ्यावें अशी इच्छा झाल्यावरून ते घरीं गेले. राणूबाई आतां वृद्ध झाली असून डोळ्यांनीं तिला दिसेनासें झालें होतें. माझा नारायण मला आतां कधीं तरी भेटेल काय, ही तिला रात्रंदिवस चिंता लागली होती. एके दिवशीं म्हातारी ओटीवर बसली असतांना ‘जयजय रघुवीर समर्थ’ अशी कोणी भिकाऱ्यानें उच्चस्वरानें आरोळी ठोकली. तेव्हां म्हातारी म्हणाली ‘मुली दारीं कोणी भिक्षेकरी आला आहे. त्यास भिक्षा घाला.’ मुलगी भिक्षा घेऊन येते, तोंच गोसावी वर आला आणि म्हातारीपाशीं जाऊन म्हणाला, ‘भिक्षा घेऊन जाणारा हा गोसावी नव्हे.’ हे शब्द कानीं पडतांच ‘बाळा नारायणा तूं केव्हां आलास?’ हें वाक्य सद्गद वाणीनें तिच्या तोंडून निघालें! तिच्या अंगावर रोमांच उभे राहिले व नेत्रांतून अश्रुधारा चालल्या! समर्थांनीं आईस साष्टांग नमस्कार केला. तिनें त्याचें मस्तक हुंगलें व त्यांस पोटाशीं धरलें. तिचा आनंद गगनांत मावेना! इतक्यांत श्रेष्ठही येऊन भेटले. नंतर समर्थ कांहीं दिवस घरीं राहिले. पहाटेस उठून गंगेवर स्नान करून नित्य-नैमित्तिक

कर्म संपवून भोजन करावयाचें. दुपारीं मातोश्रीशीं व श्रेष्ठाशीं वेदान्त वगैरे धार्मिक विषयांवर वादविवाद करावयाचा. याप्रमाणें कांहीं दिवस घालविल्यावर समर्थांनीं आईचा निरोप मागितला. नारायण पुनः जातो असें पाहून ती वृद्ध आई व श्रेष्ठ अत्यंत शोकाकुल झालीं ! त्यांच्या डोळ्यांतील अश्रुधारांस खळ ह्मणून पडेना. मायावश होऊन घरीं रहाण्यापेक्षां नारायणास महत् कृत्य करावयाचें होतें. तो त्या पाशांत पडला नाहीं. कपिल महामुनींनीं मातोश्री देवहूतीस जो आत्मज्ञान विचार श्रीमद्भागवतांत सांगितला आहे तो सांगून त्यांनीं आईचें अनेक प्रकारें शांतवन केलें व तिला श्रेष्ठाची थोरवी सांगून आपण व ते एकच आहोंत, माझ्याठिकाणीं ते तुला आहेत, असें सांगून व तिचें नानाप्रकारें शांतवन करून ते कृष्णातीरीं जाण्यास निघाले.

**कृष्णातीरीं आगमन.**

मातोश्रीचा निरोप घेऊन समर्थ गंगाप्रदक्षिणेस निघाले ते समुद्रसंगमीं गंगेचे सप्त प्रवाह आहेत त्यांस प्रदक्षिणा घालून गंगेचें उगमस्थान जें त्र्यंबकेश्वर तेथें प्रदक्षिणा संपवून टाकळीस आले. तेथें उद्धव गोसाव्याची भेट घेतली व थोडे दिवस मुक्काम केला. नंतर महाबळेश्वरास, वाईस व वाईहून माहुलीस येऊन तेथें कृष्णा व वेण्या यांच्या संगमावर चातुर्मास वास्तव्य केलें.

**संतभेटी.**

महाराष्ट्रांत त्या काळीं शिवाजी महाराज, तान्हाजी मालुसरे, बाजी देशपांडे इत्यादि अनेक वीर उत्पन्न झाले. त्याचप्रमाणें त्या काळीं तुकाराम, रामदास, वामन पंडित हे साधुश्रेष्ठ मराठी कवि निर्माण झाले. याशिवाय चिंचवडास मोरयादेव झाले. त्या काळच्या स्वामी पंचायतनांत—१ रामदास स्वामी–( समर्थ ) परळी—जयराम स्वामी,वडगांव–३रंथनाथ स्वामी,निगडी.४श्री आनंदमूर्ति,ब्रह्मनाळ,-५,केशवस्वामी, भागानगर—या पांच सत्पुरुषांची गणना असे. या पंचायतनांत रामदासांस आद्यस्थान असून त्यांना समर्थ पदवी असे. समानशील

मनुष्यांच्या भेटीचा व समागमाचा लाभ घडला असतांना मनुष्यास फार आनंद होतो. या उक्तीप्रमाणें या साधु मंडळीच्या दर्शनाचा व समागमाचा लाभ समर्थांस अत्यंत प्रिय असे. यांपैकीं जयराम स्वामी तर समर्थांचे शिष्य होते व रंगनाथ स्वामीस ते चिरंजीव नांवानें संबोधित असत. चाफळास किंवा सज्जनगडावर रामनवमीच्या उत्सवप्रसंगीं सर्व संत मंडळीस समर्थ मोठ्या प्रेमानें बोलावीत असत; त्यांजकडून कथाकीर्तनें करवीत व ज्ञानचर्चा चालवीत असत.

**उपास्य दैवत.**

रामदास हे रामाचे निःसीम भक्त होते. पंढरपुरच्या विठोबास रामावतार संबोधून त्यांनीं अभंग केले आहेत. चाफळ व सज्जनगड येथें त्यांनीं रामाच्या मूर्ति स्थापन केल्या. रामचंद्राचा भक्त शिरोमणी जो मारुती त्याची उपासना ते मनोभावें करीत असत. महाराष्ट्रांतच नव्हे तर काशी, प्रयाग, तंजावर इत्यादि लांब लांबच्या प्रांतींही त्यांनीं मारुतीचीं देवालयें बांधविलीं होतीं. रहिमतपुराजवळ जो कृष्णेचा डोह आहे, त्यांत त्यांना शिळेवरील दोन मूर्ति सांपडल्या. एका शीळेवर रामचंद्र, लक्ष्मण व सीता अशा तीन मूर्ति व एका शीळेवर महिषासूरमर्दिनी देवीची मूर्ति होती. या मूर्ति त्यांनीं चाफळास आणल्या तेव्हां गांवकऱ्यांनीं त्यांना स्मशानांत रिकामी पडलेली जागा दिली. तेथें शेंदूर फांसलेले असंख्य दगड होते. ते सर्व उपटून काढून त्यांना स्वामींनीं कुंभारडोहांत मुक्ति दिली. तेथें एक म्हसोबाचा दगड होता. तो उपटून काढून त्यास लांब एका जांभळीखालीं नेऊन ठेविला. रथाच्या मिरवणुकीच्या वेळीं त्याला मापटेंभर तांदूळ व एक नारळ देण्याचें ठरवून कोणास उपद्रव करूं नये म्हणून सांगितलें. यावरून जरीमरी, आखाई जोखाई, म्हसोबा, ह्या दैवतांवर त्यांचा किती विश्वास होता किंवा ते त्या दैवतांना कितपत भीत होते, हें चांगलें व्यक्त होतें

**शिवाजीस उपदेश.**

सद्गुरुवांचून मोक्ष नाहीं, हें वाक्य एका कीर्तन प्रसंगीं महाराजांच्या कानीं पडल्यापासून आपण सद्गुरु करावा अशी महाराजांस इच्छा झाली. रामदास स्वामी यांची किर्ति त्याकाळीं महाराष्ट्रांत समर्थ या नामाभिधानानें दुमदुमत होती. त्या साधुश्रेष्ठाचें एकदा दर्शन व्हावें, ही इच्छा महाराजांस झाली. ते चाफळास आले. परंतु तेथें स्वारी नव्हती. महाराजांनीं समर्थांच्या शोधार्थ कारकून पाठविले व आपण महाबळेश्वरीं गेले. तों तेथें ‘ निश्चयाचा महामेरू। बहुत जनांसी आधारू’। हें ओंवीबद्ध पत्र त्यांना आलें. महाराज पुनः रामदास स्वामीच्या दर्शनास निघाले तों शिंगणवाडीस आले. त्यावेळीं समर्थांची स्वारी खडीच्या बागेंत एकान्त स्थळीं होती. तेथें महाराजांस उपदेश प्रसादाचा लाभ झाला. समर्थांनीं महाराजांस लघुबोध (दशक १३ समास ६) निवेदन केला. महाराजांची समर्थांचे ठायीं निःसीम भाक्ति असे. राजकारणांच्या बिकट प्रसंगीं महाराज समर्थांची सल्लामसलत विचारीत असत.

**चाफळ व सज्जनगड.**

समर्थांच्या सान्निध्याचा लाभ घडावा या हेतूनें महाराजांनीं परळी येथील किल्ल्यावर रहाण्याची त्यांना विनंति करून त्या किल्यास सज्जनगड असें नांव दिलें. तेथील देवस्थानास मोठ्या देणग्या दिल्या. चाफळ हें रामदासीपंथाचें आद्य पीठ व समर्थांचें मुख्य ठिकाण, तेथेंच समर्थांनीं दासबोध लिहिला. तेथील डोंगरांत रामघळ, कळंबघळ अशीं समर्थांचीं एकान्त बसण्याचीं स्थळें असत. चाफळास समर्थांनीं मूर्ति स्थापन केल्यावर महाराजांनीं तेथील देवस्थानासही कांहीं गांवें इनाम दिलीं. समर्थ विडा खात असत, त्याकरितां मेंढेखोरें येथील जकातीचें उत्पन्न दिलें. महाराजांना साधु पुरुषांच्या दर्शनाची व सहवासाची फार आवड असे. तुकाराम महाराजांच्या भेटीचा व त्यांच्या बोधामृताचा त्यांना लाभ घडला

होता. समर्थांचे वडील बंधु श्रेष्ठ यांचें दर्शन घेऊन त्यांच्या योगक्षेमाकरितां जांबेस कांहीं नेमणुका करून दिल्या. कल्याण स्वामीचा मठ डोमगांवी होता, त्यासही कांहीं उत्पन्न दिलें.

**शहाजीराजे व व्यंकोजी राजे यांस दर्शन.**

एके प्रसंगीं महाराज आपले वडील शहाजी राजे मातोश्री जिजाबाई, बंधु व्यंकोजी व त्यांची मातोश्री तुकाबाई या सर्व मंडळीस घेऊन समर्थांच्या दर्शनास सज्जनगडावर गेले होते. एकदा व्यंकोजी राजांच्या निमंत्रणावरून तंजावर प्रांतीं समर्थ गेले व व्यंकोजी राजास अनुग्रह दिला. तेथें मठ स्थापन करून भिकाजी गोसावी व मौनी गोसावी यांची त्या ठिकाणीं स्थापना केली. शिवाजी महाराजांच्या निधनापर्यंत समर्थांचें त्यांच्यावर अविरत प्रेम होतें व महाराजांचीही त्यांच्या ठायीं निःसीम भक्ति होती. शिवाजीच्या मृत्यूची बातमी कानीं आल्यापासून समर्थांनीं अन्न वर्ज्य केलें व ते दुग्धाहार करून राहूं लागले. देशसंचार करण्याचें त्यांनीं सोडून दिलें. त्या दिवसापासून ते आपल्या खोलींत बसून असत व क्वचितच बाहेर पडत असत.

**संभाजी महाराज.**

शिवाजी महाराजांचा अंत झाल्यावर संभाजी महाराज रामदासांच्या दर्शनास गेले. मठ जीर्णावस्थेस आलेला पाहून दुरुस्ती करण्यास हुकूम दिला. मठ तयार होतांच समर्थस्वारी मठांत राहूं लागली. परंतु यापुढें त्यांनीं बाहेर पडण्याचें सोडून दिलें. गादीवर येतांच संभाजी महाराजांनीं जीं अनन्वित व अंगावर शहारे आणणारीं कृत्यें चालविलीं, तीं समर्थांच्या कानीं येऊं लागलीं. तीं ऐकून समर्थांना अति दुःख झालें. सातार्‍यास संभाजी महाराज असतांना त्यांनीं छावणींतून 'आपण दर्शनास येत आहों' असा समर्थांकडे निरोप पाठविला. समर्थांस त्या कुलांगाराचें मुखावलोकन करण्याचा तिटकारा आल्यामुळें त्यांनीं परत निरोप रवाना केला कीं, 'शरीरास

समाधान नाहीं. करितां येऊं नये.' शिवाजी महाराजांच्या अत्यंत विश्वासांतलें व स्वराज्याचे जे उत्पादक व आधारस्तंभ अशा थोर थोर मुत्सद्दी पुरुषांस ठार करण्याचा संभाजीनें सपाटा चालविला. आपल्या सापत्न मातोश्री सोयराबाई यांना भिंतींत चिणून टाकिलें! या बातम्या कानीं आल्यावर समर्थांना मोठी चिंता पडली. थोरल्या महाराजांनीं मोठ्या कष्टांनीं व संकटांस न जुमानतां जें राज्य स्थापन केलें, तें हा कुलांगार नष्ट करतो कीं काय, अशी सर्वांना भीति पडली. उपदेशाच्या चार गोष्टी सांगून त्याचें मन वळविण्याची समर्थांस आशा नव्हती. परंतु सर्वांचा अत्यंत आग्रह पडल्यामुळें त्यांनीं संभाजीस एक उपदेशपर पत्र लिहिलें. परंतु त्या बोधामृताचा कांहींच उपयोग झाला नाहीं! पालथ्या घड्यावर पाणी, या उक्तीप्रमाणें तो उपदेश व्यर्थ गेला.

**शिष्य सांप्रदाय.** समर्थ राजगुरु होते. त्यांची शिष्यमंडळी फार मोठी होती. अनेक प्रांतांत संचार करून त्यांनीं ठिकठिकाणीं मठ स्थापन केले. जे ब्रह्मचारी किंवा विशेष अधिकारी त्यांना महंत पदवी देऊन ते मठाधीश करीत असत. असे मठ ठिकाठिकाणीं असून प्रत्येक मठाचा शिष्यसांप्रदाय मोठा होता. सर्व ठिकाणीं दासबोधाचीं पारायणें फार भक्तीनें व विवेकपूर्वक होत असत. रामदासपंथाची दीक्षा देऊन समर्थ स्त्रियांनाही आपल्या शिष्यशाखेंत प्रविष्ट करीत असत. सतीबाई, आक्का, अंबिका, वेणूबाई वगैरे स्त्रिया शिष्य मंडळींत होत्या. मिरजेचा मठ वेणूबाईच्या ताब्यांत असे. कित्येक स्त्रिया चांगल्या अधिकारी असून कीर्तन करीत व पुराण वगैरे सांगत असत. ईश्वरभक्ति उद्योगतत्परता, बोलण्यासारखें आचरण, ऐहिक कर्तव्याविषयीं दक्षता आयुष्यसद्व्यय हें समर्थांच्या बोधांतील सार असे. ते शिष्याकडून कथापुराणें करवीत व त्यांचें ज्ञान अजमावून पहात असत. शिवाजी महाराजांनीं सुद्धां उभें राहून एके प्रसंगीं कीर्तन केलें होतें.

वामन पंडितांच्या काव्याची ओळख ज्याला नाहीं, असा मराठी वाचक नाहीं. हे कोरेगांवचे जोशी असून त्यांनीं काशीस जाऊन

दोन विद्वद्रत्नें. षड् शास्त्रांचें अध्ययन केलें होतें. त्यांची विद्वत्ता अगाध व बुद्धि कुशाग्र असल्यामुळें त्यांना विद्येचा गर्व झाला होता. दिवसा मशाल लावून व गांवोगांव हिंडून अजिंक्य पत्रें मिळवावयाचीं असा त्यांचा क्रम असे. परंतु कांहीं कारणांमुळें पुढें त्यांना उपरति झाली व देहूस जाऊन त्यांनीं अनुग्रह देण्याविषयीं तुकारामाचे पाय धरले. तेव्हां तुकारामानें त्यांना सांगितलें कीं, 'आपण शूद्र आहों, ब्राह्मणास अनुग्रह देण्यास आपणास अधिकार नाहीं. तरी तुह्मी समर्थांकडे जाऊन अनुग्रह घ्यावा.' त्याप्रमाणें ते चाफळास गेले. समर्थांचा वेष, ब्रह्मचर्य, वैराग्य, वेदान्तज्ञान व शिष्यपरंपरा पाहून ते मनांत थक्क झाले. गर्वपरिहारार्थ समर्थांनीं त्यांना कांहीं चमत्कार दाखविल्यानंतर त्यांनीं समर्थांचा अनुग्रह घेतला. संस्कृतांत कविता करण्याचें सोडून देऊन मराठींत कविता केल्यास सामान्य जनास फार उपयोग होईल, असें समर्थांनीं सांगितल्यावरून ते पुढें मराठींत कविता करूं लागले.

सदाशीव शास्त्री देव येवलेकर हे महान् विद्वान् षड्ग्रंथी ब्राह्मण अजिंक्य पत्रें मिळवीत गांवोगांव फिरत होते. दिवसास मशाल लावून व जानव्यास वस्तरा बांधून त्यांची प्रतिज्ञा असे कीं, जो कोणी मला वादांत जिंकील, त्यानें माझी मशाल विझवून वस्तऱ्यानें माझी जिव्हा छेदन करावी. ही स्वारी शिवाजीच्या दरबारीं वाद करण्यास येत आहे, असें ऐकल्यावर तेथील शास्त्रीपंडितांची गाळण उडली. त्यांनीं अशी युक्ति लढविली कीं, जर तुम्हांस वाद करणें असेल तर राजगुरु जे समर्थ त्यांच्याशीं वाद करावा. त्यांना जिंकिलें कीं, अर्थात् सर्वांना जिंकल्याप्रमाणें झालेंच! मोठ्या तांतडीनें त्यांनीं त्या विद्वद्वर्यास चाफळास व तेथून समर्थ ज्या रामघळीच्या अरण्यांत होते तेथें नेलें. शिवाजी महाराजही बरोबर होते. समर्थ एका

धोंड्यावर विचारमग्न असे बसले होते. सर्वांनीं समर्थांस साष्टांग नमस्कार केले. परंतु सदाशीव शास्त्र्यानें नमस्कार केला नाहीं. परंतु समर्थांनीं त्यांना नमस्कार केल्यावर ते मोठ्या अहंमन्यतेनें बोलले, 'आह्मी वादास येथें आलों आहों. आपली योग्यता अधिक ठरल्यास आह्मी आपणांस नमस्कार करूं. नाहीं तर आपल्या मस्तकीं हात ठेवून आपणास आशीर्वाद देऊं! समर्थ नम्रता पूर्वक ह्मणाले कीं, 'आह्मीं शास्त्रें पाहिलीं नाहींत, कीं फारसें अध्ययनही केलें नाहीं. ईश्वरचिंतन करावें व जनांत भक्ति वाढवावी, एवढें आपण जाणतों.' शास्त्री गर्वोक्तीनें ह्मणाले, 'या गोष्टी बाया बापड्यांना सांगा. आह्मांस सांगू नका' शास्त्रिबुवांस विद्वत्तेची घमेंड असून गर्वाचें जाड्य झालें आहे व दुसऱ्यांना ते तुच्छ समजतात, हें बरें नव्हे. तेव्हां समोरून येणाऱ्या एका मोळीविक्यास समर्थांनीं हांक मारिली व जमिनीवर कांहीं रेघा ओढून त्याला त्या ओलांडून जवळ येण्यास सांगितलें. तें करतांच त्यास षड्‌ शास्त्रांचें ज्ञान झालें व त्यानें त्या पंडिताला वाद करण्यास आव्हान केलें. त्यानें त्यास वादांत जिंकिल्यावर त्या अहंमन्य पंडिताचा गर्व पार नाहींसा झाला. व लज्जेनें शरमून त्यानें समर्थांच्या चरणीं मस्तक ठेविलें. 'सर्वांभूतीं ईश्वर आहे व कोणाचा कधींहि अपमान करूं नये' असें सांगून त्यांनीं त्यांचें नांव **वासुदेव गोसावी** असें ठेविलें व त्याला शिष्यवृंदांत दाखल करून त्याची योजना कन्हेरच्या मठावर केली.

**मागण्या**

आपली कांहीं तरी सेवा घ्यावी असा आग्रह शिवाजी महाराजांनीं धरला तेव्हां समर्थांनीं सांगितलें कीं, विद्वान् ब्राह्मणांस श्रावण मासीं दक्षणा देत जावी व जोहार ह्मणण्याची चाल बंद करून अंत्यजांशिवाय सर्वांनीं रामराम म्हणावा. एकदा महाराजांनीं समर्थांस सर्व राज्य अर्पण केल्याच्या सनदा लिहून त्यांच्या झोळींत टाकिल्या, तेव्हां त्या त्यांना परत देऊन समर्थांनीं सांगितलें कीं, राज्याचा चांगला सांभाळ करावा व हें आमचें राज्य आहे याची स्मृती म्हणून निशाण मात्र भगवें लावीत जावें, अशी आज्ञा केली. तेंच पुढें मराठ्यांचें राष्ट्रीय निशाण झालें.

समर्थांची स्वारी कऱ्हाडास चालली होती. बरोबर वीस-पंचवीस-शिष्य होते. त्यांना भूक लागल्यामुळें त्यांनीं एका शेतांतून कोंवळा हुरडा काढला व देगांवच्या शिवारांत विहिरीपाशीं मंडळी हुरडा खात बसली. त्यांनीं समर्थांसही कांहीं हुरडा अर्पण केला. इतक्यांत त्या मळ्याचा पाटील तेथें आला. तो संतापानें लाल झाला व शिव्या हांसडून जोंधळ्याच्या ताटाखालीं समर्थांस मारूं लागला, मंडळीनें पाटलास धरून खूप चोप दिला. परंतु ज्याचा तुम्ही हुरडा खाल्ला, त्यालाच उलट मारतां, हें बरोबर नाहीं असें सांगून समर्थांनीं पाटलास सोडविलें व घरीं पाठविलें. शिवाजीचे कानीं ही गोष्ट जातांच त्यांनीं पाटलास मुसक्या बांधून आणण्याविषयीं हुकूम सोडला. समर्थ उच्चासनीं मजलशीवर व महाराज बाजूस बसलेले होते, इतक्यांत शिपायांनीं बेड्या घालून चतुर्भुज केलेल्या पाटीलबुवांस महाराजांपुढें आणून उभा करून मुजरे केले. ज्या गोसावड्यास आपण मारलें तोच हा, हें पाहून पाटलाची गाळण झाली. त्याला दरदरून घाम सुटला! आतां आपला कडेलोट करतात कीं, हत्तीच्या पायीं बांधून मारतात, या भीतीनें त्याचें काळीज चर्र झालें. महाराज त्याला शिक्षा सांगणार, त्यापूर्वींच समर्थ ह्मणाले कीं, 'मी अपराधी आहें. मी कां त्याचा हुरडा खावा? मला शिक्षा झाली पाहिजे. परंतु मला जर शिक्षा करावयाची नसेल तर त्याला तो मळा इनाम करून द्यावा'! आज्ञेप्रमाणें महाराजांनीं पाटलाची मुक्तता करून त्याला त्या मळ्याची सनद दिली. शांतीनें साधु खलांना कसे लाजवितात, याचें हें एक उत्कृष्ठ उदाहरण होय.

**हुरडा.**

करवीर प्रांतीं समानगड किल्ला बांधण्याचे कामीं हजारों मनुष्यें कामावर होतीं. स्वतः किल्ल्याचें काम पाहून महाराज बांधकामां संबंधानें हुकूम सांगत होते. इतक्यांत महाराजांच्या मनांत असा विचार आला कीं, या सर्व लोकांचा अन्न-दाता मी आहें. केवढी माझी सत्ता, केवढें माझें वैभव! समर्थ जवळच होते.

**दगडांतील बेडकी.**

महाराजांना जो हा अभिमान उत्पन्न झाला तो त्यांनीं जाणला. जेथें महाराज बसले होते, तेथें जवळच एक शिळा होती. ती फोडण्याविषयीं समर्थांनीं बेलदारांस आज्ञा केली; ती फोडतांच आंतील एका पोकळ भागांत पाणी व बेडकी आढळली. ती महाराजांना दाखवून समर्थांनीं विचारलें, 'खडकामध्यें रहाणाऱ्या बेडकीचा पोषण करणारा कोण? जो ह्या बेडकीचें पोषण करतो, तोच या हजारों लोकांचें पोषण करीत आहे. नाहीं काय?' 'मी या हजारों लोकांचा अन्नदाता'—हा अभिमान मनुष्यानें बाळगणें व्यर्थ होय! आपण वृथा अभिमान केल्याचा शिवाजी महाराजांस अत्यंत पश्चात्ताप झाला! त्यांनीं समर्थांच्या पायांवर मस्तक ठेविलें व इतःपर अशी चूक होणार नाहीं, असें समर्थांना अभिवचन दिलें!

समर्थांना अन्न जात नसल्यामुळें त्यांची प्रकृती क्षीण होत चालली होती.

**समर्थांचा अंतकाल.**

सज्जनगडाची थंड हवा मानवत नसेल तर चाफळास चलावें, असा शिष्यांनीं आग्रह केला. आतां येथून हालावयाचें नाहीं, असें समर्थांनीं स्पष्ट सांगितलें. समर्थांनीं विचारिलें असतां मठाची व्यवस्था चालविण्याचें कोणीच अंगावर घेईना, तेव्हां श्रेष्ठाचे चिरंजीव रामचंद्र बावा ह्यांस आणण्यास समर्थांनीं सांगितलें व पुढें त्यांचीच गादीवर स्थापना करण्यांत आली. पुढील उपदेशाविषयीं विचारतां 'माझ्या पश्चात् माझ्याशीं बोलावेंसें वाटेल त्यांनीं दासबोधादि ग्रंथ वाचावेत' अशी समर्थांची आज्ञा झाली. याप्रमाणें व्यवस्था लावून ईश्वरचिंतनांत निमग्न असतांना शके १६०३ माघ वद्य ९ स ह्या मृत्युलोक सोडून समर्थ निजधामास गेले.

# समर्थबोध रत्नमाला.

## नीति-प्रकरण १ लें.

### संगति.

मुळीं उदक निवळ असतें । नाना वल्लींमध्यें जातें । संगदोषें तैसें होतें । अम्ल तीक्ष्ण कडवट ॥ १ ॥ बरी संगति सांपडली । जैशी ऊंसास गोडी आली । विषयवल्ली फोंफावली । पातकी प्राणी ॥ २ ॥ अठरा भार वनस्पती । गुंण सांगावे ते किती । नाना देहांचे संगती । आत्मयास होय ॥ ३ ॥ त्यांमध्यें कोणी भले । ते संतसंगें निवाले । देहाभिमान सांडून गेले । विवेक बळें ॥ ४ ॥ ज्यासी स्वहिताचि करणें । त्यास किती ह्मणोन सांगणें ॥ हें ज्याचें त्याणें समजणें । सकळ कांहीं ॥ ५ ॥ आपला आपण करी कुडावा । तो आपला मित्र जाणावा । आपला नाश करी तो समजावा । वैरी ऐसा ॥ ६ ॥ आपलें आपण अनहित करावें । त्यास आडवें कोणें निघावें । एकांतीं जाऊन जीवें । मारी आपणासी ॥ ७ ॥ जो आपला आपण घातकी । तो आत्महत्यारा पातकी । या कारणें विवेकी । धन्य साधु ॥ ८ ॥ पुण्यवंतां सत्संगती । पापिष्टां असत्संगती । गति आणि अवगति । संगतीयोगें ॥ ९ ॥ उत्तम संगति धरावी । आपली आपण

---

१ गुणधर्म. २ संतोष पावले. ३ संरक्षण. ४ दुर्गति.

चिंता करावी । अंतरीं वरी विवरावी । बुद्धि जाणत्याची ॥ १० ॥ जाणता देवाचा अंश । नेणता ह्मणजे तो राक्षसांश । यामध्यें जें विशेष । तें जाणोन घ्यावें ॥ ११ ॥ जाणता तो सकळां मान्य । नेणता होतो अमान्य । जेणें करितां होइजे धन्य । तेंचि घ्यावें ॥ १२ ॥ साक्षेपी शहाण्याची संगती । तेणें साक्षेपी शहाणे होती । आळसी मूर्खाची संगतीं । होती आळसी मूर्ख ॥१३॥ उत्तम संगतीचें फळ सुख । अधम संगतीचें फळ दुःख । आनंद सांडूनियां शोक । कैसा घ्यावा ॥ १४ ॥ नाना दुर्जनांचा संग । क्षणक्षणां मनोभंग । या कारणें कांहीं रंग । राखोन जावें ॥ १५ ॥ शहाणा यत्नी त्याच्यांगुणें । पाहों जातां काय उणें । सुख संतोष भोगणें । नाना श्लाघ्यंता[1] ॥१६॥ दश१७स.७.

* * * *

एक संगतीनें तरती । एक संगतीनें बुडती । या कारणें सत्संगती । वरी पहावी । १४-७-२६ । संगतीनें मनुष्य पालटे । उत्तम गुण तत्काळ उठे । अखंड अभ्यासीं लगटे । समुदाव[2] । १९-७-२०

## सत्संग.

मनाच्या तोडून ओढी । श्रवणीं बैसावें आवडीं । सावधपणें घडीनें घडी । काळसार्थक करावा ॥१॥ अर्थप्रमेयें[3] ग्रंथांतरीं । शोधूनि घ्यावें अभ्यंतरीं । दुश्चित्तपण आलें तरी । पुनः श्रवण करावें ॥ २ ॥ अर्थांतरें[4] पाहिल्यावीण । उगेंचि करी जो श्रवण । तो श्रोता नव्हे पाषाण । मनुष्यवेषें ॥ ३ ॥ येथें श्रोते मानितील शीण । आह्मांसि केलें पाषाण । तरी पाषाणाचें लक्षण । सावध ऐका ॥ ४ ॥ वांकुडा तिकडा

---

१ नानाप्रकारची स्तुती. २ उत्तम गुणांचा समुदाय लाभतो. ३ अर्थसार. ४ मर्म.

फोडिला । पाषाण घडून नीट केला । दुसरे वेळेसी पाहिला । तरी तो तैसाचि असे ॥ ५ ॥ टाकीनें खपली फोडिली । ते मागुतीं नाहीं जडली । मनुष्याची कुबुद्धि झाडिली । तरी ते पुनः लागे ॥ ६ ॥ सांगतां अवगुण गेला । पुनः मागुतां जडला । या कारणें महा भला । पाषाण गोटा ॥ ७ ॥ ज्याचा अवगुण झडेना । तो पाषाणाहून उणा[1] । पाषाण आगळा जाणा । कोटिगुणें[2] ॥ ८ ॥ दश० ८ स० ६

*  *  *  *

लोहपरिसासी लागला । थेंबुटा सागरीं मिळाला । गंगे सरिते संगम झाला । तत्क्षणींचें[3] । ८–६–४३

नदी मिळाली सागरीं । ते निवडावी कोणे परी । लोह सोनें होतां माघारी । काळिमा नये । ८-८-२१

(२)

भल्यांची महिमा ऐसी । जे सन्मार्ग लावी लोकांसी । पोहणार असतां बुडत्यासी । बुडों नेदावें ॥ १ ॥ जे पृथ्वीमध्यें विवेकी असती । धन्य तयांची संगती । श्रवणमात्रें पावती गती । प्राणीमात्र ॥ १ ॥ सत्संग आणि सच्छास्त्रश्रवण । अखंड होतसे विवरण । नाना सत्संग आणि उत्तम गुण । परोपकाराचे ॥ ३ ॥ जे सत्कीर्तीचे पुरुष । ते परमेश्वराचे अंश । धर्मस्थापनेचा हव्यास[4] । तेथेंचि वसे ॥ ४ ॥

दश १७ स० १

———:०:———

## संत.

संत आनंदाचें स्थळ । संत सुखचि केवळ । नाना संतोषांचें मूळ । ते हे संत ॥ १ ॥ संत विश्रांतीची विश्रांती । संत तृप्तीची निजतृप्ती ।

१ गुणहीन. २ सहस्र पटीनें उत्तम होतात. ३ लागलींच उत्तम होतात. ४ हांव.

नातरी भक्तीची फळश्रुती १ ते हे संत ॥ २ ॥ संत धर्माचें धर्मक्षेत्रें । संत स्वरूपाचें सत्पात्र । नातरी पुण्याची पवित्र । पूण्य भूमी ॥ ३ ॥ संत समाधीचें मंदिर । संत विवेकाचें भांडार । नातरी बोलिजे माहेर । सायुज्यं मुक्तीचें ॥ ४ ॥ संत सत्याचा निश्चयो । संत सार्थकांचा जयो । संत प्राप्तीचा समयो । सिद्धरूप ॥ ५ ॥ मोक्षश्रिया अलंकृत । ऐसे हे संत श्रीमंत । जीव दरिद्री असंख्यात । नृपती केले ॥ ६ ॥ जे समर्थ-पणें उदार । जे कां अत्यंत दानशूर । तयांचेनि हा ज्ञानविचार । दिधला न वेचे ॥ ७ ॥ महाराजे चक्रवर्ती । जाले आहेत पुढें होती । परंतु कोणी सायुज्य मुक्ती । देणार नाहीं ॥ ८ ॥ जें त्रिलोकीं नाहीं दान । तें करिती संतसज्जन । तया संतांचें महिमान । काय ह्मणोनी वर्णावें ॥ ९ ॥ जें त्रैलोक्याहून वेगळें । जें वेदश्रुतीसी नाकळे । तेंचि जयांचेनि वोळे । परब्रह्म अंतरीं ॥१०॥ ऐसी संतांची महिमा । बोलिजे तितुकी उणी उपमा । जयांचेनि मुख्य परमात्मा । प्रगट होय ॥११॥

———:०:———

दश १ स० ५

## अभिमान.

[ १ ]

राजे जाती राजपंथें । चोर जाती चोरपंथें । वेडा ठके अल्पस्वार्थें । मूर्खपणें ॥ १ ॥ मूर्खास वाटे मी शहाणा । परी तो वेडा दैन्यवाणा । नाना चातुर्यांच्या खुणा । चतुर जाणे ॥ २ ॥ अवघेचि ह्मणती आह्मी थोर । अवघेचि ह्मणती आह्मी सुंदर । अवघेचि ह्मणती आह्मी चतुर । भूमंडळीं ॥ ३ ॥ ऐसा विचार आणितां मना । कोणीच लहान ह्मण-वीना । जाणते आणिती अनुमाना । सकळ कांहीं ॥ ४ ॥ आपुलाल्या साभिमानें । लोक चालिले अनुमानें । परंतु हें विवेकानें । पाहिलें

१ ठिकाण, स्थळ. २ ज्यामुक्तींत ब्रह्मस्वरूप प्राप्त होते ती. ३ मोक्षालंकारानें विभूषित. ४ जो वर्णन करितां येत नाहीं. ५ सार्वभौम. ६ उपमेस कमी. ७ अल्प फायदा पाहून मूर्ख फसतो. ८ शहाणे खरें तेव्हांच ताडतात.

मान्य गा. २१

पाहिजे ॥ ५ ॥ लटक्याचा साभिमान घेणें। सत्य अवघेंचि सांडणें। मूर्खपणाचीं लक्षणें। तीं हीं ऐसीं ॥ ६ ॥ सत्याचा जो अभिमान। तो जाणावा निरभिमान। न्याय अन्याय समान। कदापि नव्हे ॥ ७ ॥ न्याय ह्मणिजे तो शाश्वत। अन्याय ह्मणिजे तो अशाश्वत। बाष्कळ आणि नेमस्त। एक कैसा ॥ ८ ॥ दश० १५ स० १

[ २ ]

मीपणें वस्तु नोकळे[1]। मीपणें भक्ति मावळे। मीपणें शक्ति गळे। वैराग्याची ॥ १ ॥ मीपणें प्रपंच न घडे। मीपणें परमार्थ बुडे। मीपणें सकळही उडे[2]। यश कीर्ति प्रताप ॥ २ ॥ मीपणें मैत्री तुटे। मीपणें प्रीति आटे। मीपणें लिगटे[3]। अभिमान अंगीं ॥ ३ ॥ मीपणें विकल्प उठे। मीपणें कलह सुटे[3]। मीपणें संमोह फुटे। ऐक्यतेचा ॥ ४ ॥ मीपण कोणासीच न साहे[4]। तें भगवंतीं कैसेंनि साहे। ह्मणून मीपण सांडून राहे। तोचि समाधानी ॥ ५ ॥ आणिक एक समाधान। मीपणें-विण साधन। करूं जाणे तोचि धन्य। समाधानी ॥ ६ ॥ दश० ७ स० ७

———०———

## चित्तशुद्धि.

असार त्यागून घेईजे सार। ह्मणोन सारासार विचार। नित्यानित्य निरंतर। पाहती ज्ञानी ॥ १ ॥ जेथें ज्ञानाचि होतें विज्ञान[5]। जेथें मनचि होतें उन्मन[6]। तेथें कैचें चंचळपण। आत्मयासी ॥ २ ॥ सांगणी वांगणीचें[7] काम नव्हे। आपुल्या अनुभवें जाणावें। प्रत्ययाविण शिणावें। तेंचि पाप ॥ ३ ॥ सत्याएवढें सुकृत[8] नाहीं। असत्याएवढें पाप नाहीं। प्रचीती विण कोठेंचि नाहीं। समाधान ॥ ४ ॥ पापाचें

---

१ अहंपणानें ज्ञान होत नाहीं. २ नाहींसे होतात. ३ चिकटतो. ३ वाढतात. ४ सहन होत नाहीं. ५ अनुभवयुक्त. ६ कल्पनारहित. ७ सांगण्यासवरण्याचें. ८ पुण्य.

वळल शरीर । पापचि घडे तदनंतर । अंतरीं रोग वरी उपचार । काय करी ॥ ५ ॥ नाना क्षेत्रीं हें मुंडिलें । नाना तीर्थीं हें दंडिलें । नाना निग्रहीं[१] खंडिलें । ठायीं ठायीं ॥ ६ ॥ नाना मृत्तिकेनें घांसिलें । अथवा तप्त मुद्रेनें लांशिलें[२] । जरी हें वरि वरि तांशिलें[३] । तरी शुद्ध नव्हे ॥ ७ ॥ शेणाचे गोळे गिळिले । गोमुत्राचे मोंघे[४] घेतले । माळा रुद्राक्ष घातले । काष्ठमणी ॥८॥ वेष वरि वरि केला । अंतरीं दोष भरला । त्या दोषाच्या दहनाला[५] । आत्मज्ञान पाहिजे ॥ ९ ॥ नाना व्रतें नाना दानें । नाना योग तीर्थाटणें । सर्वांहून कोटिगुणें । महिमा आत्मज्ञानाचा ॥ १० ॥ आत्मज्ञान पाहे सदा । त्याच्या पुण्यासी नाहीं मर्यादा । दुष्ट पातकांची बाधा । निरसोन गेली ॥११॥ दश० १० स० १०

——o——

## आयुष्य सद्व्यय.

( आयुष्य या अमोल देणगीचें प्रत्येक मनुष्यानें सार्थक केलें पाहिजे. जे असा उपयोग करितात ते धन्य. जे मूर्खपणानें व गयाळीपणानें ही बहुमोल देणगी व्यर्थ घालवितात ते सर्वस्वी चुकले, असें समर्थ ह्मणतात ).

जितां[६] सार्थक नाहीं केलें । व्यर्थ आयुष्य निघोन गेलें । मुळीं धान्यचि नाहीं पेरिलें । तें उगवेल कैचें ॥ १ ॥ जरी केलें ईश्वर भजन । तरीच होइजे पावन । जैसें वेव्हारितां धन । रासी माथां लाभे[७] ॥ २ ॥ दिधल्याविण पाविजेना । पेरिल्याविण उगवेना । ऐसें हें वाक्य जना । ठाउकेंचि आहे ॥ ३ ॥ न करितां सेवेच्या व्यापारा ।

---

१ कर्मठ किंवा हठयोगी कृत्यांनीं. २ डागलें. ३ क्षौर केलें. ४ गाडगें. ५ जाळण्याला. ६ जिवंत असतांना. ७ पैशाची देवघेव केली असतांना मुद्दलाची रास ( वृद्धि ) होते.

स्वामीस ह्मणे कोठें मुशारा । तैसें अंतीं अभक्त नरा । स्वहित न घडे ॥ ४ ॥ जितां नाहीं भगवद्भक्ती । मेल्या कैंची होईल मुक्ती । असो जे जे जैसें करिती । ते ते पावती तैसें ॥ ५ ॥ दास. द. ७ स १०

[ २ ]

नदीचें उदक वाहत गेलें । तें निरर्थक चालिलें । जरी बांधोनि काढिलें । नाना तीरीं कालवे ॥ १ ॥ उदक निगेनें वर्ताविलें । नाना जिनसीं पीक काढिलें । पुढें उदकचि झालें । पीक सुवर्ण ॥ २ ॥ तैसें हें आपुलें वय । विवेकेंविण व्यर्थ जाय । विवेकी ते यथान्वय[1] । स्वहित साधिती ॥ ३ ॥ नाना उंच आम्रफळें । अंजीर ऊंस द्राक्षें केळें । नाना पिकें यत्नजळें । निर्माण झालीं ॥ ४ ॥ तैसें आयुष्य आपुलें । विवेकें सार्थक केलें । कां जें शोधूनि पाहिलें । सारासार ॥ ५ ॥ गयोळीपणें मूर्खपणें । संसारांत दिसे उणें । विवेकी जनें या कारणें । स्वहित करावें ॥६॥ इहलोक परलोक । उभयलोकीं सार्थक । शुद्ध ज्ञान शुद्ध विवेक ॥ यासि ह्मणावें ॥ ७ ॥ लोकीं संसार करावा । नाना यत्नें आटोपावा । लोकांमध्यें मिरवावा पुरुषार्थ आपुला ॥ ८ ॥ (विधिसंग्रहसोपान)

---

## शब्द आणि क्रिया.

[ १ ]

दसऱ्याचें सोनें वांटलें । तेणें काय हातासी आलें ॥ राये विनोदें आले । सुखासना ॥ १ ॥ तैसें शब्दें ब्रह्मज्ञान । बोलतां नये समाधान । म्हणोनि आधीं साधन । केलें पाहिजे ॥ २ ॥ शब्दीं जेवितां

---

१ सेवा न करितां धन्याजवळ मजुरी मागणें व्यर्थ. १ अनुक्रमानें. २ अजगळपणें ३ सोंगांतील राजे सिंहासनावर बसले.

तृप्ती झाली । हे तों वार्ता नाहीं ऐकिली । पाकनिष्पत्ती पाहिजे केली । साक्षेपें स्वयें ॥ ३ ॥ (अंतर्भाव स० २-९-१०-११)

[ २ ]

बोलूनि शब्दज्ञान । क्रिया घडेना तत्प्रमाण । तरी तें जाण विपर्रीत ज्ञान । निश्चयेंसी ॥ १ ॥ ज्ञान बोलतां वाटे सोपें ॥ परी आचरल्या वीण होती सोपे । शब्द क्रिया एकरूपें । असतां बरें ॥ ७ ॥ जैसें मुखें ज्ञान बोले । तैसी स्वयें क्रिया चाले । तयाचीं वंदीन पाउलें । साष्टांग भावें ॥ ३ ॥ (अन्वयव्यतिरेक स. ५)

---

## निस्पृहलक्षण.

आचार भ्रष्ट होऊं नये । दिल्या द्रव्य घेऊं नये । उणा शद्ब येऊं नये । आपणावरी ॥ १ ॥ धंड मळीण नेसों नये । गोड अन्न खाऊं नये । दुराग्रह करूं नये । प्रसंगें वर्तावें ॥ २ ॥ भोगीं मन असों नये । देह दुःखें त्रासों नये । पुढें आशा धरूं नये । जीवित्वाची ॥ ३ ॥ विरक्ति गळों देऊं नये । धारिष्ट चळों देऊं नये । ज्ञान मळीण होऊं नये । विवेक बळें ॥ ४ ॥ पोटीं चिंता धरूं नये । कष्टें खेद मानूं नये । समर्थी धारि सांडूं नये । कांहीं केल्या ॥५॥ अपमानितां शिणों नये । निंदितां कष्टों नये । धिःकारितां झुरों नये । कांहीं केल्या ॥ ६ ॥ लोकलाज धरूं नये । लाजवितां लाजों नये । खिजवितां खिजों नये । विरक्त पुरुषें ॥ ७ ॥ शुद्ध मार्ग सोडूं नये । दुर्जनांसि तंडों नये । संबंध पडों देऊं नये । चांडाळांसी ॥ ८ ॥ तपाळपण धरूं नये । भांडवितां भांडों नये । उडावितां उडों नये । निजस्थिति आपुली ॥ ९ ॥ अनर्गलतां करूं नये । लोकलाज धरूं नये । कोठें तरी होऊं नये । आसक्त कदा ॥ १० ॥ अति वाद करूं नये । अनीति पोटीं धरूं नये ।

---

१ भलतें. २ धड असावें परंतु मलीन वस्त्र नेसूं नये. ३ अपमान केला असतांना. ४ खरा. ५ वाद करूं नये. ६ आपली शांति चळूं देऊं नये. ७ स्वेच्छाचार.

रागें भरीं भरों नये । भलतीकडे ॥ ११ ॥ न मानी त्यास सांगों नये । कंटाळवाणें बोलों नये । बहुसाल असों नये । एके स्थळीं ॥ १२ ॥ थोरपणें असों नये । महत्त्व धरून बैसों नये । कांहीं मान इच्छूं नये । कोठें तरी ॥ १३ ॥ साधेपण[1] सांडूं नये । सानपण[2] मोडूं नये । बलात्कारें जोडूं नये । अभिमान अंगीं ॥ १४ ॥ कठिण शब्द बोलों नये । कठिण आज्ञा करूं नये । कठिणता धरूं नये । कोणे विषयीं ॥ १५ ॥ नीचे कृत्यीं लाजूं नये । वैभव होतां माजूं नये । क्रोधें भरीं भरों नये । जाणपणें ॥ १६ ॥ थोरपणें चुकों नये । न्याय नीति सांडूं नये । अप्रमाण वर्तों नये । कांहीं केल्या ॥ १७ ॥ कळल्याविण बोलों नये । अनुमानें निश्चय करूं नये । सांगतां दुःख धरूं नये । मूर्खपणें ॥ १८ ॥ सावधपण सोडूं नये । व्यापकपण सांडूं नये । कदा सुख मानूं नये । निसुगपणाचें[3] ॥ १९ ॥ परोपकार सांडूं नये । परपीडा करूं नये । विकल्प पडों देऊं नये । कोणी एकासी ॥ २० ॥ ज्ञानगर्व धरूं नये । सहसा छळणा करूं नये । कोठें वाद घालूं नये । कोणी एकासी ॥२१॥ हें शिकवण धरितां चित्तीं । सकळ सुखें वोळंगती[4] । अंगीं बाणे महंती ॥ अकस्मात[5] ॥ २२ ॥ दृश० १४ स० १

## निस्पृहता.

स्वतां निस्पृह असेना । त्याचें बोलणेंचि मानेना । कठिण आहे जनार्दना । राजी राखणें ॥ १ ॥ उत्कट भव्य तेंचि घ्यावें । मळमळीत अवघेंचि टाकावें । निस्पृहपणें विख्यात व्हावें । भूमंडळीं ॥२॥ द.१९रु.६

——:०:——

१ लहानपण. २ हलकें काम करण्यांत. ३ लोक लज्जा सोडून वागण्याचें ४ मिळतात. ५ लवकर.

## सत्वगुण लक्षण.*

श्रवण आणि मनन । निदिध्यासें समाधान । शुद्ध झालें आत्मज्ञान ॥ तो सत्वगुण ॥ १ ॥ सकळांसी नम्र बोले । मर्यादा धरून चाले । सर्वजन तोषविले । तो सत्वगुण ॥ २ ॥ जयासी अहंकार नसे । नैराश्यता विलसे । जयापाशीं कृपा वसे । तो सत्वगुण ॥ ३ ॥ सकळ जनासि आर्जव । नाहीं विरोधासी ठाव । परोपकारी वेंची जीव । तो सत्वगुण ॥ ४ ॥ आपकार्याहूनि जिवीं । परकार्य सिद्धि करावी । मरून कीर्ति उरवावी । तो सत्वगुण ॥ ५ ॥ पराव्याचे दोष गुण । दृष्टीस न देखे आपण । समुद्रा ऐसें सांठवण । तो सत्वगुण ॥ ६ ॥ नीच उत्तर साहणें । प्रत्युत्तर न देणें । आला क्रोध सांवरणें । तो सत्वगुण ॥ ७ ॥ अन्यायेंविण गांजिती । नानापरी पीडा करितीं । तितुकेंही सांठवी चित्तीं । तो सत्त्वगुण ॥ ८ ॥ शरीरें झीज साहणें । दुर्जनांसि मिळोनि[3] जाणें । निंदकांसि उपकार करणें । तो सत्वगुण ॥ ९ ॥ मन भलतीकडे धांवें । तें विवेकें आवरावें । इंद्रियदमन करावें । तो सत्वगुण ॥ १० ॥ सत्क्रिया[4] आचरावी । असत्क्रिया[5] त्यागावी । वाट भक्तीची धरावी ॥ तो सत्वगुण ॥ ११ ॥ संत कृपा होय जयास । तेणें उद्धरिला वंश[6] । तो ईश्वराचा अंश । सत्वगुणें ॥ १२ ॥ सन्मार्ग दाखवी जना । जो लावी हरी भजना । ज्ञान शिकवी अज्ञाना । तो सत्वगुण ॥ १३ ॥ परपीडेचें वाहे दुःख । परसंतोषाचें सुख । वैराग्य देखोनि मानी हरिख । तो सत्वगुण ॥१४॥ परभूषणीं भूषण । पर दूषणीं दूषण । परदुःखीं शिणे जाण । तो सत्वगुण ॥ १५ ॥ ऐसा हा सत्वगुण सात्विक । संसार सागरीं तारक । येणें उपजे विवेक । ज्ञान मार्गाचा ॥१६॥

---

* ( उत्तमगुण लक्षण. ) १ सतत चिंतन. २ परकेपणास. ३ दुर्जनांला मिळून त्यांना सन्मार्गास लावणें. ४ सत्कर्म. ५ निंद्यकर्म. ६ कूळ.

सत्वगुणें भगवद्भक्ति । सत्वगुणें ज्ञानप्राप्ती । सत्वगुणें सायुज्य मुक्ती । पाविजे ते ॥ १७ ॥
दश० २ स० ७

—:०:—

## विरक्त लक्षण.

जेणें सत्कीर्ति वाढे । जेणें सार्थकता घडे । जेणें करितां महिमा चढे । विरक्तांसी ॥ १ ॥ विरक्तें भक्ति वाढवावी । विरक्तें शांति दाखवावी । विरक्तें यत्नें करावी । विरक्ती आपुली ॥२॥ विरक्तें सत्क्रिया प्रतिष्ठावीं[1] । विरक्तें निवृत्ति[2] विस्तारावी । विरक्तें नैराश्यता धरावी । सुदृढ जीवीं ॥ ३ ॥ बहुतांस करावे परोपकार । भलेपणाचा जीर्णोद्धार । पुण्यमार्गाचा विचार । बळेंची करावा ॥ ४ ॥ विरक्तें सावध असावें । विरक्तें शुद्ध मार्गें जावें । विरक्तें झिजोनि उरवावें । सत्कीर्तीसी ॥ ५ ॥ विरक्तें उपाधी न करावी । आणि उदासवृत्ति न सांडावी । दुराशा जडों न द्यावी । कोणे एकेविषयीं ॥ ६ ॥ विरक्तें असावें अंतर्निष्ठ[3] । विरक्तें नसावें क्रियाभ्रष्ट । विरक्तें न व्हावें कनिष्ट । पराधीनपणें ॥ ७ ॥ विरक्तें एकदेशी[4] नसावें । विरक्तें सर्व अभ्यासावें । विरक्तें अवघें जाणावें । ज्याचें त्यापरी ॥ ८ ॥ कर्ममार्ग[5] उपासना[6] मार्ग । ज्ञानमार्ग सिद्धांत मार्ग । प्रवृत्तिमार्ग निवृत्ति मार्ग । सकळ जाणावें ॥ ९ ॥ विरक्तें शास्त्रें धांडोळावीं । विरक्तें मतें विभांडावीं[10] । विरक्तें मुमुक्षें लावावीं । शुद्ध मार्गीं ॥ १० ॥ विरक्तें

---

१ स्थापन करावी. २ वैराग्य. ३ ब्रह्मनिष्ठ. ४ एकाच बाजूनें विचार करणारा, अल्पज्ञ. ५ विधी मार्ग. ६ भक्ति मार्ग. ७ गुरुभक्ति मार्ग. ८ प्रपंच मार्ग. ९ वैराग्य मार्ग. १० खंडून टाकावीं.

शुद्धमार्ग सांगावा। विरक्तें संशय छेदावा। विरक्तें आपुला ह्मणावा। विश्वजनें ॥ ११ ॥ विरक्तें उत्तम गुण घ्यावे। विरक्तें अवगुण त्यागावे। नाना अपाय भंगावे। विवेकबळें ॥ १२ ॥ दश० २ स० ९

——:०:——

## सन्मार्गबोध.

न्यायें निष्ठुर बोलणें। बहुतांस वाटे कंटाळवाणें। मळमळ करितां जेवणें। विहित नव्हे ॥ १ ॥ बोलणें एक चालणें एक। त्याचें नांव हीनें विवेक। येणें करितां सकळ लोक। हांसों लागती ॥ ३ ॥ विषयत्यागें विण तों कांहीं। परलोक तो प्राप्त नाहीं। ऐसें बोलणें ठायीं ठायीं। बरें पहा ॥ ४ ॥ मागें ज्ञानी होऊनी गेले। तिहीं बहुत कष्ट केले। तरी मग विख्यात जाले। भूमंडळीं ॥ ५ ॥ वैराग्य मुळाहून नाहीं। ज्ञानप्रत्ययाचें नाहीं। शुचि आचार तोही नाहीं। भजन कैंचें ॥ ६ ॥ ऐसे प्रकारीचें जन। आपणास ह्मणती सज्जन। पाहों जातां अनुमान। अवघेंचि दिसे ॥ ७ ॥ जयास नाहीं अनुताप। हेंचि एक पूर्व पाप। क्षणक्षणां विक्षेप[3]। पराधिकपणें ॥८॥ मज नाहीं तुजसाजेना। हें तों अवघें ठाउकें आहे जना। खात्यास न खातें देखों शकेना। ऐसे आहे ॥ ९ ॥ भाग्य पुरुष थोर थोर। त्यांस निंदिती दिवाळखोर। सावास देखतां चोर। चरफडी जैसा ॥ १० ॥ वैराग्यापरतें नाहीं भाग्य। वैराग्य नाहीं तें अभाग्य। वैराग्य नसतां योग्य। परमार्थ नव्हे ॥ १ ॥ प्रत्यय ज्ञानी वीतरागी। विवेकबळें सकळ त्यागी। तो जाणिजे महायोगी। ईश्वरी पुरुष ॥ १२ ॥ दश १२ स० ८

---

१ सर्व लोक. २ अविचार. ३ दुसऱ्यांच्या उत्कर्षानें मन खळबळणें.

[library stamp]

## विवेक.

विवेकें तुटे अनुमान। विवेकें होय समाधान। विवेकें आत्मनिवेदन। मोक्ष लाभे ॥ ९-९-३९ ॥ लटिक्याची भीड धरणें। भ्रमें भलतेंचि करणें। ऐसीं नव्हेती लक्षणें। विवेकाचीं ॥ १४-९-२० ॥ खरें खोटें एकचि झालें। विवेकानें काय केलें। असार सांडून सार घेतलें। साधुजनीं ॥ १७-१०-२२॥

---

# ज्ञान—प्रकरण २ रें.

## कवि.

( कवींची प्रशंसा करावी तेवढी थोडीच आहे. समर्थांच्या कवी प्रशंसेवरून काव्याच्या अभ्यासाचें महत्त्व केवढें आहे हें विद्यार्थ्यांना कळेल. उत्तम काव्यांचा अभ्यास जेवढा करावा तेवढा थोडाच असून तो अनेक प्रकारें लाभदायक होतो. याचा विचार पुढील प्रकरणांत केला आहे. )

[ १ ]

कीं हे सरस्वतीचें निजस्थान¹। कीं हे नाना कळांचें जीवन। नाना शब्दांचें भुवन। यथार्थ होय ॥ १ ॥ अध्यात्म ग्रंथांची खाणी। कीं हे बोलके चिंतामणी। नाना कामधेनूंची दुभणी²। बोळली श्रोतयांवरी ॥ २ ॥ कवि मुमुक्षूंचें अंजन। कवि साधकांचें

---

१ वसतिस्थान. २ दुग्धस्राव.

साधन । कवि सिद्धांचें समाधान । निश्चयात्मक ॥ ३ ॥ कवि प्रेमळांची प्रेमळ स्थिती । कवि ध्यानस्थांची ध्यानमूर्ती । कवि उपासकांची वाड कीर्ती । विस्तारिली ॥ ४ ॥ नाना साधनांचें मूळ । कवि नाना प्रयत्नांचें फळ । नाना कार्यसिद्धी केवळ । कवींचेनि प्रसादें ॥ ५ ॥ आधीं कवीचा वाग्विलास । तरी मग श्रवणीं तुंबळे रस । कवींचेनि मतिप्रकाश । कवित्वास होय ॥ ६ ॥ कवि सृष्टीचा अलंकार । कवि लक्ष्मीचा शृंगार । सकळ सिद्धींचा निर्धार । ते हे कवी ॥ ७ ॥ कवि सभेचें मंडणं । कवि भाग्याचें भूषण । नाना सुखांचें संरक्षण । ते हे कवी ॥ ८ ॥ कवि देवाचें रूपकर्ते । कवि ऋषींचें महत्व वर्णिते । नाना शास्त्रांचे सामर्थ्यातें । कवि वाखाणिती ॥ ९ ॥ नसता कवीचा व्यापार । तरी कैंचा असता जगदुद्धार । ह्मणोनि कवि हे आधार । सकळ सृष्टीसी ॥ १० ॥ नाना विद्या ज्ञातृत्वें कांहीं । कवीश्वराविण तों नाहीं । कवी पासून सर्वही । सर्वज्ञता ॥ ११ ॥ मागां वाल्मीक व्यासादिक । झाले कवीश्वर अनेक । तयांपासून विवेक । सकळ जनांसी ॥ १२ ॥ पूर्वीं काव्यें होतीं केलीं । तरीच व्युत्पत्ति प्राप्त जाली । तेणें पंडितां अंगीं बाणली । परम योग्यता ॥ १३ ॥ परोपकारा कारणें । नाना निश्चय अनुवादणें । सेखीं बोलिलें पूर्णपणें । संशायातीत ॥ १४ ॥ कीं हे अमृताचे मेघ वोळले । कीं हे नवरसांचे ओघ लोटले । नाना सुखांचें उचंबळलें । सरोवर हें ॥ १५ ॥ कीं हीं विवेक निधींचीं भांडारें । प्रगट जाहलीं मनुष्याकारें । नाना वस्तूंचोनि विचारें । कोंदाटले हे ॥ १६ ॥ कीं हे आदिशक्तीचें ठेवणें । नाना पदार्थांस आणी उणें । लाधलें पूर्व संचितांच्या गुणें । विश्वजनासी ॥ १७ ॥ कीं हीं सुखाचीं तारुवें लोटलीं । अक्षय आनंदें उतटलीं ।

---

१ भक्तांची. २ वाणीचा विहार, क्रीडा. ३ पसरे. ४ भूषण. ५ जाणतेपण. ६ सांगणें. ७ विचार समुद्राची. ८ पूर्ण भरलें. ९ पूर्व पुण्यानें १० भरून आलीं.

विश्वजनास उपेगा आलीं । नाना प्रयोगा कारणें ॥ १८ ॥ आतां असो हा विचार । जगास आधारं कवीश्वर । तयांसी माझा नमस्कार । साष्टांग भावें ॥ १९ ॥ दश० १ स० ७

[ २ ]

जैसीं समर्थाचीं लेकुरें । नाना अलंकारीं सुंदरें । मुळ पुरुषाचेनि द्वारें । तैसे कवी । ६-७-१ ॥ जयास जैसें भासलें । तेणें तैसें कवित्व केलें । परि हें पाहिजे निवडिलें । प्रचीतीनें । ९-५-२३

---

## कवित्व.

कवित्वशब्दसुमन माळा । अर्थ परिमळ आगळा । तेणें संतषट्पंद[1] कुळा । आनंद होय ॥ १ ॥ परोपकाराकारणें । कवित्व अगत्य करणें । तया कवित्वाचीं लक्षणें । बोलिजेती ॥ २ ॥ जेणें घडे भगवद्भक्ती । जेणें घडे विरक्ती । ऐसिया कवित्वाची युक्ती । आधीं वाढवावी ॥ ३ ॥ क्रियेविण शब्दज्ञान । तया न मानिती सज्जन । ह्मणोन देव प्रसन्न । अनुतापें करावा ॥ ४ ॥ देवाचेनि प्रसन्नपणें । जे जें घडे बोलणें । तें अत्यंत श्लाघ्य[2]वाणें । या नांव प्रासादिक ॥ ५ ॥ धीट पाठ प्रासादिक । ऐसें बोलती अनेक । तरी हा त्रिविध विवेक । बोलिजेल ॥ ६ ॥ धीट ह्मणिजे धीटपणें केलें । जें जें आपुल्या मनास आलें । बळेंच कवित्व रचिलें । या नांव धीट बोलिजे ॥ ७ ॥ पाठ ह्मणिजे पाठांतर । बहुत पाहिलें ग्रंथांतर । तया सारिखा उतार[3] । आपणही केला ॥ ८ ॥ शीघ्रचि कवित्व केलें । दृष्टीं पडिलें तेंचि वर्णिलें । भक्तीवांचून जें केलें । त्या नांव धीटपाठ ॥ ९ ॥ कवित्व असावें निर्मळ । कवित्व असावें सरळ । कवित्व असावें प्रांजळ[4] । अन्वयाचें ॥ १० ॥ जेणें ज्ञान हें प्रबळे । जेणें वृत्ति हे मावळे । जेणें भक्तिमार्ग कळे । या नांव कवित्व ॥ ११ ॥ जेणें देह बुद्धि तुटे ।

---

१ संतरूपी भ्रमर समुदायास. २ भूषणावह. ३ तर्जुमा. ४ सन्या अर्थाचें.

जेणें भवसिंधु आटे । जेणें भगवंत प्रगटे । या नांव कवित्व ॥ १२ ॥ जेणें सद्बुद्धि लागे । जेणें पाषाण्ड भंगे । जेणें विवेक जागे । या नांव कवित्व ॥ १३ ॥ जेणें सद्वस्तु भासे । जेणें भास हा निरसे । जेणें भिन्नत्व नासे । या नांव कवित्व ॥ १४ ॥ दश० १४ स० ३

——:०:——

## ग्रंथ.

( वाचण्याकरितां ग्रंथ निवडावयाचे ते प्रासादिक, उत्तमोत्तम व बोधप्रद असेच असले पाहिजेत. ग्रंथ ही संज्ञा उत्तम पुस्तकांसच शोभण्यासारखी आहे. )

इतर जे प्रापंचिक । हास्य विनोद नव रसिक । हित नव्हे तें पुस्तक । परमार्थासी ॥ १ ॥ जेणें होय उपरती । अवगुण अवघे पालटती । जेणें चुके अधोगती । त्या नांव ग्रंथ ॥ २ ॥ जेणें धारिष्ट चढे । जेणें परोप कार घडे । जेणें विषय वासना मोडे[1] । त्या नांव ग्रंथ ॥ ३ ॥ जेणें परत्र साधन । जेणें ग्रंथें होय ज्ञान । जेणें होईजे पावन । त्या नांव ग्रंथ ॥ ४ ॥ ऐकोनिच फलश्रुती । पुढें तरी पावूं ह्मणती । तयां जन्म अधोगती । सहजची झाली ॥ ५ ॥ योगियांस पाहिजे योग । भोगियांस पाहिजे भोग । रोगियांस पाहिजे रोग-। हरती[5] मात्रा ॥ ६ ॥ कवींस पाहिजे प्रबंध । तार्किकांस तर्कवाद । भाविकांना संवाद गोड वाटे ॥ ७ ॥ पंडितांस पाहिजे व्युत्पत्ती[6] । विद्वानांस अध्ययन प्रीती । कलावंतां आवडती । नाना कळा ॥ ८ ॥ ऐसें सांगावें तें किती । आवडीसारिखें ऐकती । नाना पुस्तकें वाचिती । सर्वकाळ ॥ ९ ॥ ह्मणोनि नित्यानित्य विचार । जेथें बोलिला सारासार । तोचि ग्रंथ पैलपार । पाववी विवेकें ॥ १० ॥ दश. ७ स० ९

---

१ जागृत रहातो. २ कळे. ३ भ्रम. ४ नाहींशा होतात. ५ रोग हरण करणारी. ६ शास्त्रचर्चा.

## गुरु.

### [ १ ]

सद्गुरुविण ज्ञान कांहीं । सर्वथा होणार नाहीं । अज्ञान प्राणी प्रवाहीं । वाहातचि गेले ॥ १ ॥ जयास वाटे देव पहावा । तेणें सत्संग धरावा । सत्संगेंविण देवाधिदेवा । पाविजेत नाहीं [१]॥ २ ॥ नाना साधनें बापुडीं । सद्गुरुविण करिती वेडीं । गुरुकृपेविण कुडकुडीं [२] । व्यर्थचि होती ॥ ३ ॥ सद्गुरुकृपा न जोडे । आणि भलतीकडे वावडे । जैसे आंधळे चांचरूनि पडे । गारीं आणि गडदेरां ॥ ४ ॥ जैसें नेत्रीं घालितां अंजन [३] । पडे दृष्टीस निधान [४] । तैसें सद्गुरुवचनें ज्ञान । प्रकाश होय ॥ ५ ॥ सद्गुरुविण जन्म निर्फळ । सद्गुरुविण दुःख सकळ । सद्गुरुविण तळमळ । जाणार नाहीं ॥ ६ ॥ मागें झाले थोर थोर । संत महंत मुनीश्वर । तयांसहि ज्ञानविज्ञान विचार । सद्गुरुचेनि ॥ ७ ॥ श्रीरामकृष्ण आदिकरूनि । अति तत्पर गुरुभजनीं । सिद्धसाधु आणि संतजनीं । गुरुदास्य केलें ॥ ८ ॥ प्राणी मायाजाळीं पडिले । संसारदुःखें दुखवले । ऐसे जेणें मुक्त केले । तो सद्गुरु जाणावा ॥ ९ ॥ वासनानदीमहापूरीं । प्राणी बुडतां ग्लांती [५] करी । तेथें उडी घालून तारी । तो सद्गुरु जाणावा ॥ १० ॥ फोडानि शब्दांचें अंतर । वस्तु दाखवी निजसार । तोचि सद्गुरु माहेर । अनाथांचें ॥ ११ ॥ शिष्यांसी न लाविती साधन । न करविती इंद्रियें दमन । ऐसे गुरु अडक्यांचे [६] तीन । मिळाले तरी त्यजावे ॥ १२ ॥ जो कोणी ज्ञान बोधी । समूळ अविद्या छेदी । इंद्रियदमन प्रतिपादी । तो सद्गुरु जाणावा ॥ १३ ॥ एक द्रव्याचे विकिले । एक शिष्याचे

---

१ कष्टी. २ खांच खळग्यांत. ३ एके प्रकारचें काजळ. ४ ठेवा. ५ दुःख. ६ दमडीचे.

आंखिले । ऐसे दुराशेनें केलें । दीन रूप ॥ १४ ॥ जें जें रुचे शिष्यांचे मनीं । तैसीच करी मनधरणी । ऐसी कामना पापिणी । पडली गळां ॥ १५ ॥ जो गुरु भीडसारू[2] । तो अधमाहुनि अधम थोरू । चोरटा मैंद पामरू । द्रव्यभोंदू ॥ १६ ॥ जैसा वैद्य दुराचारी । केली सर्वस्वें बोहैरी[3] । आणि शेखीं भीड करी । घातघेणा[4] ॥ १७ ॥ अद्वैत निरूपणीं अगाधवक्ता । परी विषयीं लोलंगता । ऐसिया गुरुचेनि सार्थकता । होणार नाहीं ॥ १८ ॥ मुख्य सद्गुरूचें लक्षण । आधीं पाहिजे विमळ[5] ज्ञान । निश्चयाचें समाधान । स्वरूपस्थिती[6] ॥ १९ ॥ याहीवरी वैराग्य प्रबळ । वृत्ती उदास केवळ । विशेष आचारें निर्मळ । स्वधर्म विषयीं ॥ २० ॥ जेथें सारासार विचार । तेथें होय जगदुद्धार । नवविध भक्तीचा आधार बहुत जनांसी ॥ २१ ॥ म्हणोनि ज्ञान वैराग्य आणि भजन । स्वधर्म कर्म आणि साधन । कथा निरूपण श्रवण मनन । नीति न्याय मर्यादा ॥ २२ ॥ जो बहुतांचा पालन कर्ता । त्यास बहुतांची असे चिंता । नाना साधनें समर्था[7] । सद्गुरूपाशीं ॥ २३ ॥ नाना सद्विद्येचे गुण । याहिवरी कृपाळूपण । हें सद्गुरुचें लक्षण । जाणिजे श्रोतीं ॥ २४ ॥

द० ५ स १ व २

---

## गुरु.

[ २ ]

अज्ञानास भेटतां अज्ञान । तेथें कैसें सांपडेल ज्ञान । करंट्यास करंट्याचें दर्शन । होतां भाग्य कैचें ॥ १ ॥ रोग्यापाशीं रोगी गेला । तेथें कैचें आरोग्य त्याला । निर्बळापाशीं निर्बळाला । पाठी[8] कैंची ॥ २ ॥

---

१ अंकित झाले. २ भिडस्त. ३ नाश. ४ घातकी. ५ शुद्ध. ६ अंतःकरणाची एकाग्र स्थिति. ७ सद्गुरूच विशेषण. ८ रक्षण, आधार.

भिकाऱ्यापाशीं मागतां भिक्षा । दीक्षाहीनापाशीं दीक्षा । उजेड पाहतां कृष्णपक्षा । पाविजे कैंचा ॥ ३ ॥ या कारणें ज्ञाता पहावा । त्याचा अनुग्रह घ्यावा । सारासार विचारें जीवा । मोक्ष प्राप्त ॥ ४ ॥

दश. ६ स. १.

[ ३ ]

व्युत्पत्तीनें न कळे । तें सत्समागमें कळे । सकळ शास्त्रार्थ आकळे । स्वानुभवासी । ७-१-३९ । सद्गुरु कृपा कळे त्यासी । जो शोधील आपणासी । पुढें कळे अनुभवासी । आपेंआप वस्तु ॥ ६-१०-११ ॥

---

## सद्गुरु महिमा.

कां सरिता[२] गंगेसि मिळाली । मिळणी होतां[३] गंगा जाली । मग जरी वेगळी केली । तरी होणार नाहीं सर्वथा ॥ १ ॥ परी ते सरिता मिळणी मागें । ओहोळ मानिजेत जगें । तैसा नव्हे शिष्य वेगें । स्वामीच होय ॥ २ ॥ परिस आपणा ऐसें करीना । सुवर्णें[४] लोहो पालटेना । उपदेश करी बहुत जना । अंकित सद्गुरूचा ॥ ३ ॥ शिष्यास गुरुत्व प्राप्त होय । सुवर्णें सुवर्ण करितां नये । ह्मणोनि उपमा न साहे । सद्गुरूसी परिसाची ॥ ४ ॥ उपमे द्यावा सागर । तरी तो अत्यंतची क्षारें[५] । अथवा ह्मणों क्षीरसागर[६] । तरी तो नासेल कल्पांतीं[७] ॥ ५ ॥ उपमे द्यावा मेरू[८] । तरी तो जड पाषाण कठोरू । तैसा नव्हे कीं सद्गुरू । कोमळ दीनांचा ॥ ६ ॥ उपमे ह्मणों गगन । तरी गगनापरीस तें निर्गुण या कारणें दृष्टांत हीन । सद्गुरूस गगनाचा ॥ ७ ॥ धीरपणें उपमूं जगती[९] ।

---

१ उपदेश. २ नदी. ३ संगम होण्यापूर्वी. ४ सुवर्णाच्या योगानें. ५ खारट. ६ दुधाचा समुद्र. ७ प्रलयकालीं. ८ पर्वत. ९ पृथ्वी.

तरी हेहि खचेल[1] कल्पांतीं । ह्मणोन थोरत्वास दृष्टांतीं । हीन वसुंधरा ॥ ८ ॥ आतां उपमावा गभस्ती[2] । तरी गभस्तीच्या प्रकाश किती । शास्त्रें मर्यादा बोलती । सद्गुरु अमर्याद ॥ ९ ॥ ह्मणोन उपमेस उणा दिनकर । सद्गुरुज्ञानप्रकाश थोर । आतां उपमावा फणीवर[3] । तरी तोही भारवाही ॥ १० ॥ आतां उपमे द्यावें जळ । तरी तें काळांतरीं आटेल सकळ । सद्गुरु रूप तें निश्चळ । जाणार नाहीं ॥ ११ ॥ सद्गुरूसी उपमावें अमृत । तरी अमर[4] धरिती मृत्युपंथ । सद्गुरुकृपा यथार्थ । अमर[5] करी ॥ १२ ॥ सद्गुरूसी ह्मणावें कल्पतरू । तरी हा कल्पनातीत[6] विचारू । कल्पवृक्षाचा अंगिकारू । कोण करी ॥ १३ ॥

दश ३ स० ४.

---

## सद्गुरुसेवा.

असो ऐसे साधुजन । त्यांचें घडालिया भजन । तेणें भजनें पावन । इतर जन होती ॥ १ ॥ सद्गुरूचा जो अंकित साधक । तेणें केलाचि करावा विवेक । विवेक केलिया तर्क । फुटे निरूपणीं ॥ २ ॥ जो संतास शरण गेला । तो संतचि होऊन ठेला । इतर जनास उपेगा आला । कृपाळूपणें ॥ ३ ॥ ऐसें संतांचें महिमान । संतसंगें होतें ज्ञान । सत्संगा परतें साधन । आणिक नाहीं ॥ ४ ॥ गुरुभजनाचेनि आधारें । निरूपणाचेनि विचारें । क्रियाशुद्ध निर्धारें[7] । पाविजे पद[8] ॥ ५ ॥ शरणागतांची वाहे चिंता । तो एक सद्गुरु दाता । जैसें बाळक वाढवी माता । नाना यत्नें करूनी ॥ ६ ॥

दश ७ स. १०

---

१ नाश पावेल. २ सूर्य. ३ शेष. ४ देव. ५ मरणरहित. ६ कल्पनेपलीकडील. ७ निश्चयानें. ८ मोक्ष.

## शिष्य.

सद्गुरुविण सच्छिष्य । तो वायां जाय निःशेष[1] । कां सच्छिष्यें विण विशेष । सद्गुरु शिणे ॥ १ ॥ उत्तम भूमि शोधिली शुद्ध । तेथें बीज पेरिलें किडखाद[2] । कां तें उत्तम बीज परी संबंध । खडकेसि पडिला ॥ २ ॥ तैसा सच्छिष्य तो सत्पात्र । परी गुरु सांगे मंत्र तंत्र । तेथें अरत्र ना परत्र । कांहींच नाहीं ॥ ३ ॥ अथवा गुरु पूर्ण कृपा करी । परि शिष्य अनधिकारी । भाग्यपुरुषाचा भिकारी । पुत्र जैसा ॥ ४ ॥ ह्मणोनि सद्गुरु आणि सच्छिष्य । तेथें न लगती सायास । त्या उभयतांचा हव्यास । पुरे एकसरां ॥ ५ ॥ सुभूमि आणि उत्तम कण[3] । उगवेना पर्जन्यें विण । तैसें अध्यात्मनिरूपण । नसतां होय ॥ ६ ॥ शेत पेरिलें आणि उगवलें । परंतु निगेवांचों[4] गेलें । साधनेंविण तैसें जालें । साधकांसी ॥ ७ ॥ सदुपासना आणि सत्कर्म । सत्क्रिया आणि स्वधर्म । सत्संग आणि नित्यनेम । निरंतर ॥ ८ ॥ ऐसें हें अवघेंचि मिळे । तरीच विमळ ज्ञान निवळे[5] । नाहीं तरी पाषांड संचरे बळें । समुदायीं ॥ ९ ॥ येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरुपाशीं । सद्गुरु पालटी अवगुणासी । नाना यत्नें करूनी ॥ १० ॥ सद्गुरुचेनि असच्छिष्य पालटे । परंतु सच्छिष्यें असद्गुरु न पालटे । कां जें थोरपण तुटे । ह्मणोनियां[6] ॥ ११ ॥ मुख्य सच्छिष्याचें लक्षण । सद्गुरुवचनीं विश्वास पूर्ण । अनन्य भावें शरण । त्या नांव सच्छिष्य ॥ १२ ॥ शिष्य पाहिजे निर्मळ । शिष्य पाहिजे आचारशीळ[7] । शिष्य पाहिजे केवळ । विरक्त अनुतापी ॥ १३ ॥ शिष्य पाहिजे निष्ठावंत । शिष्य पाहिजे शुचिष्मंत । शिष्य पाहिजे नेमस्त । सर्व प्रकारीं ॥ १४ ॥ शिष्य पाहिजे

---

१ निःसंशय २ अयोग्य ३ धान्यबीज. ४ काळजी वांचून. ५ प्रगट होतें. ६ शिष्याच्या योगानें गुरू पालटला तर गुरूचा मोठेपणा कसा उरणार ! ७ सदाचारी.

सौक्षपी विशेष । शिष्य पाहिजे परम दक्ष । शिष्य पाहिजे अलक्ष ।[1] लक्षी ऐसा ॥ १५ ॥ शिष्य पाहिजे अति धीरें । शिष्य पाहिजे अति उदार । शिष्य पाहिजे अति तत्पर । परमार्थाविषयीं ॥ १६ ॥ शिष्य पाहिजे परोपकारी । शिष्य पाहिजे निर्मत्सरी । शिष्य पाहिजे अर्थांतरीं । प्रवेश-कर्ता ॥१७॥ शिष्य पाहिजे परम शुद्ध । शिष्य पाहिजे परम सावध । शिष्य पाहिजे अगाध । उत्तम गुणांचा ॥ १८ ॥ शिष्य पाहिजे प्रज्ञावंत । शिष्य पाहिजे प्रेमळ भक्त । शिष्य पाहिजे नीतिवंत । मर्यादेचा ॥ १९ ॥ शिष्य पाहिजे युक्तिवंत । शिष्य पाहिजे बुद्धिवंत । शिष्य पाहिजे सदसद्-। विचारें[4] घेता ॥ २० ॥ शिष्य असावा सात्विक । शिष्य असावा भजक । शिष्य असावा साधक । साधन कर्ता[5] ॥ २१ ॥ शिष्य असावा सद्विद्येचा । शिष्य असावा सद्भावाचा[6] । शिष्य असावा अंतरींचा ॥ परम शुद्ध ॥ २२ ॥ गुरुदेवां बरोबरी । करी तो शिष्य दुराचारी । भ्रांति बैसली अभ्यंतरीं । सिद्धांतें[7] नेणवे ॥ २३ ॥ ऐसें सच्छिष्याचें वैभव । सद्गुरु वचनीं दृढभाव । तेणें गुणें देवराव । स्वयेंचि होती ॥ २४ ॥ अंतरीं अनुतापें तापले । तेणें अंतर शुद्ध जालें । पुढें सद्गुरुवचनें निवाले । सच्छिष्य ऐसे ॥ २५ ॥ शरण सद्गुरूसी गेले । सच्छिष्य ऐसे निवडले । क्रिया पालटे झाले । पावनई ईश्वरीं ॥२६॥ सूकर[8] पूजिलें विलेपनें[9] । म्हैसां[10] मर्दिला चंदनें । तैसा विषयी ब्रह्मज्ञानें । विवेकें बोधिला ॥ २७ ॥ रासभें[11] उकरडां लोळे । तयास गरिमळ सोहळे । उलूकें[12] अंधारीं पळे । तया केवी हंसपंगती ॥ २८ ॥ तैसा विषय दारींचा

१ लक्ष्याच्या पलीकडील वस्तु जी परब्रह्म तिला पाहणारा. २ विशेष धैर्याचा. ३ बुद्धिमान. ४ खरासोटा याचा विचार करणारा. ५ साध्य करून घेणारा. ६ चांगल्या निष्ठेचा. ७ सत्यगोष्टी सत्यमार्ग. ८ डुक्कर. ९ सुगंध उटी लावून. १० रेडा. ११ गाढव. १२ घुबड.

बेराडी । घाली अधःपतनीं उडी । तयास भगवंतीं आवडी । सत्संग कैंचा ॥ २९ ॥ तैसें सज्जनाचे संगतीं । विषयी सज्जन ह्मणविती । विषय अभेय चित्तीं । गोळा लक्षिला ॥३०॥ घडी एक विश्वास धरी । सवेंच घडी एक गुर्गुरी । ऐसे नाना छंद करी । पिसाट जैसा ॥ ३१ ॥ काम क्रोध मद मत्सर । लोभ मोह नाना विकार । अभिमान कापट्य तिरस्कार । हृदयीं नांदती ॥ ३२ ॥ भक्ति विरक्ति ना शांती । सद्वृत्ति लीनता ना दांती । कृपा दया ना तृप्ती । सुबुद्धि असेचना ॥ ३३ ॥ आर्जव नाहीं जनासी । जो अप्रिय सज्जनासी । जयाचे जीवीं अह-र्निशीं । परन्यून वसे ॥ ३४ ॥ सदा सर्वकाळ लटिका । बोले मायिक लापणिका । क्रिया विचार पाहतां एका । वचनीं सत्य नाहीं ॥ ३५ ॥ परपीडे विषयीं तत्पर । जैसे विंचु आणि विखार । तैसा कुशब्द जिर्व्हार । भेदी सकळांचें ॥ ३६ ॥ आपुले झांकी अवगुण । पुढिलांसि बोले कठिण । मिथ्या गुणदोषेंविण । गुणदोष लावी ॥ ३७ ॥ स्वयें पापात्मा अंतरीं । पुढिलांची कणव न करी । जैसा हिंसक दुराचारी । परदुःखें शिणेना ॥ ३८ ॥ दुःख पराव्याचें नेणती । दुर्जन गांजिलेचि गांजिती । श्रमें पावतां आनंदती । आपुले मनीं ॥ ३९ ॥ असो ऐसे मदांध बापुडे । तयांसि भगवंत कैंचा जोडे । जयांस सुबुद्धि नावडे । पूर्व पातकें करूनी ॥ ४० ॥ प्रपंच सुखें करावा । परी कांहीं परमार्थ वाढवावा । परमार्थ अवघाचि बुडवावा । हें विहित नव्हे ॥ ४१ ॥

दश० ५ स० ३

---

१ भिकारी. २ नरकांत. ३ अपवित्र अशा विषयाच्या गोळ्याकडे लक्ष्य. ४ वेडा. ५ दमन. ६ खोटें भाषण. ७ सर्प. ८ अंतःकरण. ९ दयामाया. १० दुःख झालें असतांना.

## श्रवण.

[ १ ]

श्रवणें आतुडे भक्ती । श्रवणें उद्भवे विरक्ती । श्रवणें तुटे आसक्ती । विषयांची ॥ १ ॥ श्रवणें घडे चित्तशुद्धी । श्रवणें होय दृढ बुद्धी[1] । श्रवणें तुटे उपाधी । अभिमानाची ॥ २ ॥ श्रवणें निश्चयो घडे । श्रवणें ममता मोडे । श्रवणें अंतरीं जडे । समाधान ॥३॥ श्रवणें आशंका फिटे । श्रवणें संशय तुटे । श्रवण होतां पालटे । पूर्वगुण[3] आपुला ॥ ४ ॥ श्रवणें आवरे मन । श्रवणें घडे समाधान । श्रवणें तुटे बंधन । देहबुद्धीचें ॥ ५ ॥ श्रवणें मीपण जाये । श्रवणें धोका न्ये । श्रवणें नाना अपायें । भस्म होती ॥ ६ ॥ श्रवणें होय कार्यसिद्धी । श्रवणें लागे समाधी[4] । श्रवणें घडे सर्व सिद्धी । समाधानाची ॥ ७ ॥ सत्संगावरी श्रवण । तेणें[6] कळे निरूपण । श्रवणें होइजे आपण । कार[5] ॥ ८ ॥ श्रवणें प्रबोध[7] वाढे । श्रवणें प्रज्ञा[8] चढे । श्रवणें विषयांचे वेढे[9] । तुटोन जाती ॥ ९ ॥ श्रवणें विचार कळे । श्रवणें ज्ञान हें प्रबळे । श्रवणें वस्तु निवळे ॥ साधकांसी ॥ १० ॥ श्रवणें कुसंग तुटे । श्रवणें काम ओहटे[10] । श्रवणें धोका आटे । एकसरां ॥ ११ ॥ श्रवणें मोह नासे । श्रवणें स्फूर्ति प्रकाशे । श्रवणें सद्वस्तु भासे । निश्चयात्मक ॥ १२ ॥ श्रवणें होय उत्तम गती । श्रवणें आतुडे शांती । श्रवणें पाविजे[11] निवृत्ती । अचळ पद ॥ १३ ॥ श्रवणा ऐसें सार नाहीं । श्रवणें घडे सर्व कांहीं । भव-नदीच्या प्रवाहीं । तरणोपाय श्रवणें ॥ १४ ॥ ऐकिल्याविण कळेना । हें ठाउकें आहे जना । या कारणें मूळ प्रयत्ना । श्रवण आधीं ॥ १५ ॥

---

१ पक्क विचार. २ आसक्ती. ३ पूर्वस्वभाव. ४ चित्ताची एकाग्रता. ५ तद्रूप. ६ समज. ७ बुद्धि. ८ पाश. ९ प्रगटे. १० नाहींसा होतो. ११ मिळते.

बहुत साधनें पाहतां । श्रवणास न घडे साम्यता । श्रवणेंविण तत्वतां । कार्य न चले ॥ १६ ॥ न देखतां दिनकेर । पडे अवघा अंधकार । श्रवणेंविण प्रकार । तैसा होय ॥ १७ ॥ साधकांचे होती सिद्ध । अंगीं बाणतां प्रेबोध । हें तों आहे प्रसिद्ध । सकळांस ठाउक ॥ १८ ॥ ठाँयींचे खळ चांडाळ । तेचि होतीं पुण्यशीळ । ऐसा गुण तात्काळ । श्रवणाचा १९॥ जो दुर्बुद्धि दुरात्मा । तोचि होय पुण्यात्मा । अगाध महिमा । श्रवणाचा । बोलिला न वंचे ॥ २० ॥ तीर्थव्रतांची फळश्रुती । पुढें होणार सांगती । तैसें नव्हे हातीच्या हातीं । समंचित्त श्रवण ॥ २१ ॥ नाना रोग नाना व्याधी । तात्काळ तोडिजे औषधी । तैसी आहे श्रवणसिद्धी । अनुभवी जाणती ॥ २२ ॥ जेथें नाहीं नित्य श्रवण । तें जाणावें विलक्षण । तेथें साधकें एक क्षण । क्रमूं नये सर्वथा ॥ २३ ॥ श्रवणाचा अनादर । आळसें करी जो नर । त्याचा होय अपहार । स्वहिताविषयीं ॥ २४ ॥

दश ७ स० ८

[ २ ]

सकळ कांहीं ऐकतां कळे । कळतां कळतां वृत्ति निवळे । नेमस्त मनामध्यें आकळे । सारासार ॥ १ ॥ श्रवण ह्मणजे ऐकावें । मनन ह्मणिजे मनीं धरावें । येणें उपायें स्वभावें । त्रैलोक्य चाले ॥ २ ॥ जें जें कांहीं श्रवणीं पडिलें । तितकें समजोन विवरलें । तरीच कांहीं सार्थक झालें । निरूपणीं ॥ ३ ॥ मनीं दिसे तें मनीं धरावें । ज्याचें त्यानें आवरावें । आवरून विवेकें धरावें । अर्थांतरीं ॥ ४ ॥ दश १८ स. १०.

---

१ सूर्य. २ उत्तम ज्ञान. ३ स्वभावतः ४ सांगतां येत नाहीं असा. ५ श्रवणाचें फळ येथें हातच्याहातीं सेकडें मिळतें. ६ नाश. ७ खरें खोटें हें मनास खरोखर कळतें. ८ जें कांहीं कांनीं पडल्यावर तें समजून घेऊन त्यावर विचार झाला असतांना त्या उपदेशाचें सार्थक होतें. ९ अर्थ समजून विवेकपूर्वक ध्यानीं धरावें.

## श्रवण आणि मनन.

[ ३ ]

अरे हें पाहिलेंचि पहावें । विवरलेंचि मागुतें विवरावें । वाचिलाच वाचावें । पुनः पुनः । ११-८-९ । जें दृष्टीस न पडे ठावें । तें ऐकोन जाणावें । श्रवण मननें पडे ठावें । सकळ कांहीं । १७-१०-१३ । शुद्ध सोनें पाहोन घ्यावें । कसीं लाऊन तावावें । श्रवण मननें जाणावें । प्रत्ययासी । १८-५-१० । सकळांमध्यें विशेष श्रवण । श्रवणाहून थोर मनन । मननें होय समाधान । बहुत जनांचे । १९-२-२२ । धान्य उदंड मोजिलें । परी त्या मापें नाहीं भक्षिलें । विवरल्याविण तैसें झालें । प्राणी मात्रांसी ।
१८-५-१.

——०::०——

## मनन.

[ १ ]

मननशील लोकांपाशीं । अखंड देव अहर्निशीं । पाहतां त्यांच्या पूर्व संचितासी । जोडा[1] नाहीं ॥ १ ॥ अखंड योग ह्मणोनि योगी । योग नाहीं तो वियोगी । वियोगी तोही योगी । योगबळें ॥ २ ॥
स० १७ द० १ ( २२-२३ )

[ २ ]

या नांव जाणावें मनन । अर्थालागीं सावधान । निदिध्यासें समाधान । होत असे ॥ १ बोलिल्याचा अर्थ कळे । तरीच समाधान निवळे । अकस्मात अंतरी वोळे । निःसंदेहता ॥ २ ॥ सेविलेंचि सेवावें अन्न । घेतलेंचि घ्यावें जीवन । तैसें श्रवण मनन । केलेंचि करावें ॥३॥
दश ७ स. ८.

——————

१ उपमा. साम्य.

## ज्ञानार्जन.

ज्ञानेंविण कर्म विघडे । हें तों कल्पांतीं न घडे । सद्गुरुविण ज्ञान जोडे । हेंही अघटित ॥ १ ॥ ह्मणोन सद्गुरु करावा । सत्संग शोधून धरावा । तत्वविचार विवरावा । अंतर्यामीं ॥ २ ॥ तत्वें तत्व निरसोन जातां । आपला आपणाचि तत्वतां । अनन्य भावें सार्थकता । सहजचि जाहली ॥ ३ ॥ विचार न करितां जें जें केलें । तें तें वाउगें व्यर्थ गेलें । ह्मणोनि विचारीं प्रवर्तलें । पाहिजे आधीं ॥ ४ ॥ विचार पाहे तो पुरुषु । विचार न पाहे तो पशु । ऐसीं वचनें सर्वेशु । ठायीं ठायीं बोलिला ॥ ५ ॥ श्रवण मनन निदिध्यास । प्रचीतीनें बाणतां विश्वास । रोकडा साक्षात्कार सायास । करणेंचि नलगे ॥ ६ ॥

दश १० स. ९

---

## अभ्यास.

दुर्लभ शरीर दुर्लभ आयुष्य । याचा करूं नये नाश । दास ह्मणे सावकाश । विवेक पहावा ॥ १ ॥ न पाहतां उत्तम विवेक । अवघा होतो अविवेक । अविवेकें प्राणी रंक । ऐसा दिसे ॥ २ ॥ हें आपलें आपण केलें । आळसें उदास वागविलें । वाईट संगतीनें बुडविलें । देखत देखतां ॥ ३ ॥ बोलतां येईना । बैसतां येईना । प्रसंग कांहींच कळेना । शरीर मन हें वळेना । अभ्यासाकडे ॥ ४ ॥ लिहिणें नाहीं वाचणें नाहीं । पुसणें नाहीं सांगणें नाहीं । नेमस्तपणाचा अभ्यास नाहीं । वाष्कळपणें ॥ ५ ॥ आपणास कांहींच येईना । आणि शिकविलेंहि मानेना । आपण वेडा आणि सज्जना । बोल ठेवी ॥ ६ ॥

---

१ खंडन होतें—नाहींसें होतें. २ अपूर्व. ३ निरर्थक. ४ देव. ५ भिकारी.

एकाग्र करूनियां मन । बळेंचि धरावें साधन । यत्नीं आळसाचें दर्शन । होऊंच नये ॥ ७ ॥ अवगुण अवघेचि सांडावे । उत्तम गुण अभ्यासावे । प्रबंध पाठ करीत जावे । जाड अर्थे ॥ ८ ॥ कोणे प्रसंगीं काय ह्मणावें । ऐसें समजोन जाणावें । उगेंचि वाउगें शिणावें । कासयासी ॥ ९ ॥ पाठ उदंडचि असावें । सर्वकाळ उजेळीत जावें । सांगितले गोष्टींचें असावें । स्मरण अंतरीं ॥ १० ॥ अखंड एकांत सेवावा । ग्रंथ मात्र धांडोळावा । प्रतीत येईल तो घ्यावा । अर्थ मनीं ॥ ११ ॥

दश. १८ स. ३

---

## नित्यनेम.

(चांगल्या नित्यनेमानें मनुष्याची प्रगति होते व त्यांना चांगली संवय लागते.)

नित्यनेम दृढचित्तीं । तेणें शुद्ध चित्तवृत्ती । होवोनि भगवंतीं । मार्ग फुटे ॥ १ ॥ नित्यनेमें भ्रांती फिटे । नित्यनेमें संदेह तुटे । नित्यनेमें लिगटे । समाधान अंगीं ॥ २ ॥ नित्यनेम अंतर शुद्ध । नित्यनेमें वाढे बोध । नित्यनेमें बहु खेद । प्रपंचीं तुटती ॥ ३ ॥ नित्यनेमें सत्त्व चढे । नित्यनेमें शांती वाढे । नित्यनेमें थारा मोडे । देहबुद्धीचा ॥४॥ नित्य नेमें दृढभाव । नित्यनेमें भेटे देव । नित्यनेमें पुसे ठाव । अविद्येचा ॥ ५ ॥ नित्य नेम करूं कोण । ऐसा शिष्यें केला प्रश्न । केलें पाहिजे श्रवण । प्रत्ययाचें ॥ ६ ॥ ( अंतर्भाव–समास–३ )

---

१ कविता. २ नेहमीं उजळणी करावी. ३ अनेक ग्रंथ. ४ योग्यता. ५ आश्रय.

## एकांत.

विवेक एकांतीं करावा । जगदीश धारणेनें धरावा । लोक आपला आणि परावा । ह्मणोंचि नये ॥ १ ॥ एकांतीं विवेक ठायीं पडे । एकांतीं यत्न सांपडे । एकांतीं तर्क वावडे । ब्रह्मांड गोळीं ॥ २ ॥ एकांतीं स्मरण करावें । चुकलें निधानं पडे ठावें । अंतरात्म्या सरिसें फिरावें । कांहीं तरी ॥ ३ ॥ जयासि एकांत मानला । अवघ्या आधीं कळे त्याला । त्या वेगळें वडीलपणाला[२] । ठावचि नाहीं ॥ ४ ॥

दश १८ स. १

---

## संशय.

( संशय मनांत ठेऊं नये. त्याचें निराकरण केलेंच पाहिजे. संशय ठेऊन केलेलें काम व्यर्थ होय. )

संशयाचें ज्ञान खोटें । संशयाचें वैराग्य पोरेंटें[३] । संशयाचें भजन वोखटें । निर्फळ होय ॥ १ ॥ व्यर्थ संशयाचा देव । व्यर्थ संशयाचा भाव । व्यर्थ संशयाचा स्वभाव । सर्व कांहीं ॥ २ ॥ व्यर्थ संशयाचें व्रत । व्यर्थ संशयाचें तीर्थ । व्यर्थ संशयाचा परमार्थ । निश्चयेंविण ॥ ३ ॥ व्यर्थ संशयाची भक्ती । व्यर्थ संशयाची प्रीती । व्यर्थ संशयाची संगती । संशयो वाढवी ॥ ४ ॥ व्यर्थ संशयाचें जिणें । व्यर्थ संशयाचें धरणें । व्यर्थ संशयाचें करणें । सर्व काहीं ॥ ५ ॥ व्यर्थ संशयाची पोथी । व्यर्थ संशयाची व्युत्पत्ती[४] । व्यर्थ संशयाची गती । निश्चयें विण ॥ ६ ॥

दश० ५ स. १०

---

१ द्रव्यसंचय. २ थोरपणाला. ३ अपूर्ण. ४ ज्ञान.

## निश्चय.

( आपले आचार विचारपूर्ण व निश्चयात्मक पाहिजेत. )

निश्चयेंविण सर्व कांहीं । अणुमात्र तें प्रमाण नाहीं । व्यर्थचि पडिले प्रवाहीं । संदेहाचे ॥ १ ॥ निश्चयेंविण जें बोलणें । तें अवघेंची कंटाळवाणें । बाष्कळ बोलिजे वाचाळपणें । निरर्थक ॥ २ ॥ असो निश्चयेंविण जे वल्गना । ते अवघीच विटंबना । संशयें कांहीं समाधाना । उरी नाहीं ॥ ३ ॥ ह्मणोनि संदेहरहित ज्ञान । निश्चयाचें समाधान । तेंचि सिद्धांचें लक्षण । निश्चयेसीं ॥ ४ ॥ द. ५ स. १०

---

## प्रचीति अथवा अनुभव.

देहीं आरोग्यता जाली । ऐसी जनास प्रचीत आली । तरी मग अगत्यें घेतली । पाहिजे मात्रा[३] ॥ १ ॥ प्रचीतीविण औषध घेणें । तरी मग धडचि विघडणें[४] । अनुमानें जें कार्य करणें । तेंचि मूर्खपण ॥ २ ॥ ह्मणोन अनुमानाचें कार्य । भल्यांनीं कदापि करूं नये । उपाय पाहतां अपाय । नेमस्त घडे ॥ ३ ॥ संगति चोरांची धरितां । घात होईल तत्वतां । ठक सिंतरूं[५] शोधितां । ठायीं पडे ॥ ४ ॥ गैरसाळ[६] तामगिरी[७] । कोणी नवी मुद्रा करी[८] । नाना कपट परोपरी । शोधून पहावें ॥५॥ दिवाळखोरांचा मांड[९] । पाहतां वैभवही दिसे उदंड । परी तें अवघें थोतांड ।

---

१ अल्पबुद्धी २ फजिती. ३ मात्रेनें गुण आला असा अनुभव आल्यावर ज्या मात्रेच्या योगानें देहास आरोग्यता झाली. अशी जर लोकांची खात्री पटली तर मग ती मात्रा अवश्य घेतली पाहिजे. ४ खराब करणें. ५ फसवे लोक. ६ गैरशिस्त वर्तनाचा. खोटा. ७ तामसी. रागीट. ८ कोणी नवीन वेष धारण करून लोकांना फसवितात. ९ व्यापार.

भेंडे पुढें ॥ ६ ॥ तैसें प्रचीतीविण ज्ञान । तेथें नाहीं समाधान । करूनि बहुतांचें अनुमान । अनहित केलें ॥ ७ ॥ मंत्र तंत्र उपदेशिले । नेणते प्राणी गोंविले । जैसें झांकून मारिले । दुखणाईत ॥ ८ ॥ दुःखें अंतरीं झिजे । आणि वैद्यें पुसतां लाजे । तरी मग तयासि साजे । आत्महत्यारेपण ॥ ९ ॥ जाणत्यावरी गर्व केला । परी तो नेणतया करितां[३] बुडाला । येथें कोणाचा घात झाला । बरें पहा ॥ १० ॥ द.श१०स.८

## कल्पना.

( मनुष्यप्राण्यांचे ज्ञान हें कल्पनामय असतें. जसजशा कल्पना वाढत जातात, तसतशा पूर्वकल्पना अस्तंगत होऊन नवीन रूढ होतात. पुढें काळें करून त्याही नष्ट होतात. अशा रीतीनें मनुष्य प्राण्यांची ज्ञानप्रगति चालू असते. )

क्षणां एकातें उमजे । क्षणां एकातें निर्बुजे[४] । नाना विकारें[५] करिजे । ते कल्पना जाणावी ॥ १ ॥ कल्पना जन्माचें मूळ । कल्पना भक्तीचें फळ । कल्पना तेचि केवळ । मोक्षदाती ॥ २ ॥ असो ऐसी हे कल्पना । साधनें दे समाधाना[६] । येरवीं हे पतना । मूळचि कीं ॥ ३ ॥ ह्मणूनि सर्वांचें मूळ । ते हे कल्पनाच केवळ । इचें केलिया निर्मूळ । ब्रह्मप्राप्ती ॥ ४ ॥ श्रवण आणि मनन । निदिध्यासें समाधान । मिथ्या कल्पनेचें भान[७] । उडोनि जाय ॥ ५ ॥ मिथ्या कल्पनेचें कोडें । कैसें राहे साचापुढें । जैसें सूर्याचेनि उजेडें । नासे तम ॥ ६ ॥ कल्पनेनें कल्पना उडे । जसा मृगें मृग सांपडे । कां शरें शर आतुडे । आकाश मार्गीं ॥ ७ ॥ शुद्ध कल्पनेचें बळ । जालिया नासे सबळ[८] । हेंचि

१ फजिती. २ विचारलें असतांना. ३ स्वतः अज्ञानी राहिल्यामुळें. ४ न उमजे. ५ विकल्प. ६ सत्प्रयत्नानें ती समाधान देते. ७ भावना. ८ शेवल, अशुद्ध कल्पना.

वचन प्रांजळे । सावध ऐका ॥ ८ ॥ तैसें ज्ञान होतां मलिन । अज्ञान प्रबळे जाण । या कारणें श्रवण । अखंड असावें ॥ ९ ॥ दश. ७ स. ५

---

## विवेक आणि वैराग्य.

महद्भाग्य हातासि आलें । परी भोगूं नाहीं जाणितलें । तैसें वैराग्य उपजलें । परी विवेक नाहीं १ ॥ विवेकेंविण वैराग्य केलें । तरी अविवेकें अनर्थीं घातलें । अवघें व्यर्थचि गेलें । दोहींकडे ॥ २ ॥ ना प्रपंच ना परमार्थ । अवघें जिणेंचि झालें व्यर्थ । अविवेकें अनर्थ । ऐसा केला ॥ ३ ॥ कां व्यर्थचि ज्ञान बडबडिला । परी वैराग्य योग नाहीं घडला । जैसा कारागृहीं अडकला । पुरुषार्थ सांगे ॥ ४ ॥ वैराग्येंविण ज्ञान । तो व्यर्थचि स्वाभिमान । लोकदंभें घोंसळून । कासाविस केला ॥ ५ ॥ श्वान बांधिलें तरी भुंके । तैसा स्वार्थामुळें थिंके । परा[3]धिक देखों न शके । साभिमानें ॥ ६ ॥ जैसें मुखें ज्ञान बोले । तैशिच स[4]वें क्रिया चाले । दीक्षा देखोनी चाकित झाले । शुचिष्मंत ॥ ७ ॥ विवेक वैराग्य तें ऐसें । नुसतें वैराग्य हें का[5]डेपिसें । शब्दज्ञान येळि[6]लसें । आपणचि वाटे ॥ ८ ॥ ह्मणोन विवेक आणि वैराग्य । तेंचि जाणिजे महद्भाग्य । रामदास ह्मणे योग्य । साधू जाणती ॥ ९ ॥

दश १२ स ४

---

१ सत्य. २ चरफडतो. ३ परोत्कर्ष. ४ बरोबर. ५ कंटाळवाणें ६ मयुरपिसा प्रमाणें ( आंधळें ).

# व्यवहार-प्रकरण ३ रें.

## आळस.

[ १ ]

आळसें राहिला विचार । आळसें बुडाला आचार । आळसें नव्हे पाठांतर । कांहीं केल्या ॥ १ ॥ आळसें घडेना श्रवण । आळसें नव्हे निरूपण । आळसें परमार्थाची खूण । मळिण जाली ॥ २ ॥ आळसें नित्यनेम राहिला । आळसें अभ्यास बुडाला । आळसें आळस वाढला । असंभाव्य[1] ॥ ३ ॥ आळसें गेली धारणा[2] धृती[3] । आळसें मलिन जाली वृत्ती । आळसें विवेकाची गती । मंद झाली ॥ ४ ॥ आळसें निद्रा वाढली । आळसें वासना विस्तारली । आळसें शून्याकार झाली । सद्बुद्धि निश्चयाची ॥ ५ ॥ दुश्चित्तपणासवें आळस । आळसें निद्राविलास । निद्राविलासें केवळ नाश । आयुष्याचा ॥ ६ ॥ निद्रा आळस दुश्चित्तपण । हेंचि मूर्खाचें लक्षण । येणें[4] करितां निरूपण । उमजेचिना ॥ ७ ॥ हीं तिन्हीं लक्षणें जेथें । विवेक कैंचा असेल तेथें । अज्ञानास या परतें । सुखची नाहीं ॥८॥ दश. ८ स. ६

[ २ ]

आळसाचें फळ रोकडें । जांभया देऊन निद्रा पडे । सुख ह्मणोन आवडे । आळसी लोकां ॥ १ ॥ साक्षेप करितां कष्टती । परंतु पुढें सुरवाडती[5] । खाती जेविती सुखी होती । यत्नें करूनी ॥ २ ॥ आळस उदास नागवणा[6] । आळस प्रयत्न बुडवणा । आळसें करंटपणाच्या खुणा ।

---

१ अतर्क्य. २ स्मृति. ३ धैर्य. ४ त्या योगानें. ५ परंतु प्रयत्नांमुळें पुढें सुखी होतात. ६ नागवण करणारा.

वचन प्रांजळें । सावध ऐका ॥ ८ ॥ तैसें ज्ञान होतां मलिन । अज्ञान प्रबळे जाण । या कारणें श्रवण । अखंड असावें ॥ ९ ॥ दश. ७ स. ५

---

## विवेक आणि वैराग्य.

महद्भाग्य हातासि आलें । परी भोगूं नाहीं जाणितलें । तैसें वैराग्य उपजलें । परी विवेक नाहीं १ ॥ विवेकेंविण वैराग्य केलें । तरी अविवेकें अनर्थीं घातलें । अवघें व्यर्थचि गेलें । दोहींकडे ॥ २ ॥ ना प्रपंच ना परमार्थ । अवघें जिणेंचि झालें व्यर्थ । अविवेकें अनर्थ । ऐसा केला ॥ ३ ॥ कां व्यर्थचि ज्ञान वडबडिला । परी वैराग्य योग नाहीं घडला । जैसा कारागृहीं अडकला । पुरुषार्थ सांगे ॥ ४ ॥ वैराग्येंविण ज्ञान । तो व्यर्थचि स्वाभिमान । लोकदंभें घोंसळून । कासाविस केला ॥ ५ ॥ श्वान बांधिलें तरी भुंके । तैसा स्वार्थामुळें थिंके[3] । पराधिक देखों न शके । साभिमानें ॥ ६ ॥ जैसें मुखें ज्ञान बोले । तैशिच संवें[4] क्रिया चाले । दीक्षा देखोनी चाकित झाले । शुचिष्मंत ॥ ७ ॥ विवेक वैराग्य तें ऐसें । नुसतें वैराग्य हें कार्डपिसें । शब्दज्ञान येर्ळिलसें । आपणचि वाटे ॥ ८ ॥ ह्मणोन विवेक आणि वैराग्य । तेंचि जाणिजे महद्भाग्य । रामदास ह्मणे योग्य । साधू जाणती ॥ ९ ॥

दश १२ स ४

---

१ सत्य. २ चरफडतो. ३ परोत्कर्ष. ४ बरोबर. ५ कंटाळवाणें ६ मयूरपिसा प्रमाणें ( आंधळें ).

# व्यवहार-प्रकरण ३ रें.

## आळस.

[ १ ]

आळसें राहिला विचार । आळसें बुडाला आचार । आळसें नव्हे पाठांतर । कांहीं केल्या ॥ १ ॥ आळसें घडेना श्रवण । आळसें नव्हे निरूपण । आळसें परमार्थाची खूण । मळिण जाली ॥ २ ॥ आळसें नित्यनेम राहिला । आळसें अभ्यास बुडाला । आळसें आळस वाढला । असंभाव्य[1] ॥ ३ ॥ आळसें गेली धारणा धृती[2][3] । आळसें मालिन जाली वृत्ती । आळसें विवेकाची गती । मंद झाली ॥ ४ ॥ आळसें निद्रा वाढली । आळसें वासना विस्तारली । आळसें शून्याकार झाली । सद्‌बुद्धि निश्चयाची ॥ ५ ॥ दुश्चित्तपणासवें आळस । आळसें निद्राविलास । निद्राविलासें केवळ नाश । आयुष्याचा ॥ ६ ॥ निद्रा आळस दुश्चित्तपण । हेंचि मूर्खाचे लक्षण । येणें[4] करितां निरूपण । उमजेचिना ॥ ७ ॥ हीं तिन्हीं लक्षणें जेथें । विवेक कैंचा असेल तेथें । अज्ञानास या परतें । सुखची नाहीं ॥ ८ ॥ दश. ८ स. ६

[ २ ]

आळसाचें फळ रोकडें । जांभया देऊन निद्रा पडे । सुख ह्मणोन आवडे । आळसी लोकां ॥ १ ॥ साक्षेप करितां कष्टती । परंतु पुढें सुरवाडती[5] । खाती जेविती सुखी होती । यत्नें करूनी ॥ २ ॥ आळस उदास नागवणा[6] । आळस प्रयत्न बुडवणा[6] । आळसें करंटपणाच्या खुणा ।

---

१ अतर्क्य. २ स्मृति. ३ धैर्य. ४ त्या योगानें. ५ परंतु प्रयत्नांमुळें पुढें सुखी होतात. ६ नागवण करणारा.

प्रगट होती ॥ ३ ॥ म्हणोनि आळस नसावा । तरीच पाविजे वैभवा । अरत्रीं परत्रीं जीवां । समाधान[1] ॥ ४ ॥ दश. ११ स. ३

[ २ ]

कोणी एक काम करितां होतें । न करितां तें मागें पडतें । या कारणें ढिलेपण तें । असोंचि नये ॥ १ ॥ जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला । जो आपणची कष्टत गेला । तोचि भला ॥ २ ॥

दश. १९ स. ९ ( १५-१६ )

—:०:—

## दक्षता.

[ १ ]

कोणाचा भरंवसा न धरावा । आपुला आपण विचार पहावा । तकवा[2] उदंड धरावा । हाही एक विषयीं[3] ॥ १ ॥ देहदुःखें कंदरों[4] नये । उदंडचि करावे उपाय । मग सर्व सुखाला काय । उणें आहे ॥ २ ॥ एकांतीं चाळना करावी । धारणा उदंड धरावी । नाना विचारणा करावी । अरिमित्रांची ॥ ३ ॥ प्रयत्नीं चुकों नये । सुखवासी[6] कामा नये । सुचावे नाना उपाय । अनेक विषयीं ॥ ४ ॥ उपाधींस कंटाळला । विचाराचा आळस आला । म्हणजे जाणावा चेवला । बुद्धीपासूनी ॥ ५ ॥ जेथें बहुत विचार । तेथें ईश्वर अवतार । मागें झाले थोर थोर । धकेचेपेटे सोसोनी ॥ ६ ॥ आपल्या मनासी रोधावें । परांतर शोधावें । क्षणक्षणां सांभाळावें । बदलेल म्हणुनी ॥ ७ ॥ ( सावधता प्रकरण. )

---

१ उद्योगशील वृत्तीनें समाधान होतें. २ हिंमत. ३ प्रत्येक बाबतींत. ४ कंटाळूं नये. ५ खऱ्या खोट्याविषयीं विचार. ६ सुखासक्त. ७ अंतरला. ८ धक्काबुक्की. ८ संकटें. ९ आवरून धरावें.

[२] ८८८

व्यवसायीं जो [१]मैळिण । त्यासि न कळे निरूपण । येथें पाहिजे सावधपण । अतिशयेंसी ॥ १ ॥ नाना रत्नें नाना नाणीं । दुश्चितपणें घेतां हानी । परीक्षा नेणतां प्राणी । ठकला तेथें ॥ २ ॥ तैसें निरूपणीं जाणा । आहाच पाहतां कळेना । [२]मऱ्हाठेंचि उमजेना । कांहीं केल्या ॥ ३ ॥

दश. ७ स. १

---

## उद्योग.

कांहींच भक्ति केली नसतां । आणि इच्छिती [३]प्रसन्नता । जैसें कांहींच सेवा न करितां । स्वामीस मागती ॥ १ ॥ आळसें काम नासतें । हें तों प्रत्ययास येतें । कष्टाकडे चुकवितें । हीन जन ॥ २ ॥ आधीं कष्टाचें दुःख सोसिती । ते सुखाचें फळ भोगिती । आधीं आळसें सुखावती । त्यांसी पुढें दुःख ॥ ३ ॥ इह लोक आणि परलोक । दोहींकडे सारखाच विवेक । दीर्घ[४]सूचनेचें कौतुक । कळलें पाहिजे ॥ ४ ॥ मेळविती तितुकें भक्षिती । ते कठिण काळीं मरोन जाती । दीर्घ सूचनेनें वर्तती । तोचि भले ॥ ५ ॥ जिहीं उदंड कष्ट केले । ते भाग्य भोगून [५]ठेले । येर बोलतचि राहिले । करंटे जन ॥ ६ ॥

दश. १८ स. ७

---

## व्यवहारज्ञान.

नाना देश भाषा मतें । भूमंडळीं असंख्यातें । बहु ऋषि बहु मतें । कैसीं निवडावीं ॥ १ ॥ वृष्टि होतांच अंकुर । सृष्टीवरी निघती

---

१ अविचारी. २ स्वभाषेंत सुगम असतांनाही. ३ वर, देणगी. ४ दूरदृष्टीचें. ५ ते भाग्य भोगून राहतात.

अपार । नाना तरु लहान थोर । कैसे निवडावे ॥ २ ॥ खेचरें भूचरें जळचरें । नाना प्रकारींचीं शरीरें । नाना रंग चित्रविचित्रें । कैसीं निवडावीं ॥ ३ ॥ कैसें दृश्य आकारलें[१] । नानापरी विकारलें । उदंडचि पैसावलें[२] । कैसें निवडावें ॥ ४ ॥ दिवसरजनीचे प्रकार । चांदणें आणि अंधकार । विचार आणि अविचार । कैसा निवडावा ॥ ५ ॥ विसर आणि आठवण । नेमस्त आणि बाष्कळपण । प्रचीत आणि अनुमान । येणें रीतीं ॥ ६ ॥ न्याय आणि अन्याय । होय आणि न होय । विवेकें-विण काय । उमजों जाणें ॥ ७ ॥ कार्यकर्ता आणि निकामी । शूर आणि कुकर्मी । धर्मी आणि अधर्मी । कळला पाहिजे ॥ ८ ॥ धनाढ्य आणि दिवाळखोर । साव आणि तस्कर[३] । खरें खोटें हा विचार । कळला पाहिजे ॥ ९ ॥ वरिष्ट आणि कनिष्ट । भ्रष्ट आणि अंतरनिष्ट[४] । सारासार विचार स्पष्ट । कळला पाहिजे ॥ १० ॥ दश १६ स० ९–

---

## चातुर्य लक्षण.

### [ १ ]

रूप लावण्य अभ्यासितां नये । सहज[५] गुणास न चले उपाय । कांहीं तरी धरावी सोय । आगंतुक[६] गुणांची ॥ १ ॥ काळें माणूस गोरें होईना । ओढाळास[७] यत्न चालेना । मुक्यास वाचा फुटेना । हा सहज गुण ॥ २ ॥ आंधळें डोळस होईना । बधिर तेही ऐकेना । पांगुळ पाय घेईना । कांहीं केल्या ॥ ३ ॥ कुरूपतेचीं लक्षणें । किती ह्मणोनि सांगणें । रूप लावण्य या कारणें । पालटेना ॥ ४ ॥ अवगुण[८] सोडितां

---

१ आकारास आलें. २ पसरलें. ३ चोर. ४ आत्मनिष्ठ. ५ नैसर्गिक. ६ श्रमसाध्य गुणांची. ७ जन्मतः द्वाड, अनावर. ८ दुर्गुण.

काव्य

जाती । उत्तम गुण अभ्यासितां येती । कुक्रिया सांडून शिकती । शहाणे विया ॥ ५ ॥ मूर्खपण सांडितां जातें । शहाणपण शिकतां येतें । कारभार करितां उमजतें । सकळ कांहीं ॥ ६ ॥ मान्यता आवडे जीवीं । तरी कां उपेक्षा करावी । चातुर्येंविण उंच पदवी । कदापि नाहीं ॥ ७ ॥ ऐसी प्रचित येते मना । तरी कां स्वहित कराना । सन्मार्गें चालतां जना । सज्जना माने ॥ ८ ॥ प्रयत्न करीना शिकेना । शरीर तेंही कष्टवीना । उत्तम गुण घेईना । सदा कोपी ॥ ९ ॥ न्यायें वर्तेल तो शहाणा । अन्यायी तो दैन्यवाणा । नाना चातुर्याच्या खुणा । चतुर जाणे ॥ १० ॥ जें बहुतांस मानलें । तें बहुतीं मान्य केलें । येर तें व्यर्थचि गेलें । जगन्निंद्य ॥ ११ ॥ समाधानें समाधान वाढे । मैत्रीनें मैत्री जडे । मोडितां क्षणमात्रें मोडे । बरेपण ॥ १२ ॥ चातुर्यें शृंगारे अंतर । वस्त्रें शृंगारे शरीर । दोहींमध्यें कोण थोर । बरें पहा ॥ १३ ॥ बाह्याकारें शृंगारिलें । तेणें लोकांच्या हातास काय आलें । चातुर्यें बहुतांस रक्षिलें । नानापरी ॥ १४ ॥ तनें मनें झिजावें । तेणें भले ह्मणोन घ्यावें । उगेंचि कल्पितां शिणावें । लागेल पुढें ॥ १५ ॥ लोकीं कार्य भाग आडे । तो कार्यभाग जेथें घडे । लोक सहजचि वोढे । कामासाठीं ॥ १६ ॥ ह्मणोन दुसऱ्यास सुखी करावें । तेणें आपण सुखी व्हावें । दुसऱ्यास कष्टवितां कष्टावें । लागेल स्वयें ॥ १७ ॥ समजले आणि वर्तले । तेचि भाग्य पुरुष झाले । या वेगळे उरले । ते करंटे पुरुष ॥ १८ ॥ आळसें कार्यभाग नासतो । साक्षेपें होत होत होतो । दिसते गोष्टी कळेना तो । शहाणा कैसा ॥ १९ ॥ मैत्री करितां होतें कृत्य । वैर करितां होतो मृत्य । बोलिलें हें सत्य कीं असत्य । ओळखावें ॥ २० ॥ आपणास शहाणे करूं नेणे । आपलें हित आपण नेणे । जनीं मैत्री राखों नेणे । वैर करी ॥ २१ ॥ ऐसे

१ व्यवहार. २ हयगय. ३ धांवत येतात. ४ प्रयत्नानें हळुहळू साध्य होतो.

प्रकारींचे जन । त्यांस ह्मणावें अज्ञान । तयांपाशीं समाधान । कोण पावे ॥ २२ ॥ बहुतांचे मुखीं उरावें[1] । बहुतांचें अंतरीं भरावें[2] । उत्तम गुणें विवरावें । प्राणीमात्रांसी ॥ २३ ॥ शहाणे करावे जन । पतित करावे पावन । सृष्टीमध्यें भगवद्भजन । वाढवावें ॥ २४ ॥ दश० १४ स. ६

[ २ ]

बहुतांचे बोलीं लागले । ते प्राणी अनुमानीं[3] बुडाले । मुख्य निश्चय चुकले । प्रत्ययाचा ॥ १ ॥ उदंडांचें उदंड ऐकावें । परी तें प्रत्ययें पाहावें । खरें खोटें निवडावें । अंतर्यामीं ॥ २ ॥ वेडे करावे शहाणे । तरीच जिणें श्लाघ्यवाणें[4] । उगेंच वादांग वाढविणें । हें मूर्खपण ॥ ३ ॥ उगीच करिती बडबड । परी करून दाखविणें हें अवघड । परस्थळ[5] साधनें जड । कठिण आहे ॥ ४ ॥ धक्के चपेटे सोसावे । नीच शब्द सोशीत जावे । पस्तावोन परावे । आपले होती ॥ ५ ॥ प्रसंग जाणोनि बोलावें । जाणपण[6] कांहींच न घ्यावें । लीनता धरून जावें । जेथें तेथें ॥ ६ ॥ जैसें जयास पाहिजे । तैसें तयास दीजे । तरी मग श्रेष्ठचि होइजे । सकळां मान्य ॥ ७ ॥ भूमंडळीं सकळांस मान्य । तो ह्मणों नये सामान्य । कित्येक लोक अनन्य[7] । तया पुरुषासी ॥ ८ ॥ दश. १५ स. ६

३ ]

हेतु समजोन उत्तर देणें । दुसऱ्यांचे जीवींचें समजणें । मुख्य चातुर्याचीं लक्षणें । तीं हीं ऐशीं ॥ १ ॥ चातुर्येंविण खटपट । ते वियाची[8] फळकट[9] । सभेमध्यें आटघाट । समाधान कैचें ॥ २ ॥ बहुत बोलणें ऐकावें । तेथें मौन्यची धरावें । अल्प चिंन्हें[10] समजावें । जगदंतर[11] ॥ ३ ॥

---

१ असावें. २ प्रिय व्हावें. ३ संशयांत, विकल्पांत. ४ स्तुत्य. ५ मोक्षभुवन किंवा शत्रूचा किल्ला साध्य करणें. ६ अभिमान. ७ शरणागत. ८ फोल. ९ वायफळ श्रम. १० थोड्याशा खुणेनें. ११ लोकांचा हेतु.

बाष्कळांमध्यें बैसों नये। उद्धटांसि तंडों नये। आपणा करितां खंडों नये। समाधान जनाचें ॥ ४ ॥ नेणपण सोडूं नये। जाणपणें फुगों नये। नाना जनांचें हृदय। मृदु शब्दें उकलावें ॥ ५ ॥ शोध घेतां आळसों नये। भ्रष्ट लोकीं बैसों नये। बैसलें तरी टाकूं नये। मिथ्यादोष ॥ ६ ॥ उत्तम गुण प्रगटवावे। मग भलत्यांसि बोलतां फावे। भले पाहोन करावे। शोधून मित्र ॥ ७ ॥ जगामध्यें जगमित्र। जिव्हेपाशीं असे सूत्र। कोठें तरी सत्पात्र। शोधून काढावें ॥ ८ ॥ दश. १८. स. २

——:o:——

## जाणतेपण.

### [ १ ]

नेणपणें झालें तें झालें। झालें तें होऊनि गेलें। जाणतेपणें वर्तलें। पाहिजे नेमस्त ॥ १ ॥ जाणत्याची संगति धरावी। जाणत्याची सेवा करावी। जाणत्याची सद्बुद्धि घ्यावी। हळुहळू ॥ २ ॥ जाणत्यापाशीं लिहों शिकावें। जाणत्यापाशीं वाचों शिकावें। जाणत्यापाशीं पुसावें। सकळ कांहीं ॥ ३ ॥ जाणत्यास करावा उपकार। जाणत्यास झिजवावें शरीर। जाणत्याचा पहावा विचार। कैसा आहे ॥ ४ ॥ जाणत्याचे संगतीनें भजावें। जाणत्याचे संगतीनें झिजावें। जाणत्याचे संगतीनें रिझावें। विवर विवरों ॥ ५ ॥ जाणत्याचीं कवित्वें शिकावीं। गद्यपद्यें ओळखावीं। माधुर्य वचनें समजावीं। अंतर्यामीं ॥ ६ ॥ जाणत्याचे पाहावे प्रबंध। जाणत्याचे वचन भेद। जाणत्याचे नाना संवाद। बरे शोधावे ॥ ७ ॥ जाणत्याची तीक्ष्णता। जाणत्याची सहिष्णुता। जाणत्याची उदारता। समजोन घ्यावी ॥ ८ ॥

---

१ निंद्य दोष पुढें आणूं नयेत. २ मग दुसऱ्यांना बोलतां येतें. ३ दोरी. ४ आनंद मानावा. ५ सहनशीलता.

जाणत्याचा भक्तिमार्ग । जाणत्याचा वैराग्य योग । जाणत्याचा अवघा प्रसंग । समजोन घ्यावा ॥ ९ ॥ जाणत्याचें पहावें ज्ञान । जाणत्याचें शिकावें ध्यान । जाणत्याचें सूक्ष्म चिन्ह । समजोन घ्यावें ॥१०॥

दश. १८ स. २

[ २ ]

जाणता तो कार्य करी । नेणता कांहींच न करी । जाणता तो पोटें भरी । नेणता भीक मागे ॥१॥ हें तों प्रगटचि असे । जनीं पाहतां प्रत्यक्ष दिसे । विद्येवीण करंटा वसे । विद्या तो भाग्यवंत ॥ २ ॥ आपुली विद्या न शिकसी । तरी काय भीक मागसी । जेथें तेथें बुद्धि ऐसी । वडिल सांगती ॥ ३ ॥ विद्या नाहीं बुद्धि नाहीं । विवेक नाहीं साक्षेप नाहीं । कुशलता नाहीं व्याप[2] नाहीं । ह्मणोनि प्राणी करंटा ॥ ४ ॥ पशुपक्षी गुणवंत । त्यास कृपा करी समर्थ । गुण नसतां जिणें व्यर्थ । प्राणीमात्रांचें ॥ ५ ॥ या कारणें उत्तम गुण । तेचि भाग्याचें लक्षण । लक्षणेंविण अवलक्षण । सहजचि झालें ॥ ६ ॥ जनामध्यें जो जाणता । त्यास आहे मान्यता । कोणी एक[3] विद्या असतां । महत्व पावे ॥ ७ ॥ प्रपंच अथवा परमार्थ । जाणता तोचि समर्थ । नेणता जाणिजे व्यर्थ । निष्कारण ॥ ८ ॥ नेणता प्राणी सिंतरे । नेणपणें तऱ्हे भरे । नेणपणें ठके विसरे । पदार्थ कांहीं ॥ ९ ॥ आपुलें स्वहित न कळे जना । तेणें भोगिती यातना । ज्ञान नेणतां अज्ञाना । अधोगती ॥ १० ॥

दश. ९ स. ४

---

१ खूण, स्वरूप. २ प्रपंच, व्यापार. ३ कोणती तरी.

## सदैव लक्षण. *

उपजत गुण शरीरीं । परोपकारी नानापरी । आवडे सर्वांचे अंतरीं । सर्व काळ ॥ १ ॥ सुंदर अक्षर लिहूं जाणे । चपळ शुद्ध वाचूं जाणे । अर्थांतर सांगों जाणे । सकळ कांहीं ॥ २ ॥ कोणाचें मनोगत तोडीना । भल्याची संगति सोडीना । सदैव लक्षणें अनुमाना । आणूनि ठेवी ॥ ३ ॥ तो सकल जनांसी व्हावा । जेथें तेथें नित्य नवा । मूर्खपणें अनुमान गोवा । कांहींच नाहीं ॥ ४ ॥ नाना उत्तम गुण सत्पात्र । तोचि मनुष्य जगन्मित्र । प्रगट कीर्ति स्वतंत्र । पराधीन नाहीं ॥ ५ ॥ राखे सकळांचें अंतर । उदंड करी पाठांतर । नेमस्तपणाचा विसर । पडणार नाहीं ॥ ६ ॥ जो मानला बहुतांसी । कोणी बोलों न शके त्यासी । धगधागित पुण्यराशी । महापुरुष ॥ ७ ॥ तो परोपकार करीतचि गेला । पाहिजे तो ज्याला त्याला । मग काय उणें तयाला । भूमंडळीं ॥ ८ ॥ सकळांसी नम्र बोलणें । मनोगत राखोन चालणें । अखंड कोणी एकाचें उणें । पडोंचि नेदी[1] ॥ ९ ॥ उत्तम गुणें शृंगारिला । तो बहुतांमध्यें शोभला । प्रगट प्रतापें उगवला । मार्तंड[2] जैसा ॥ १० ॥ जाणता पुरुष असेल जेथें । कलह कैंचा उठेल तेथें । उत्तम गुणाविषयीं रितें[3] । ते प्राणी करंटे ॥ ११ ॥ मागें एक पुढें एक । ऐसा कदापि नाहीं दंडक । सर्वत्रांसि अलौलिक[4] । तया पुरुषाची ॥ १२ ॥ पाहतां अवघे उत्तम गुण । तयास वाईट ह्मणेल कोण । जैसा आत्मा संपूर्ण । सर्वांघटीं ॥ १३ ॥ दुसऱ्यांच्या दुःखें दुखावे । दुसऱ्यांच्या सुखें सुखावे । अवघेचि सुखी असावें । ऐसी वासना ॥ १४ ॥ उदंड मुलें नानापरी । वडिलांचें मन अवघ्यांवरी । तैसी अवघ्यांची चिंता करी ।

---

* भाग्यवंतांचीं लक्षणें. १ दुसऱ्याचें कधीं उणें पडूं देत नाहीं. २ सूर्य. ३ उत्तम गुण रहित. ४ आवड, अगत्य.

महापुरुष ॥ १५ ॥ उत्तम गुणास मनुष्य वेंधे[1] । वाईट गुणास मनुष्य खेदे । तीक्ष्ण बुद्धि लोकं साधे । काय जाणती ॥ १६ ॥ बहुतांसि वाटे मी थोर । सर्वमान्य पाहिजे विचार । धीर उदार गंभीर । महापुरुष ॥ १७ ॥ जितुके कांहीं उत्तम गुण । तें समर्थाचें लक्षण । अवगुण तें करंट लक्षण । सहजचि झालें ॥ १८ ॥ दश. १९ स. ४

---

## उत्तम लक्षण.

वाट पुसल्याविण जाऊं नये । फळ ओळखिल्याविण खाऊं नये । पडिली वस्तु घेऊं नये । एकाएकीं ॥ १ ॥ अति वाद करूं नये । पोटीं कपट धरूं नये । शोधिल्याविण करूं नये । कुलहीन कांता[2] ॥ २ ॥ विचारेंविण बोलों नये । विवंचनेंविण[3] चालों नये । मर्यादेविण हालों नये[4] । कांहीं केल्या ॥ ३ ॥ जनीं आर्जव[5] तोडूं नये । पापद्रव्य[6] जोडूं नये । पुण्यमार्ग सोडूं नये । कदाकाळीं ॥ ४ ॥ निंदाद्वेष करूं नये । असत्संग धरूं नये । द्रव्य दारा हरूं नये । बलात्कारें ॥ ५ ॥ वक्त्यास खोंडूं नये[7] । ऐक्यतेसी फोडूं नये । विद्याभ्यास सोडूं नये । कांहीं केल्या ॥ ६ ॥ तोंडाळाशीं भांडों नये । वाचाळाशीं तंडों नये । संतसंग खंडूं नये । अंतर्यामीं ॥ ७ ॥ अतिक्रोध करूं नये । जिवलगांस खेदूं नये । मनीं वीट मानूं नये । शिकवणीचा ॥ ८ ॥ क्षणक्षणां रुसों नये । लटिका पुरुषार्थ[8] बोलों नये । केल्याविण सांगों नये । आपुला पराक्रम ॥ ९ ॥ बोलिला बोल विसरों नये । प्रसंगीं सामर्थ्य चुकों नये । केल्याविण निखंदूं[9] नये । पुढिलांसी कदा ॥ १० ॥ आळसें सुख मानूं नये । चहाडी

---

१ लुब्ध होतो. २ बायको. ३ निष्काळजीनें. ४ मर्यादा सोडूं नये. ५. सरळपणा. ६ पापानें मिळविलेला पैसा. ७ खोदून खोदून प्रश्न विचारूं नये. ८ बढाई. ९ निषेध करूं नये.

मनास आणूं नये । शोधिल्याविण करूं नये । कार्य कांहीं ॥ ११ ॥ सुखा अंग देऊं नये । प्रयत्न पुरुषें सांडूं नये । कष्ट करितां त्रासों नये । निरंतर ॥ १२ ॥ सभेमध्यें लाजों नये । बाष्कळपणें बोलों नये । पैज होडें घालूं नये । कांहीं केल्या ॥ १३ ॥ कोणाचा उपकार घेऊं नये । घेतला तरी राखों नये । परपीडा करूं नये । विश्वासघात ॥ १४ ॥ व्यापकपण सोडूं नये । पराधीन होऊं नये । आपुलें ओझें घालूं नये । कोणाएकासी ॥ १५ ॥ बहुत अन्न खाऊं नये । बहुत निद्रा करूं नये । बहुत दिवस राहूं नये । पिशुनाचे येथें ॥ १६ ॥ तोंडीं शिवी असूं नये । दुसऱ्यासी देखोनि हांसों नये । उणें अंगीं संचरूं नये । कुळवंताचे ॥ १७ ॥ देखिली वस्तु चोरूं नये । बहुत कृपण होऊं नये । जिवलगांसि करूं नये । कलह कदा ॥ १८ ॥ कोणाचा घात करूं नये । लटकी ग्वाही देऊं नये । अप्रमाण वर्तूं नये । कदा काळीं ॥ १९ ॥ चाहाडी चोरी करूं नये । परद्वार करूं नये । मागें उणें बोलूं नये । कोणाएकाचें ॥ २० ॥ अल्प धनें माजूं नये । हरीभक्तीसि लाजूं नये । मर्यादेविण चालूं नये । पवित्र जनीं ॥ २१ ॥ सभा देखोनि गळूं नये । समयीं उत्तर टळूं नये । धिक्कारितां ढळूं नये । धारिष्ट आपुलें ॥ २२ ॥ सत्य मार्ग सोडूं नये । असत्य पंथें जाऊं नये । कदा अभिमान घेऊं नये । असत्याचा ॥ २३ ॥ अपकीर्ति सांडावी । सत्कीर्ति वाढवावी । विवेकें दृढ धरावी । वाट सत्याची ॥ २४ ॥

दश. २ स. २

——:o:——

१ एकूं नये. २ तपास केल्याशिवाय. ३ प्रतिज्ञा. ४ उद्योगीपणा. ५ मित्र नातलग. ६ साक्ष. ७ व्यभिचार. ८ घाबरूं नये. ९ दुर्लौकिक.

## उत्तम पुरुष लक्षण.

आपण यथेष्ट[1] जेवणें । उरलें अन्न तें वांटणें । परंतु वांयां दवडणें । हा धर्म नव्हे ॥ १ ॥ तैसें ज्ञानें तृप्त व्हावें । तेंचि ज्ञान जनास सांगावें । तरतें[2] बुडों न यावें । बुडत्यासी ॥ २ ॥ उत्तम गुण स्वयें घ्यावे । ते बहुतांस सांगावे । वर्तल्याविण बोलावे । ते शब्द मिथ्या ॥ ३ ॥ शरीर परोपकारीं लावावें । बहुतांच्या कार्यास यावें । उणें पडों न द्यावें । कोणी एकाचें ॥ ४ ॥ अडलें गांजलें जाणावें । यथाशक्ति कामास यावें । मृदुवचन बोलत जावें । कोणी एकासी[3] ॥ ५ ॥ दुसऱ्याच्या दुःखें दुःखी व्हावें । परसंतोषें सुखी व्हावें । प्राणी मात्रांस मेळवून घ्यावें । बऱ्या शब्दें ॥ ६ ॥ बहुतांचे अन्याय क्षमावे । बहुतांचे कार्यभाग करावे । आपल्यापरीस व्हावें । पारिखें जन ॥ ७॥ दुसऱ्याचें अंतर जाणावें । तदनुसारची वर्तावें । लोकांस परीक्षित जावें । नाना प्रकारें ॥८॥ नेमकेंचि बोलावें । तात्काळचि प्रतिवचन[4] द्यावें । कदापि रागासी न यावें । क्षमारूपें ॥ ९ ॥ आळस अवघाच दवडावा । यत्न उदंडचि करावा । शब्दमत्सर न करावा । कोणी एकाचा ॥ १० ॥ उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा । शब्द निवडून बोलावा । सावधपणें करीत जावा । संसार आपुला ॥ ११ ॥ मरणाचें स्मरण असावें । हरिभक्तीस सादर व्हावें । मरोनि कीर्तीस उरवावें । येणें प्रकारें ॥ १२ ॥ नेमकपणें वर्तों लागला । तो बहुतांस कळों आला । सर्व आर्जवी तयाला । काय उणें ॥ १३ ॥ ऐसा उत्तम गुणीं विशेष । तयास ह्मणावें पुरुष । जयाच्या भजनें जगदीश । तृप्त होय ॥ १४ ॥ उदंड धिःकारून बोलती । तरी चळों नेदावी शांती । दुर्जनास मिळोन जाती । धन्य ते साधु ॥ १५ ॥

---

१ पोटभर. २ तरत्यानें. ३ सर्वांशीं. ४ उत्तर.

उत्तमगुणीं शृंगारिला । ज्ञान वैराग्यें शोभला । तोचि एक जाणावा भला ।भूमंडळीं ॥ १६ ॥ स्वयें आपण कष्टावें ।बहुतांचें सोशित जावें । झिजोन कीर्तीसि उरवावें। नाना प्रकारें॥१७॥आपलें अथवा परावें।कार्य अवघें करावें । प्रसंगीं कामास चुकवावें । हें विहित नव्हे ॥१॥ कठिण शब्दे वाईट वाटतें । हें तों प्रत्ययास येतें । तरी मग वाईट बोलावें तें । काय निमित्तें ॥ १९ ॥ आपणास चिमोटा घेतला । तेणें कासावीस झाला । आपणावरून दुसऱ्याला । राखीत जावें ॥ २० ॥ जे दुसऱ्यास दुःख करी । ते अपवित्र वैखरी । आपणास घात करी । कोणी एके प्रसंगीं ॥ २१ ॥ पेरिलें तें उगवतें । बोलण्यासारखें उत्तर येतें । तरी मग कर्कश बोलावें तें । काय निमित्तें ॥ २२ ॥ आपुल्या पुरुषार्थ वैभवें । बहुतांस सुखी करावें । परंतु कष्टी करावें । हे राक्षसी क्रिया ॥ २३ ॥ क्रियेविण शब्दज्ञान । तेंचि श्वानाचें वमन । भले तेथें अवलोकन । कदापि न करिती ॥ २४ ॥ बोलण्यासारखें चालणें । स्वयें करून बोलणें । तयांचीं वचनें प्रमाणें । मानिती जनीं ॥२५॥ दश.१२ स. १०

---

## महंत लक्षण.

—:०:—

जाणावें पराचें अंतर । उदासीनता निरंतर । नीति न्यायास अंतर । पडोंच न द्यावें ॥१॥ दोष देखोन झांकावे । अवगुण अखंड न बोलावे । दुर्जन सांपडोन सोडावे । परोपकार करूनी ॥ २ ॥ दुसऱ्यांचें अभीष्ट जाणावें । बहुतांचें बहुत सोसावें । न सोसे तरी जावें । दिगंतराप्रती ॥ ३ ॥ दुःख दुसऱ्याचें जाणावें । ऐकोन तरी वांटून घ्यावें । बरें वाईट सोसावें । समुदायाचें ॥ ४ ॥ अपार असावें पाठांतर । सन्निध

---

१ योग्य. २ कारण. ३ कुतऱ्याचें. ४ कल्याण. ५ देशांतराला.

असावा विचार । सदा सर्वदा तत्पर । परोपकारासी ॥ ५ ॥ शांति करून करवावी । तऱ्हे[1] सांडून सांडवावी । क्रिया करून करवावी । बहुतां करवीं ॥ ६ ॥ जो बहुतांचें सोसीना । त्यास बहुत लोक मिळेना । बहुत सोसितां उरेना । महत्त्व आपुलें[2] ॥ ७ ॥ हिरवटांसि[3] दूरी धरावें । कचरटांसि[4] न बोलावें । संबंध पडतां सांडूनि जावें । एकीकडे ॥ ८ ॥ जो एकांतास तत्पर । आधीं करी पाठांतर । अथवा शोधी अर्थांतर[5] । ग्रंथगर्भींचें ॥ ९ ॥ आधींच शिकोन जो शिकवी । तोचि पावे श्रेष्ठ पदवी । गुंतल्या लोकांस उगवीं[6] । विवेकबळें ॥ १० ॥ जयास यत्नचि आवडे । नाना प्रसंगीं पवाडे[7] । धीटपणें प्रगटे. दडे । ऐसा नव्हे[8] ॥ ११ ॥ सांकडींमध्यें[9] वर्तों जाणे । उपाधीमध्यें मिळों जाणे । अलिप्तपणें[10] राखों जाणे । आपणासी ॥ १२ ॥ राखों जाणे नीतिन्याय । न करी न करवी अन्याय । कठिण प्रसंगीं उपाय । करूं जाणे ॥ १३ ॥ ऐसा पुरुष धारणेचा । तोचि आधार बहुतांचा । दास ह्मणे रघुनाथाचा । गुण घ्यावा ॥ १४ ॥ दश. ११ स. ५ व ६.

[ २ ]

बहुतीं शोधून पाहिलें । बहुतांच्या मनास आलें । तरि मग जाणावें साधिलें । महत्कृत्य ॥ १ ॥ अखंड एकान्त सेवावा । अभ्यासचि करीत जावा । काळ सार्थकचि करावा । जनासहित ॥ २ ॥ आधीं कष्ट मग फळ । कष्टचि नाहीं तें निर्फळ । सांक्षेपेंविण[11] केवळ । वृथापुष्ट ॥ ३ ॥ लोक बहुत शोधावे । त्यांचे अधिकार[12] जाणावे । जाण जाणानि

१ तऱ्हेवाईक स्वच्छंदी वागणें. २ फारचशांति धरली तर आपला बोज रहात नाहीं. ३ छन्नी भाषण करणारा. ४ हलकट. ५ अर्थाचें मर्म. ६ बाहेर काढतो. ७ शिरतो, भिऊन पळत नाहीं. ८ पळतो, मार्गें सरत नाहीं ९ संकटांत. १० विकार होऊं देत नाहीं. ११ उद्योगवांचून पुष्ट होणें व्यर्थ. १२ योग्यता.

धरावे । जवळी दुरी ॥ ४ ॥ अधिकारपरत्वें कार्य होतें । अधिकार नसतां व्यर्थ जातें । जाणोनि शोधावीं चित्तें । नानाप्रकारें ॥ ५ ॥ अधिकार पाहोन कार्य सांगणें । साक्षेप पाहोन विश्वास धरणें । आपला मगज राखणें । कांहीं तरी ॥ ६ ॥ दश. ११ स. १०

——:o:——

## गृहस्थाश्रम. *

नाना वेष नाना आश्रम । सर्वांचें मूळ गृहस्थाश्रम । जेथें पावती विश्राम । त्रैलोक्यवासी ॥ १ ॥ या कारणें गृहस्थाश्रम । सकळांमध्यें उत्तमोत्तम । परंतु पाहिजे स्वधर्म । आणि भूतदया ॥ २ ॥ अंतरा पासून वैराग्य । तेंचि जाणावें महद्भाग्य । लोलंगतेयेवढें अभाग्य । आणिक नाहीं ॥ ३ ॥ वेडे संसार सांडून गेले । तरी ते कष्ट कष्टोनि मेले । दोहींकडे अंतरले । इहलोकीं परत्रीं ॥ ४ ॥ निघोन गेला परी अज्ञान । त्याचे संगतीं लागले जन । गुरुशिष्य दोघे समान । अज्ञानरूपें ॥ ५ ॥ दश. १४ स. ७

——:o:——

# बोध–प्रकरण ४ थें.

## नरदेह.

( नरदेहाचें श्रेष्ठत्व वर्णन करून रामदास ह्मणतात या देहाच्या योगानें असंख्य प्रकारच्या साधनांचा लाभ करून घेतां येतो. या नरदेहाच्या ठि-कांणीं कांहीं व्यंग असल्यास तो अगदीं व्यर्थ गेला असें समजावें. )

[ १ ]

या नरदेहाचेनि आधारें। नाना साधनांचेनि द्वारें। मुख्य सारासार

* गृहस्थाश्रम–ज्या आश्रमांत मनुष्य स्त्री घरदार वगैरे करून संसार करतो तो.

१ जवळ किंवा दूर. २ अक्कल.

विचारें । बहुत सुटले ॥ १ ॥ या नरदेहाचेनि संबंधें । बहुत पावले उत्तम पदें । अहंता सांडून स्वानंदें । सुखी जाले ॥ २ ॥ नरदेहीं येऊन सकळ । ऊर्ध्वगती पावले केवळ । येथें संशयाचें मूळ । खंडोनि गेल ॥ ३ ॥ पशुदेहीं नाहीं गती । ऐसे सर्वत्र बोलती । ह्मणोन नरदेहींच प्राप्ती । परलोकाची ॥ ४ ॥ संत महंत ऋषि मुनी । सिद्ध साधु समाधानी । भक्त मुक्त ब्रह्मज्ञानी । विरक्त योगी तपस्वी ॥ ५ ॥ तत्वज्ञानी योगाभ्यासी । ब्रह्मचारी दिगंबर संन्यासी । षड्दर्शनी तापसी । नरदेहींच जाले ॥ ६ ॥ ह्मणोनि नरदेह श्रेष्ट । नाना देहांमध्यें वरिष्ट । जयाचेनि चुके अरिष्ट । यमयातनेचें ॥ ७ ॥ नरदेह हा स्वाधीन । सहसा नव्हे पराधीन । परंतु हा परोपकारी झिजवून । कीर्तिरूपें उरवावा ॥ ८ ॥ अश्व वृषभ गायी ह्मसी । नाना पशु स्त्रिया दासी । कृपाळूपणें सोडितां त्यासी । कोणी तरी धरील ॥ ९ ॥ तैसा नव्हे नरदेहो । इच्छा जावो अथवा राहो । परी यास कोणी पहा हो । बंधन करूं शकेना ॥ १० ॥ नरदेह पांगुळा असता । तरी तो कार्यास न येता । अथवा थोटा जरी असता । तरी पारोपकारास न ये ॥ ११ ॥ नरदेह अंध असला । तरी तो निर्पटचि वांयां गेला । अथवा बधिर जरी असला । तरी निरूपण नाहीं ॥ १२ ॥ नरदेह असला मुका । तरी घेतां नये आंशंका । अशक्त रोगी नासका । तरी तो निष्कारण ॥ १३ नरदेह असला मूर्ख । अथवा फेंपऱ्या समंधाचें दुःख । तरी तो जाणावा

---

१ अज्ञान विमुक्त झाले. २ आत्मानंदाच्या योगानें. ३ उत्तमगति. ४ न्याय, वैशेषिक, सांख्य, पातंजल पूर्वमीमांसा व उत्तर मीमांसा हीं सहा शास्त्रें जाणणारे. ५ संकट. ६ घोडे. ७ बैल. ८ अगदीं. ९ कथन. १० शंका. ११ पिशाचबाधा.

निरर्थक । निश्चयेंसी ॥ १४ ॥ सांग नरदेह जोडला । आणि परमार्थ बुद्धि विसरला । तो मर्ख कैसा भ्रमला । माया जाळीं ॥१५॥ द.१स.१०

[ २ ]

नरदेह परम दुर्लभ । येणें घडे अलभ्य लाभ । दुर्लभ तें सुलभ । होत जातें ॥ १ ॥ वरकड देह हें कावोड[2] । नरदेह मोठें घबाडें[3] । परंतु पाहिजे जाड । विवेक रचना ॥ २ ॥ येथें जेणें आळस केला । तो सर्वस्वें बुडाला । देव नाहीं ओळखिला । विवेक बळें ॥ ३ ॥ नर तोचि नारायण । जरी प्रत्ययें करी श्रवण । मननशीळ अंतःकरण । सर्वकाळ ॥ ४ ॥ जेण स्वयेंचि पोहावें । त्यास कांसेस[4] नलगे लागावें । स्वतंत्रपणें शोधावें । सकळ कांहीं ॥ ५ ॥ सकळ शोधून राहिला । संदेह कैंचा तयाला । पुढें विचार कैसा जाला । त्याचा तोचि जाणे ॥ ६ ॥ दश. २० स. ५

[ ३ ]

देह परलोकींचें तारूं । नाना गुणांचा आगरू । नाना रत्नांचा विचारू । देहाचेनि ॥ १ ॥ देहामध्यें आत्मा असतो । देह पूजितां आत्मा तोषतो । देह पीडितां आत्मा क्षोभतो । प्रत्यक्ष आतां ॥ २ ॥ देहा वेगळी पूजा पावेना । देहाविण पजा फावेना । जनीं जनार्दन ह्मणोनि जना । संतुष्ट करावें ॥ ३ ॥ पूज्य पूजेसि अधिकार । उगेचि तोषवावे इतर । दुखवूं नये कोणाचें अंतर । ह्मणिजे बरें ॥ ४ ॥ दश. १८ स. ८

---

१ परिपूर्ण. २ भारवाहक. ३ ठेवा. ४ कमरेस.

## दुश्चित्तपण.

( मनुष्यानें व्यवहारांत निरंतर अगदीं सावचित्त किंवा सावध असलें पाहिजे. जो असावधपणें वागतो त्याची अनेक प्रकारांनीं हानि होते. )

दुश्चित्तपणें[1] कार्य नासे । दुश्चित्तपणें चिंता वसे । दुश्चित्तपणें स्मरण नसे । क्षण एक पाहतां ॥ १ ॥ दुश्चित्तपणें शत्रु जिणें[2]। दुश्चित्तपणें जन्म-मरणें । दुश्चित्तपणाचेनि गुणें[3] । हानि होय ॥ २ ॥ दुश्चित्तपणें नव्हे साधन । दुश्चित्तपणें न घडे भजन । दुश्चित्तपणें नव्हे ज्ञान । साधकांसी ॥ ३ ॥ दुश्चित्तपणें नव्हे निश्चयो । दुश्चित्तपणें न घडे जयो । दुश्चित्त-पणें होय क्षयो । आपुल्या स्वहिताचा ॥ ४ ॥ दुश्चित्तपणें न घडे श्रवण । दुश्चित्तपणें न घडे विवरण । दुश्चित्तपणें निरूपण । हातींचें जाय ॥ ५ ॥ सावध असोन उमजेना । श्रवण असोन ऐकेना । ज्ञान असोन कळेना । सारासार विचार ॥ ६ ॥ ऐसा जो दुश्चित्त आळसी । परलोक कैंचा त्यासी । जयाचे जिवीं अहर्निशीं[4] । आळस वसे ॥ ७ ॥ निजोन उठतांच दुश्चित्त । कदा नाहीं सावचित्त[5] । तेथें कैंचें आत्महित । निरूपणीं ॥ ८ ॥ मर्कटापाशीं दिलें रत्न । पिशाच्या हातीं निधान[6] । दुश्चित्तापुढें निरूपण । तयापरी होय ॥ ९ ॥ अवगुण त्यागावया कारणें । न्यायें निष्ठुर लागे बोलणें । श्रोतीं कोप न धरणें । ऐसिया वचनाचा ॥ १० ॥

———— दश० ८ स० ६

## कुबुद्धि.

( दुसऱ्यांविषयीं वाईट बुद्धि धरणें, हें आपल्या अनाहितास कारणीभूत असतें. सर्वांविषयीं सद्बुद्धि धरावी. )

मध्यान्हीं थुंकितां सूर्यावरी । तो थुंका पडे आपणावरी । दुस-

---

१ असावधपणें, दुर्लक्षानें. २ शत्रूकडून जिंकलें जाणें. ३ योगानें. ४ रात्रं-दिवस. ५ सावध, ६ द्रव्य, खजिना.

-ऱ्यांस चिंतितां अंतरीं । आपणास घडे ॥ १ ॥ समर्थ रायाचें महिमान । जाणतां होतें समाधान । परंतु भुंकों लागलें श्वान । तरि तें श्वानचि असे ॥ २ ॥ दश. ९ स. ३

---

## कुविद्यालक्षण.

कुविद्येचा प्राणी असे । तो कठिण निरूपणें त्रासे । अवगुणांची समृद्धि असे । म्हणूनियां ॥ १ ॥ काम क्रोध मद मत्सर । लोभ दंभ तिरस्कार । गर्व ताठा अहंकार । द्वेष विवाद विकल्पी ॥ २ ॥ नेणे आणि नायके । न ये आणि न शिके । न करी आणि न देखे । अभ्यास दृष्टीं ॥ ३ ॥ अज्ञान आणि अविश्वासी । छळवादी आणि दोषी । अभक्त आणि भक्तांसी । देखों शकेना ॥ ४ ॥ पापी आणि निंदक । कष्टी आणि घातक । दुःखी आणि हिंसक । अतिशयेंसी ॥ ५ ॥ अधीर[1] ओंळका अनाचारी । अंध पंगु खोकलेकरी । थोटा बधिर दमेकरी । तरी ताठा न सांडी ॥ ६ ॥ विद्याहीन वैभवहीन । कुळहीन लक्ष्मीहीन । शक्तिहीन सामर्थ्यहीन । अदृष्टहीनें[2] भिकारी ॥ ७ ॥ बलहीन कळाहीन । मुद्राहीन दीक्षाहीन[3] । लक्षणहीन लावण्यहीन । अंगहीन विपारीं[4] ॥ ८ ॥ युक्तीहीन बुद्धिहीन । आचारहीन विचारहीन । क्रियाहीन सत्वहीन । विवेकहीन संशयी ॥ ९ ॥ भक्तिहीन भावहीन । ज्ञानहीन वैराग्यहीन । शांतिहीन क्षमाहीन । सर्वहीन क्षुल्लक ॥ १० ॥ समय नेणे प्रसंग नेणे । प्रयत्न नेणे अभ्यास नेणे । आर्जव नेणे मैत्री नेणे । कांहींच नेणे अभागी ॥ ११ ॥ ऐसीं कुविद्येचीं लक्षणें । ऐकोनि त्यागचि करणें । अभिमानें तऱ्हे भरणें । हें विहित नव्हे ॥ १२ ॥ दश. २ स. ३

---

१ हावरा. २ दुर्दैवी. ३ कोणत्याही प्रकारची रीत नेम नाहीं असा. ४ कुरूप.

## करंट अथवा कुलक्षण.

पापाकरितां दरिद्र प्राप्त। दरिद्रें होय पाप संचित। ऐसेंचि होत जात। क्षणक्षणां ॥ १ ॥ या कारणें करंट लक्षणें। ऐकोनि त्यागाचि करणें। ह्मणजे कांहीं एक बाणे। सदैव लक्षण ॥२॥ करंट्यास आळस आवडे। यत्न कदापि नावडे। त्याची वासना वावडे। अधर्मीं सदा ॥ ३ ॥ सदा भ्रमिष्ठ निद्सुरा। उगेंचि बोले सैरावैरा। कोणी एकाच्या अंतरा। मानेचिना ॥ ४ ॥ लिहों नेणे वाचूं नेणे। सवदासूत घेऊं नेणे। हिशोब कितेब राखों नेणे। धारणा नाहीं ॥ ५ ॥ जनासी मैत्री करीना। कठिण शब्द बोले नाना। मूर्खपणें आवरेना। कोणी एकासी ॥ ६ ॥ शब्द सांभाळून बोलेना। आवरितां आवरेना। कोणी एकासी मानेना। बोलणें त्याचें ॥ ७ ॥ कोणी एकाशीं विश्वास नाहीं। कोणी एकाशीं सख्य नाहीं। विद्या वैभव कांहींच नाहीं। उगाचि ताठा ॥ ८ ॥ राखावीं बहुतांचीं अंतरें। भाग्य येतें तदनंतरें। ऐसीं हीं विवेकाचीं उत्तरें। ऐकणार नाहीं ॥ ९ ॥ स्वयें आपणास कळेना। शिकविलें तें ऐकेना। तयासी उपाय नाना। काय करिती ॥ १० ॥ कांहीं नेमकपण आपुलें। बहुत जनांसी कळों आलें। तेचि मनुष्य मान्य झालें। भूमंडळीं ॥ ॥ ११ ॥ झिजल्यावांचूनि कीर्ति कैंची। मान्यता नव्हे कीं फुकाची। जिकडे तिकडे होते छी छी। अवलक्षणें ॥ १२ ॥ भल्यांची संगती धरीना। आपणास शाहणे करीना। तो आपला आपण वैरी जाणा। स्वहित नेणे ॥ १३ ॥ लोकांसी बरें करावें। तें उसणें सवेंचि घ्यावें। ऐसें जयाच्या जीवें। जाणिजेना ॥ १४ ॥ जेथें नाहीं उत्तम गुण। तें करंटपणाचें लक्षण। बहुतांसी न माने तें अवलक्षण। सहजचि झालें ॥ १५ ॥ कार्या कारण सकळ कांहीं। कार्येंविण तों कांहींच

---

१ झोपाळू. २ अचाट्या. ३ व्यापार समजत नाहीं. ४ बुद्धि.

नाहीं । निकामी तो दुःखप्रवाहीं । वाहातचि गेला ॥ १६ ॥ बहुतांसि मान्य थोडा । त्याच्या पापास नाहीं जोडा । निराश्रयी पडे उघडा । जेथें तेथें ॥ १७ ॥ या कारणें अवगुण त्यागावे । उत्तम गुण समजोनि घ्यावे । तेणें मनासारिखें फावे । सकळ कांहीं ॥ १८ ॥ दश. १९ स. ३

---

## मूर्खलक्षण.

जन्मला जयांचे उदरीं । तयांसी जो विरोध करी । सखी मानिली अंतुरी । तो एक मूर्ख ॥ १ ॥ सांडून सर्वही गोत । स्त्रिये आधीन जीवित । सांगे अंतरींची मात । तो एक मूर्ख ॥ २ ॥ परस्त्रीसी प्रेमा धरी । श्वशुरगृहीं वास करी । कुळेंविण कन्या वरी । तो एक मूर्ख ॥ ३ ॥ आपली आपण करी स्तुती । स्वदेशीं भोगी विपत्ति । सांगे वडिलांची कीर्ती । तो एक मूर्ख ॥ ४ ॥ अकारण हास्य करी । विवेक सांगतां न धरी । जो बहुतांचा वैरी । तो एक मूर्ख ॥ ५ ॥ धरूनि पराची आस । प्रयत्न सांडी सावकाश । निसुगाईचा मानी संतोष । तो एक मूर्ख ॥ ६ ॥ घरीं विवेक उमजे । आणि सभेमध्यें लाजे । शब्द बोलतां निर्बुजे । तो एक मूर्ख ॥ ७ ॥ आपणाहून जो श्रेष्ठ । तयासी अत्यंत निकट । शिकवणीचा मानी वीट । तो एक मूर्ख ॥ ८ ॥ एकाएकीं एकसरां । जाला विषयीं निलाजरा । मर्यादा सांडून सैरा । वर्ते तो एक मूर्ख ॥ ९ ॥ औषध नेघे असोन व्यथा । पथ्य न करी सर्वथा । न मिळे आलिया पदार्था । तो एक मूर्ख ॥ १० ॥ संगेविण विदेशीं फिरे । ओळखीविण संग धरी । उडी घाली महापूरीं । तो एक मूर्ख ॥ ११ ॥ आपणास जेथें मान । तेथें अखंड करी गमन । रक्षूं नेणे

---

१ तुलना, उपमा. २ द्वेष. ३ स्त्री. ४ कुलहीन. ५ कारणावांचून. ६ निस्संगपणाचा. ७ गोंधळतो. ८ कंटाळा. ९ स्वैर. १० संगतीवांचून परदेशीं प्रवास करतो.

मानाभिमान । तो एक मूर्ख ॥ १२ ॥ सेवक जाला लक्ष्मीवंत । तयाचा होय अंकित । सर्व काळ जो दुश्चित । तो एक मूर्ख ॥ १३ ॥ विचार न करितां कारण[1] । दंड करी अपराधांविण । स्वल्पासाठीं जो कृपण । तो एक मूर्ख ॥ १४ ॥ स्वयें नेणे परोपकार । उपकाराचा अनुपकार[2] । करी थोडें बोले फार । तो एक मूर्ख ॥ १५ ॥ तपीळ[3] खादाड आळशी । कुश्चिळ[4] कुटिल[5] मानसीं । धारिष्ट नाहीं जयापाशीं । तो एक मूर्ख ॥ १६ ॥ विद्या वैभव ना धन । पुरुषार्थ सामर्थ्य ना मान । कोरडाच वाहे अभिमान । तो एक मूर्ख ॥ १७ ॥ लंडी[6] लटिका लबाड । कुकर्मी कुटिल निचाड[7] । निद्रा जयाची वाड । तो एक मूर्ख ॥ १८ ॥ दंत चक्षु आणि घ्राण । पाणी[8] वसनें[9] आणि चरण । सर्वकाळ जयाचे मलिन । तो एक मूर्ख ॥ १९ ॥ क्रोधें अपमानें कुबुद्धि । आपणास आपण वधी । जयास नाहीं दृढ बुद्धि[10] । तो एक मूर्ख ॥ २० ॥ जिवलगांस परम खेदी[11] । सुखाचा शब्द तोहि नेदी । नीच जनासी वंदी । तो एक मूर्ख ॥ २१ ॥ आपणासी राखे परोपरी । शरणागतांसि अव्हेरी । लक्ष्मीचा भरंवसा धरी । तो एक मूर्ख ॥ २२ ॥ पुत्र कलत्र[12] आणि दारा । इतुकाचि मानूनियां थारा । विसरोन गेला ईश्वरा । तो एक मूर्ख ॥ २३ ॥ जैसें जैसें करावें । तैसें तैसें पावावें । हें जयास नेणवे । तो एक मूर्ख ॥ २४ ॥ देवद्रोही गुरुद्रोही । मातृद्रोही पितृद्रोही । ब्रह्मद्रोही स्वामीद्रोही । तो एक मूर्ख ॥ २५ ॥ परपीडेचें मानी सुख । परसंतोषाचें मानी दुःख । गेले वस्तूचा करी शोक । तो एक मूर्ख ॥ २६ ॥ तुक[13] तोडून बोले । मार्ग सांडून चाले । कुकर्मी मित्र केले । तो एक मूर्ख ॥२७॥ पंत[14] राखों नेणे कदा ॥ विनोद करी सर्वदा ।

१ कारणांचा विचार केल्यावांचून. २ कृतघ्नता. ३ तापट. ४ कुत्सित स्वभावाचा. ५ कपटी. ६ भित्रा. ७ निर्लज्ज. ८ हात. ९ वस्त्र. १० दृढनिश्चय. ११ कष्टीकरतो. १२ स्त्री. १३ सभ्यता. १४ अन्न.

हासतां खिजे पेटे द्वंद्वा। तो एक मूर्ख ॥ २८ ॥ सांडूनियां जग-दीशा। मनुष्याचा मानी भरंवसा। सार्थकेंविण वेंची वयसा[1]। तो एक मूर्ख ॥ २९ ॥ अल्प अन्याय क्षमा न करी। सर्वकाळ धारकीं[2] धरी। जो विश्वासघात करी। तो एक मूर्ख ॥ ३० ॥ अनीतिनें द्रव्य जोडी। धर्म नीति न्याय सोडी। संगतीचें मनुष्य तोडी। तो एक मूर्ख ॥ ३१ ॥ आपलें काज होय तोंवरी। बहुसाल नम्रता धरी। पुढिलांचें कार्य न करी। तो एक मूर्ख ॥ ३२ ॥ ऐसीं हीं मूर्ख लक्षणें। श्रवणें चातुर्य बाणे। चित्त देऊनियां शहाणे। ऐकती सदा ॥ ३३ ॥ दश. २ स. १

---

## पढत मूर्ख.

मागां सांगितलीं लक्षणें। मूर्खा अंगीं चातुर्य बाणे। आतां ऐका शहाणे। असोनि मूर्ख ॥ १ ॥ आपुलेनि ज्ञातेपणें। सकळांस शब्द ठेवणें। प्राणी मात्रांचें पाहे उणें। तो एक पढत[3] मूर्ख ॥ २ ॥ सकळ ग्रंथ पहिल्याविण। उगाच ठेवी जो दूषण। गुण सांगतां अवगुण। पाहे तो एक पढत मूर्ख ॥३॥ लक्षणें ऐकोनि मानी वीट। मत्सरें करी खटपट। नीति नायके उद्धट। तो एक पढत मूर्ख[4] ॥ ४ ॥ जाणपणें भरीं भरे। आला क्रोध नावरे। क्रिया शब्दास अंतरे[5]। तो एक पढत मूर्ख ॥ ५ ॥ श्रोता बहुश्रुतपणें। वक्त्यास आणी उणें। वाचाळपणाचेनि गुणें। तो एक पढतमूर्ख ॥ ६ ॥ दोष ठेवी पुढिलांसी। तेचि स्वयें आपणापाशीं। ऐसें कळेना जयासी। तो एक पढत मूर्ख ॥ ७ ॥ जेणें उणीव ये अंगासी। तेंचि दृढ धरी मानसीं। देहबुद्धि[6] जयापाशीं। तो एक

---

१ आयुष्य. २ धारेवर धरतो. ३ शहाणे असून जे मूर्ख ते पढत मूर्ख. ४ गर्व बाळगतो. ५ बोलण्यांत व आचरणांत ज्याचा मेळ नाहीं. ६ स्वार्थबुद्धि.

पढत मूर्ख ॥ ८ ॥ सांडूनियां श्रीपती । जो करी नरस्तुती । कां दृष्टी पडिल्यांची वर्णी कीर्ती । तो एक पढत मूर्ख ॥ ९ ॥ भरोनि वैभवाचे भरीं । जीवमात्रांस तुच्छ करी । पाषांड मत थोंवरी[1] । तो एक पढत मूर्ख ॥ १० ॥ नाहीं भक्तीचें साधन । नाहीं वैराग्य ना भजन । क्रियेविण बोले ब्रह्मज्ञान । तो एक पढत मूर्ख ॥ ११ ॥ आदर देखोनि मन धरी । कीर्तीविण स्तुति करी । सर्वेचि निंदी अनादरी । तो एक पढत मूर्ख ॥ १२ ॥ मागें एक पुढें एक । ऐसा जयाचा दंडक[2] । बोले एक करी एक । तो एक पढत मूर्ख ॥ १३ ॥ प्रपंचाविषयीं सादर । परमार्थीं ज्याचा अनादर । जाणपणें घे अंधार[3] । तो एक पढत मूर्ख ॥ १४ ॥ यथार्थ सांडूनियां वचन । जो रक्षून बोले मन[4] । ज्याचें जिणें पराधीन । तो एक पढत मूर्ख ॥ १५ ॥ सोंग संपादी वरीवरी[5] । करूं नये तेंचि करी । मार्ग चुकोन भरे भरीं । तो एक पढत मूर्ख ॥ १६ ॥ रात्रंदिवस करी श्रवण । न सांडी आपले अवगुण । स्वहित आपुलें नेणे आपण । तो एक पढत मूर्ख ॥ १७ ॥ होत असतां श्रवण । देहास आलें उणेपण[6] । क्रोधें करी चिणचिण[7] । तो एक पढत मूर्ख ॥ १८ ॥ वर्तल्याविण शिकवी । ब्रह्मज्ञान लावणी[8] लावी । पराधीन गोसावी[9] । तो एक पढत मूर्ख ॥ १९ ॥ त्यागावया अवगुण । बोलिलों पढत मूर्खाचें लक्षण । विचक्षणीं[10] न्यूनपूर्ण[11] । क्षमा केली पाहिजे ॥ २० ॥ दश. २ स० १०

---

१ स्थापन करी. २ नियम. ३ अज्ञान. ४ खरें माहित असतां. तें छपवून ( रक्षून ) तोंडपुजेपणा करतो. ५ दांभिक. ६ वर्मी लागलें तर. ७ बडबड. ८ लावणीस लावून पैसे मिळविणारा. ९ इंद्रियांचा स्वामी ह्मणविणारा परंतु पराधीन. १० शहाण्यांनीं. ११ कमीजास्त.

## बद्ध अथवा अविवेकी जन.

[ जे विकारांच्या स्वाधीन होऊन ज्यांनीं आत्मशोधन व सन्मार्ग ह्यांचा त्याग केला आहे व कुमार्गाचें अवलंबन करून जे अधोगतीस जात आहेत, अशा प्रकारचे लोक ह्मणजे बद्धजन. ]

तयास न दिसे सच्छास्त्र । संत्संगाति सत्पात्र । सन्मार्ग जो कां पवित्र । तोही न दिसे ॥ १ ॥ न कळे सारासार विचार । न कळे स्वधर्म आचार । न कळे कैसा परोपकार । दान पुण्य ॥ २ ॥ नाहीं पोटीं भूतदया । नाहीं शुचिष्मंत काया । नाहीं जनासि निववावया । वचन मृदु ॥ ३ ॥ न कळे भक्ति न कळे ज्ञान । न कळे वैराग्य न कळे ध्यान । न कळे मोक्ष न कळे साधन । या नांव बद्ध ॥ ४ ॥ न कळे देव निश्चयात्मक । न कळे संतांचा विवेक । न कळे मायेचें कौतुक । या नांव बद्ध ॥ ५ ॥ दया नाहीं करुणा नाहीं । आर्जव[२] नाहीं मैत्री नाहीं । शांति नाहीं क्षमा नाहीं । या नांव बद्ध ॥ ६ ॥ जे ज्ञानाविषयीं उणे[३] । तेथें कैंचीं ज्ञानाचीं लक्षणें । बहुसाल कुलक्षणें । या नांव बद्ध ॥ ७ ॥ नाना प्रकारचे दोष । करितां वाटे परम संतोष । वाष्कळपणाचा हव्यास । या नांव बद्ध ॥ ८ ॥ बहु काम बहु क्रोध । बहु गर्व बहु मद । बहु द्वंद्व बहु खेद । या नांव बद्ध ॥ ९ ॥ बहु दर्प[४] बहु दंभ । बहु विषय बहु लोभ । बहु कर्कश बहु अशुभ । या नांव बद्ध ॥ १० ॥ बहु ग्रामणी[५] बहु मत्सर । बहु असूया[६] तिरस्कार । बहु पापी बहु विकार । या नांव बद्ध ॥ ११ ॥ बहु अभिमान बहु ताठा[७] । बहु अहंकार बहु फांटा[८] । बहु कुकर्मांचा सांठा । या नांव बद्ध ॥ १२ ॥ बहु

---

१ उपदेश. २ लीनत्व. ३ अज्ञानी. ४ गर्व. ५ वाष्कळ. ६ हेवा, मत्सर. ७ गर्व. ८ बडबड.

कापट्य वादविवाद । बहु कुतर्क भेदाभेद । बहु क्रूर कृपामंद । या नांव बद्ध ॥ १३ ॥ बहु निंदा बहु द्वेष । बहु अधर्म बहु अभिलाष । बहु प्रकारींचें दोष । या नांव बद्ध ॥ १४ ॥ बहु भ्रष्ट अनाचार । बहु नष्ट एकाकार। बहु अनीति अविचार । या नांव बद्ध ॥ १५ ॥ बहु वाचाळ बहु पाषांडी । बहु दुर्जन बहु थोतांडी । बहु पैशून्य बहु खोडी । या नांव बद्ध ॥ १६ ॥ बहु अभाव बहु भ्रम । बहु भ्रांती बहु तम । बहु विक्षेप बहु विराम । या नांव बद्ध ॥ १७ ॥ सत्संगाची नाहीं गोडी । संत निंदेची आवडी । देहबुद्धीची घातली बेडी । या नांव बद्ध ॥ १८ ॥ हातीं द्रव्याची जपमाळा माळ । कांता ध्यान सर्वकाळ । सत्संगाचा दुष्काळ । या नांव बद्ध ॥ १९ ॥ द्रव्य दारा तेंचि तीर्थ । द्रव्य दारा तोचि परमार्थ । द्रव्य दारा सकळ स्वार्थ । ह्मणे तो बद्ध ॥ २० ॥

दश. ५ स. ७.

---

## प्रत्यय निरूपण.

अचूक यत्न करवेना । ह्मणून केलें तें समजेना । आपुला अवगुण जाणवेना । कांहीं केल्या ॥ १ ॥ जो आपुला आपण नेणे । तो दुसऱ्याचें काय जाणे । न्याय सोडितां दैन्यवाणे । होती लोक ॥ २ ॥ ऐसी नव्हे वर्तणूक । परीक्षावे नाना लोक । समजलें पाहिजे नेमक । ज्याचें त्यापरी ॥ ३ ॥ शब्दपरीक्षा अंतरपरीक्षा । कांहीं एक कळे दक्षा । मनोगत नतर्द्रक्षा । काय कळे ॥ ४ ॥ दुसऱ्यास शब्द ठेवणें । आपला कैंपक्ष घेणें । पाहों जातां लौकिकें लक्षणें । बहुतेक ऐसीं ॥ ५ ॥ लोकीं बरें ह्मणायां कारणें । भल्यास लागतें सोसणें । न सोसितां भंडांवणें ।

---

१ दयाहीन. २ हेकड. ३ कुभांड घेणारा, ढोंगी. ४ चाहाड खोरी. ५ अविश्वास. ६ धांदल. ७ विश्रांति. ८ करंटा, अजाण. ९ जनरीतीचीं. १० फजिती, त्रास.

सहजचि होय ॥ ६॥ बोलतो खरें चालतो खरें । त्यास मानिती लहान थोरें। न्याय अन्याय परस्परें। सहजचि कळे ॥ ७ ॥ जंववरी चंदन झिजेना । तंववरी तो सुगंध कळेना । चंदन आणि वृक्ष नाना । संगट होती ॥ ८ ॥ जंव उत्तम गुण न कळे । तों या जनास काय कळे । उत्तम गुण देखतां निवळे । जगदंतर ॥ ९ ॥ जगदंतर निवळत गेलें । जगदंतरीं सख्य जालें । तरी मग जाणावें वोळले । विश्वजन ॥ १० ॥ जनीं जनार्दन वोळला । तरी काय उणें तयाला । राजी राखावें सकळांला । कठिण आहे ॥ ११ ॥ पेरिलें तें उगवतें । उसणें द्यावें घ्यावें लागतें । वर्म काढितां भंगतें । परांतर ॥ १२ ॥ लौकिकीं बरेपण कळें । तेणें सौख्य वाढलें । उत्तरा सारिखें आलें । प्रत्युत्तर ॥ १३ ॥ हें अवघें आपणापाशीं । येथें बोल नाहीं जनासी । शिकवावें आपुल्या मनासी । क्षणक्षणां ॥ १४ ॥ खळ दुर्जन भेटला । क्षमेचा धीर बुडाला । तरी मौनेंचि स्थळत्याग केला । पाहिजे साधकें ॥ १५ ॥ लोक नाना परीक्षा जाणती । अंतरपरीक्षा नेणती । तेणें प्राणी करंटे होती । संदेह नाहीं ॥ १६ ॥ आपणास आहे मरण । ह्मणोन राखावें बरेपण । कठिण आहे लक्षण । विवेकाचें ॥ १७ ॥ बरें करितां बरें होतें । हें तों प्रत्ययास येतें । आतां पुढें सांगावें तें । कोणास काय ॥ १८ ॥ विद्या उदंडचि शिकला । प्रसंगमान चुकतचि गेला । तरी मग तये विद्येला । कोण पुसे ॥ १९ ॥

दश. १२ स. २

सं. ग्रंथा ... ११०८ ग्रं. गो.

१ सारखे. २ सर्वलोक. ३ आत्मशोधन.

## सारशोधन.

(आपण जें कांहीं पाहतों वाचतों करतों त्यांत तत्व काय आहे, याचा शोध केला पाहिजे. जो नेहमीं तत्वाचा शोध करितो त्यास सत्य ज्ञान प्राप्त होतें.)

[ १ ]

गुप्त आहे उदंड धन । काय जाणती सेवक जन । तयांस आहे तें ज्ञान । बाह्यात्काराचें ॥ १ ॥ द्रव्य ठेवूनि जळ सोडिलें । लोक ह्मणती सरोवर भरलें । तयाचें अभ्यंतर कळलें । समर्थ जनांसी ॥ २ ॥ तैसे ज्ञाते जे समर्थ । तिहीं ओळखिला परमार्थ । इतर ते करिती स्वार्थ । दृश्य पदार्थांचा ॥ ३ ॥ काबाडी वाहती काबाड । श्रेष्ठ भोगिती रत्नें जाड । हें जयाचें तयास गोड । कर्मयोगें ॥ ४ ॥ जयांस आहे विचार । ते सुखासनीं[2] जाले स्वार । इतर जवळील भार । वाहतचि मेले ॥ ५ ॥ सार सेविजे श्रेष्टीं । असार घेईजे वृथापुष्टीं । सारासारांची गोष्टी । सज्ञान जाणती ॥ ६ ॥ गुप्त[3] परिस चिंतामणी[4] । प्रगट खडे कांच मणी । गुप्त हेम रत्नखाणी । प्रगट पाषाण मृत्तिका ॥ ७ ॥ दिसेना जें गुप्तधन । तयासि करणें लागे अंजन । गुप्त परमात्मा सज्जन । संगतीं शोधावा ॥ ८ ॥ रायाचे सन्निध होतां । सहजाचि लाभे श्रीमंतता । तैसें हा सत्संग धारितां सद्वस्तु लाभे ॥ ९ ॥ सद्वस्तूस[6] लाभे सद्वस्तु । अव्यवस्थासि अव्यवस्थु । पाहतां प्रशस्तासि प्रशस्तु । विचार लाभे ॥ १० ॥ संसार त्याग न करितां । प्रपंच उपाधि न सांडितां । जनामध्यें सार्थकता । विचारेंचि होय ॥ ११ ॥ दश. ६ स. ९

---

१ गुप्त धन ठेवून लोकांना तें समजूं नये ह्मणून त्यावर सरोवर करून पाणी सोडलें. २ पालखी, मेणा इत्यादि सुखासनीं. ३ अतिदुर्मिळ. ४ इच्छिलेलें देणारा मणि. ५ स्वस्त. ६ चांगल्याला चांगला.

[ २ ]

या कारणें आचार शुद्ध । त्या उपरी विचार शुद्ध । वीतरागी आणि सुबुद्ध । ऐसा पाहिजे ॥ १ ॥ तैसें निंद्य सोडून द्यावें । वंद्य तें हृदयीं धरावें । सत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ ॥ २ ॥ उत्तमासि उत्तम ` । कनिष्ठांस तें न माने । ह्मणोन करंटे देवानें । करून ठेविले ॥ ३ ॥ वर्तावया विवेक । राजी राखणें सकळ लोक । हळुहळु पुण्यश्लोक[1] । करित जावें ॥ ४ ॥ मुलांचे चालीनें चालावें । मुलांच्या मनोगतें बोलावें । तैसें जनास शिकवावें । हळुहळू ॥ ५ ॥ वेड्यास वेडे ह्मणों नये । वर्म कदापि बोलों नये । तरीच घडे दिग्विजय । निस्पृहासी ॥ ६ ॥

दश. १३ स. १०

---

## मुलांस उपदेश.

[ समर्थांचे वडील बंधु गंगाधरपंत हे निधन पावल्यावर त्यांनीं गंगाधरपंतांच्या मुलांस जें पत्र पाठविलें तें प्रत्येक मुला-मुलीनें अवश्य पाठ करण्यासारखें आहे. ]

बरें सत्य बोला यथातथ्य[2] चाला । बहू मानिती लोक येणें तुह्मांला । धरा बुद्धि पोटीं विवेकें मुलें हो । बरा गूण तो अंतरामाजि राहो ॥ १ ॥ सदा दांत घांसोनि तोंडा धुवावें । कळाहीन तें शूद्र-मूखीं[3] नसावें । सदा सर्वदा यत्न सोडूं नये रे । बहूसाल हा खेळ कामा नये रे! ॥ २ ॥ दिसामाजि कांहीं तरी तें लिहावें । प्रसंगीं अखंडीत[4] वाचीत जावें । गुणश्रेष्ठ ऊपास्य[5] त्याचें करावें । बरें बोलणें[6] सत्य जीवीं धरावें ॥ ३ ॥

---

१ पुण्यकारक आहे कीर्ति ज्यांची असे. २ चांगल्या रीतीनें. ३ मलीन तोंडाचें. ४ नेहमीं ५ भक्तीस योग्य. ६ चांगला उपदेश.

बहु खेळ खोटा सदाॅलस्य खोटा । समस्तांशिं भांडेल तोची करंटा ।
बहूतां जनांलागिं जीवीं धरावें । भल्यासंगतीं न्याय तेथें वजावें ॥ ४ ॥
हिशोबीं सदा न्याय सांडूं नये रे । कदाचीत अन्याय होतां ढेका रे ।
जनीं सांडितां न्याय रे दुःख होतें । महा सौख्य तेंही अकस्मात जातें ॥५॥
प्रचीतीविणें बोलणें व्यर्थ वांयां । विवेकेंविणें सर्वही दंभ जाला ।
बहु सज्जला नेटका साजं केला । विचाराविणें सर्वही व्यर्थ गेला ॥६॥
वरी चांगला अंतरीं गोड नाहीं । तया मानवाचें जिणें व्यर्थ पाहीं ।
वरी चांगला अंतरीं गोड आहे । तयालागीं कोणी तरी शोधितोहे ॥७॥
सदा अंतरीं गोड तें सांडवेना । कदां अंतरीं ओखटें देखवेना ।
ह्मणूनी भला गूण आधीं धरावा । महा घोर संसार हा नीरसावा ॥ ८ ॥
' भला रे भला ' बोलती तें करावें । बहूतां जनांचे मुखें येशं घ्यावें ।
परी शेवटीं सर्व सोडूनि यीवें । मरावें परी कीर्तिरूपें उरावें ॥ ९ ॥
बरा ओखटा सर्व संसार झाला । अकस्मात् येईल रे काळ घाला ।
ह्मणोनी भले संगतीं सत्य चाला । जनीं दास तो बोधिताहे मुलांला ॥१०॥

---

# परमार्थ–प्रकरण ५ वें.

## प्रपंच आणि परमार्थ.

आधीं प्रपंच करावा नेटका । मग घ्यावें परमार्थ विवेका । येथें आळस करूं नका । विवेकी हो ॥ १ ॥ प्रपंच सांडून परमार्थ कराल ।

---

१ नेहमींचा आळस. २ तोटा. ३ सज्ज झाला. ४ चांगला शृंगार केला. ५ शोधितील, जवळ करितील. ६ त्याग करवत नाहीं. ७ कदापि. ८ महान् भयंकर किंवा दुस्तर. ९ नाहींसा करावा. १० शाबासकी, धन्यता. ११ निःसंग रहावें.

तेणें तुह्मी कष्टी व्हाल ।। प्रपंच परमार्थ चालवाल । तरी तुह्मी विवेकी ॥ २ ॥ प्रपंच सांडून परमार्थ केला । तरी अन्न मिळेना खायाला । मग तया करंट्याला । परमार्थ कैंचा ॥ ३ ॥ परमार्थ सांडून प्रपंच करिसी । तरी तूं यमयातना भोगिसी । अंतीं परम कष्टी होसी । यमयातना भोगितां ॥ ४ ॥ साहेबें[1] कामास नाहीं गेला । गृहींच सुरवांडोन[2] बैसला । तरी साहेबी कुठिली तयाला । पाहती लोक ॥ ५ ॥ प्रपंचीं जो सावधान । तो परमार्थ करील जाण । प्रपंचीं जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ॥ ६ ॥ म्हणोन सावधपणें । प्रपंच परमार्थ चालवणें । ऐसें न करितां भोगणें । नाना दुःखें ॥ ७ ॥ म्हणोन असावी दीर्घ सूचना । अखंड करावी चाळना । पुढील होणार अनुमाना । आणून सोडावें ॥ ८ ॥ सुखी असतो खबरदार । दुःखी होतो बेखबर । ऐसा हा लौकिक विचार । दिसतचि आहे ॥ ९ ॥ चाळणेचा आळस केला । तरी अवचित पडेल घाला । ते वेळे सांवरायाला । अवकाश कैंचा । ॥ १० ॥ ह्मणोन दीर्घ सूचनेचे[3] लोक । त्यांचा पहावा विवेक । लोकां-करितां लोकं[4] । शहाणे होती ॥ ११ ॥ परी ते शहाणे ओळखावे । गुण-वंताचे गुण घ्यावे । अवगुण देखोन सांडावे । जनांमध्यें ॥ १२ ॥

दश. १२ स. १

---

## [ २ ]

प्रपंच सुखें करावा । परि कांहीं परमार्थ वाढवावा । परमार्थ अवघाचि बुडवावा । हें विहित नव्हे । ५-३-१३ । पोट भरावया कारणें । नाना विद्या अभ्यास करणें । त्यासी ज्ञान म्हणती परी तेणें । सार्थक नव्हे । ६-१-२० ।

---

१ धन्याच्या कामास. २ सखांत निमग्न होऊन. ३ दूर दृष्टीचे. ४ एकाचें उदाहरण पाहून दुसरा.

ग्रंथ संग्रहा

संसार त्याग न करितां । प्रपंच उपाधि न सांडितां । जनामध्यें सार्थकता । विचारेंचि होय । ६–९-२४ । कीर्ति करून नाहीं मेले । ते उगेचि आले आणि गेले । शहाणे होऊन भ्रमले । काय सांगावें । १२-८-२७। प्रपंच करावा नेमक । पहावा परमार्थ विवेक । जेणें करितां उभय लोक । संतुष्ट होती । ११–३–२ । संसारा आलियाचें सार्थक । जेथें नित्यानित्य विवेक । इहलोक आणि परलोक । दोन्हीं साधिले । १७-१-२१ । काया बहुत कष्टवावी । उत्कटकीर्ति उरवावी । चटक लाऊन सोडावी । कांहीं एक । १९–१–१३ ।

---

## क्षणभंगुर जग.

एक भाग्यपुरुष मोडती[1] । एक नवे भाग्यवंत होती । तैशीच विद्या आणि व्युत्पत्ती । होत जाते ॥ १ ॥ एक भरे एक रितें । रितें मागुतें भरतें । भरतें तेंहि रितें होतें । काळांतरीं ॥ २ ॥ ऐसी हे सृष्टि चालिली । संपत्ति दुपारची साउली । वयसा[2] तरी निघोन गेली । हळुहळू ॥ ३ ॥ बाळ तारुण्य आपलें । वृद्धाप्य[3] प्रचीतीस आलें । ऐसें जाणोन सार्थक केलें । पाहिजे कोणी एकें ॥ ४ ॥ दश. ७ स. ७

[ २ ]

नाहीं देहाचा भरंवसा । केव्हां सरेल वयसा । प्रसंग पडेल कैसा । कोण जाणे ॥ १ ॥ या कारणें सावधान असावें । जितुकें होईल तितुकें करावें । भगवत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ ॥ २॥ आपणांस जें जें अनुकूल । तें तें करावें तत्काळ । होईना त्यास निवळ[4] । विवेक उमजावा ॥ ३ ॥

---

१ भाग्यशाली पुरुष विपत्ति पावतात. २ आयुष्य. ३ म्हातारपण.
४ आपणांस जें प्रगट होत नाहीं, कळत नाहीं त्याविषयीं विचार करावा.

अखंड तजविजा चाळना जेथें । पाहतां काय उणें तेथें । एकांताविणें प्राणियातें । बुद्धि कैंची ॥ ४ ॥ एकांतीं विवेक करावा । आत्माराम ओळखावा । येथून तेथवरी गोंवा । कांहींच नाहीं ॥ ५ ॥ दश. १९ स. ६

---

## मायाजाल.

देखिलें तें सत्यचि मानावें । हें ज्ञात्याचें देखणें नव्हे । जड मूढ अज्ञान जीवें । हें सत्य मानिजे ॥ १ ॥ एक्या देखिल्यासाठीं । लटिक्या कराव्या ग्रंथकोटी । संतां महंतांच्या गोष्टी । त्याही मिथ्या मानाव्या ॥ २ ॥ माझें दिसतें हेंचि खरें । येथें चालेना दुसरें । ऐसिया संशयाच्या भरें । भरोंचि नये ॥ ३ ॥ मृगें देखिलें मृगजळ । तेथें धांवतें बरळ[1] । जळ नव्हे मिथ्या सकळ । त्या पशूस कोणें म्हणावें ॥ ४ ॥ रात्रौ स्वप्न देखिलें । बहुत द्रव्य सांपडलें । बहुत जनांसि वेव्हारिलें[2] । तें खरें कैसेनि मानावें ॥ ५ ॥ सृष्टी बहुरंगी असत्य । बहुरूपाचें हें कृत्य । तुज वाटे दृश्य सत्य । परी हे जाण अविद्या ॥ ६ ॥ मिथ्या साचा सारिखें देखिलें । परि तें पाहिजे विचारिलें । दृष्टी तरळतां[3] भासलें । तें साच कैसें मानावें ॥ ७ ॥ वरी पाहतां पालथें आकाश । उदकीं पाहतां उताणें आकाश । मध्यें चांदण्याहि प्रकाश । परी तें अवघें मिथ्या ॥ ८ ॥ नृपतीनें चितारी आणिले । ज्याचे त्या ऐसे[4] पुतळे केले । पाहतां तेचि ऐसे गमले । परी अवघे मायिक ॥ ९ ॥ ऐसें हें बहुविध असे । साचा सारिखेंचि दिसे । परि हें सत्य म्हणोनि कैसें । विश्वासावें ॥ १० ॥ दश. ६ स. ८

---

१ वेडें, भ्रमिष्ठ. २ व्यवहार केला. ३ पडतां. ४ हुबेहुब. ५ अगदीं त्या त्या मनुष्यांसारखे दिसले.

## आत्मज्ञान.

( जारण मारण उच्चाटण मोहिनी विद्यांचे उपदेश, तसेंच अनेक देव दैवतें यांच्या मंत्रांचे उपदेश व्यर्थ होत असें सांगून समर्थ आत्मज्ञानाची महती सांगतात. )

---

या कारणें ज्ञानासमान । पवित्र उत्तम न दिसे आन । म्हणून आधीं आत्मज्ञान । साधिलें पाहिजे ॥ १ ॥ सकळ उपदेशीं विशेष । आत्मज्ञानाचा उपदेश । येविषयीं जगदीश । बहुतां ठायीं बोलिला ॥ २ ॥ सकळ तीर्थांची संगती । स्नानदानाची फळश्रुती[1] । त्याहूनि ज्ञानाची स्थिती[2] । विशेष कोटिगुणें ॥ ३ ॥ जंव तें ज्ञान नाहीं प्रांजळ[3] । तंव सर्व कांहीं निष्फळ । ज्ञानरहित तळमळ[4] । जाणार नाहीं ॥ ४ ॥ ऐक ज्ञानाचें लक्षण । ज्ञान ह्मणिजे आत्मज्ञान । पहावें आपणास आपण । ह्या नांव ज्ञान ॥ ५ ॥ मुख्य देवास जाणावें । सत्यस्वरूप ओळखावें । नित्यानित्य विचारावें । या नांव ज्ञान ॥ ६ ॥ देहें मी वाटे ज्या नरा । तो जाणावा आत्महत्यारा[5] । देहाभिमानें येरझारा[6] । भोगिल्याच भोगी ॥ ७ ॥ अखंड घडे श्रवण मनन । तरीच पाविजे समाधान । पूर्ण जालिया ब्रह्मज्ञान । वैराग्य भरे अंगीं ॥ ८ ॥ ऐक शिष्या सावधान । आतां भविष्य मी सांगेन । ज्या पुरुषास जें ध्यान । तयासि तेंचि प्राप्त ॥ ९ ॥ ह्मणोनि जे अविद्या । सांडूनि धरावी सुविद्या । तेणें गुणें जगद्वंद्या । पाविजे शीघ्र ॥ १० ॥ सन्निपाताचेनि दुःखें । भयानक दृष्टीस देखे । औषध घेतांचि सुखें । आनंद पावे ॥ ११ ॥ तैसें अज्ञानसन्निपातें । मिथ्या दृष्टीस दिसतें । ज्ञान

---

१ फल महिमा. २ महती. ३ सत्य. ४ शरीरसंतर्पणा पलिकडे ज्याची दृष्टी नाहीं. ५ आत्मघातकी. ६ पुनः पुन्हां जन्म पावतो.

औषध घेतां चित्तें । जें मुळींच नाहीं ॥ १२ ॥ परि अविद्या झोंप येते भेरें । भरे सर्वांगीं कोंविरें । पूर्ण जागृती श्रवणद्वारें । मननें करावी ॥ १३ ॥ जागृतीची ओळखण । ऐक तयाचें लक्षण । जो विषयीं विरक्त पूर्ण । अंतरापासूनी ॥ १४ ॥ जेणें विरक्तीस न यावें । तो साधक ऐसें जाणावें । तेणें साधन करावें । थोरीवें सांडूनी ॥ १५ ॥

द० ५ स० ४-५-६

—:-※-:—

## साधक.

अवगुणांचा करूनि त्याग । जेणें धरिला संतसंग । तयासि बोलिजे मग । साधक ऐसा ॥ १ ॥ नाना संदेह निवृत्ती । व्हावया धरी सत्सं-गती । आत्मशास्त्र-गुरु-प्रचीती । ऐक्यतेसी आणी ॥ २ ॥ देहबुद्धि विवेकें वारी । आत्मबुद्धि सुदृढ धरी । श्रवण मनन केलेंचि करी । या नांव साधक ॥ ३ ॥ तिरस्कार तो चिरडला । द्वेष खिरडूनि सांडिला । विखाद अविषादें घातला । पायांतळीं ॥ ४ ॥ कोपावरी घालणें घातलें । कापट्य अंतरीं कुटिलें । सख्य आपुलें मानिलें । विश्वजनीं ॥ ५ ॥ आतां असो हें बोलणें । अवगुण सांडी निरूपणें । तो साधक येणें-प्रमाणें बुझावा ॥ ६ ॥ दश. ५ स. ९

---

१ पुष्कळ. २ वेड, भ्रम. ३ मोठपणा. ४ आत्मप्रतीति, शास्त्रप्रतीति आणि गुरुप्रतीति हे एकच आहेत असा जो अनुभव घेतो. ५ उपटून. ६ खेद. ७ छापा. ८ जाणवा.

## मुमुक्षु.

( अभिमान, दांभिकपणा व आत्मवंचना नाहींशी झाल्याशिवाय व मोक्षप्राप्तीची खरी कळकळ उत्पन्न झाल्याशिवाय मनुष्य मुमुक्षु होत नाहीं. जसे मोक्षमार्गातील मुमुक्षु तसे व्यवहारांत व ज्ञानमार्गांत आपणांस एके प्रकारें मुमुक्षु झालें पाहिजे. )

आपले दोष आच्छादिले[1] । भल्यांस गुणदोष लाविले । देवा म्यां व्यर्थचि निंदिले । संत साधु सज्जन ॥ १ ॥ निंदे ऐसे नाहीं दोष । ते मज घडले कीं विशेष । माझे अवगुणीं आकाश । बुडों पाहे ॥ २ ॥ नाहीं ओळखिले संत । नाहीं अर्चिला भगवंत । नाहीं अतितें[2] अभ्यागत । संतुष्ट केले ॥ ३ ॥ नाहीं कष्टविलें शरीर । नाहीं केला परोपकार । नाहीं रक्षिला आचार । काममदें ॥ ४ ॥ भक्तिमाता हे बुडाविली । शांति विश्रांति मोडिली । मूर्खपणें म्यां बिघडिली । सद्बुद्धि सद्वासना ॥ ५ ॥ कीर्तन केलें पोटासाठीं । देव मांडिले हाटवटीं[3] । आहा ! देवा बुद्धि खोटी । माझी मीच जाणें ॥ ६ ॥ पोटीं धरूनि अभिमान । शब्दीं बाल निराभिमान । अंतरीं वांछूनियां धन । ध्यानस्थ जाहलों ॥ ७ ॥ व्युत्पत्तीनें[4] लोक भोंदिले । पोटासाठीं संत निंदिले । माझे पोटीं दोष भरले । नाना प्रकारीं ॥ ८ ॥ सत्य तेंचि उच्छेदिलें[5] । मिथ्या तेंचि प्रतिपादिलें[6] । ऐसें नाना कर्म केलें । उदर भरावया कारणें ॥ ९ ॥ ऐसा पोटीं प्रस्तावला । निरूपणें पालटला । तोचि मुमुक्ष बोलिला । ग्रंथांतरीं ॥ १० ॥

---

१ झांकिले. २ अतिथी. पाहुणा. ३ बाजारांत. ४ शास्त्र ज्ञानानें लोकांना नादीं लाविलें. ५ वीमोड केला. ६ खरेंसें भासविलें.

पुण्यमार्ग पोटीं धरी । सत्संगाची वांच्छा करी । विरक्त आला संसारीं । या नांव मुमुक्षु ॥ ११ ॥ आपुले अवगुण देखे । विरक्तिबळें ओळखे । आपणासि निंदी दुःखें । या नांव मुमुक्षु ॥ १२ ॥ म्हणे मी पतित चांडाळ । म्हणे मी दुराचारी खळ । म्हणे मी पापी केवळ । या नांव मुमुक्षु ॥ १३ ॥ देहाभिमान कुळाभिमान । द्रव्याभिमान नानाभिमान । सांडूनि संतचरणीं अनन्य । या नांव मुमुक्षु ॥ १४ ॥ दश. ५ स. ८

---

## श्रद्धा.

### [ १ ]

भगवंत भावाचा भुकेला । भावार्थ देखोनि भुलला । संकटीं पावे भाविकांला । रक्षितसे ॥ १ ॥ जैसा भाव जयापाशीं । तैसाचि देव तयापाशीं । जाणें भाव अंतरसाक्षी । प्राणीमात्रांचा ॥ २ ॥ जरी भाव असला मायिक । तरी देव होय महा ठक । नवल तयाचें कौतुक । जैशासि तैसा ॥ ३ ॥ जैसें जयाचें भजन । तसाचि दे समाधान । भाव होतां किंचित न्यून । आपणहि दुरावे ॥ ४ ॥ दर्पणीं प्रतिबिंब दिसे । जैशासि तैसें भासे । तयाचें सूत्र असे । आपणाच पाशीं ॥ ५ ॥ जैसें आपण करावें । तैसेंचि तेणें व्हावें । जरी डोळे पसरोनि पहावें । तरी तेंही टंवकारे ॥ ६ ॥ भ्रकुटीस घालूनियां मिठी । पाहतां तेंहि क्रोधें उठी । आपण हास्य करितां पोटीं । तेंहि आनंदे ॥७॥ भावें भजनीं जे लागले । तें ईश्वरीं पावन झाले । भावार्थबळें उद्धरले । पूर्वज तेही ॥८॥ आपण स्वयें तरले । जनासहि उपेगा आले । कीर्तिश्रवणें जाले । अभक्त भावार्थी॥९॥ कोण समय येईल कैसा ॥ याचा न कळे कीं भरंवसा । जैसे पक्षी दाही

---

१ इच्छा. २ मनोगत जाणणारा देव. ३ डोळे वटारून पाहतें. ४ भिंवयांना.

दिशा । उडोनि जाती ॥ १० ॥ तैसें वैभव हें सकळ । कोण जाणे कैशी वेळ [१] पुत्रकलत्रादि सकळ । विघडोनि [२] जाती ॥ ११ ॥ दुःख भोगिलें आपुले जीवें । तेथें कैंचीं होती सर्वें । तैसेंचि पुढें एकलें जावें । लागेल बापा ॥१२॥ कैंची माता कैंचा पिता । कैंची बहिण कैंचा भ्राता । कैंचीं सुहृदें [३] कैंचि वनिता [४] । पुत्र कलत्रादिक ॥ १३ ॥ हीं जाण तूं मायेचीं । अवघीं सोयरीं सुखाचीं । हीं तुझ्या सुखदुःखाचीं । सांगाती नव्हेती॥१४॥ कैंचें घर कैंचा संसार । कासया करिसी जोजार । जन्मवरी वाहोनि भार । शेखीं सांडोनि जासी ॥ १५ ॥ कैंचें तारुण्य कैंचें वैभव । कैंचे सोहळे हावभाव । हे सकळही जाण माव [७] । मायिक [८] माया ॥ १६ ॥ तुझें तुज नव्हे शरीर । तेथें इतरांचा कोण विचार । आतां एक भगवंत साचार । धरीं भावार्थ बळें ॥ १७ ॥ एका उदर [६] भरण्याकारणें । नाना नीचांची सेवा करणें । नाना स्तुती आणि स्तवनें । मर्यादा धरावी ॥ १८॥ जो अन्न देतो उदरासी । शरीर विकावें लागे त्यासी । जेणें घातलें जन्मासी । त्यासी कैसें विसरावें॥१९॥अहर्निशीं ज्या भगवंता।सकळ जीवांची लागली चिंता । मेघ वर्षे जयाची सत्ता । सिंधु मर्यादा धरी ॥ २० ॥ ऐसा कृपाळु देवाधिदेव । जो नेणवे जयाचें लाघवँ । जो सांभाळी सकळ जीव । कृपाळुपणें ॥ २१ ॥ ऐसा सर्वात्मा श्रीराम । सांडुनि धरिती विषय काम । ते प्राणी दुरात्मे अधम । केलें पावती ॥२२॥ विषयजनित जें जें सुख । तेथेंचि होतें परम दुःख । पूर्वीं गोड अंतीं शोक । नेमस्त आहे ॥ २३ ॥ ऐकोनि बोले भाविक । कैसेनि घडे जी सार्थक । सांगा स्वामी यमलोक । चुके जेणें ॥ २४ ॥ धडपुडी भगवत्प्राप्ती । होऊनि चुके अधोगती । ऐसा उपाय कृपामूर्ती । मज दीनासि करावा ॥ २५ ॥

---

१ मुलगा बायको आदिकरून. २ नाश पावतात ३ मित्र. ४ बायको. ५ खोटें. ६ पोट. ७ लीला. ८ खरोखर. ९ लवकर.

कं०५

वक्ता म्हणे हो एक भावें । भगवत्भजन करावें । तेणें होईल स्वभावें । समाधान ॥ २६ ॥ दश. ३ स. १०

[ २ ]

ज्ञानी मुक्त होऊन गेले । त्यांचें सामर्थ्य उगेंच चाले । कांजे पुण्यमार्गें चालिले । म्हणोनियां ॥ १ ॥ याकारणें पुण्यमार्गें चालावें । भजन देवाचें वाढवावें । न्याय सांडून न जावें । अन्याय मार्गें ॥ २ ॥ एक गुरु एक देव । कोठें तरी असावा भाव । भावार्थें नसतां वाव । सर्व कांहीं ॥ ३ ॥ निष्काम बुद्धीचिया भजना । त्रैलोकीं नाहीं तुळना । सामर्थ्यैंविण घडेना । निष्काम भजन ॥ ४ ॥ निष्काम भजनाचें फळ आगळें । सामर्थ्य चढे मर्यादे वेगळें । तेथें बापुडीं फळें । कोणीकडे ॥ ५ ॥ सारासार विचार करणें । न्याय अन्याय अखंड पहाणें । बुद्धि भगवंताचें देणें । पालटेना ॥ ६ ॥ दश. १० स.७

भक्तिनिरूपण.

भगवद्भक्ती हे उत्तम । त्याहीवरी सत्समागम । काळ सार्थक हाचि परम । लाभ जाणावा॥१॥नरदेहीं आलिया एक। कांहीं करावें सार्थक । जेणें पाविजे परलोक । परम दुर्लभ जो ॥ २ ॥ अनुतापें करावा त्याग। अथवा करणें भक्तियोग । नाहीं तरी धरणें संग । साधुजनांचा ॥ ३ ॥ अथवा कीजे परोपकार । अथवा ज्ञानाचा विचार । निरूपणीं सारा-

१ सहज. २ ज्ञानी काळवश झाले तरी ते पुण्यमार्गानें वागले असल्यामुळें त्यांचें सामर्थ्य जगांत असतें. ३ एके ठिकाणीं जर निश्चळभाव नाहीं तर सर्व व्यर्थ. ४ उपमा. ५ योग्यतेवांचून. ६ साधूंची संगती. ७ सफलता.

सार। विवेक करणें ॥ ४ ॥ जन्मा आलियाचें फळ। कांहीं करावें सफळ। ऐसें न करितां निष्फळ। भूमिभार होय ॥ ५॥ नरदेहाचें उचित। कांहीं करावें आत्महित। यथानुशक्त्या चित्तवित्त। सर्वोत्तमीं लावावें ॥ ६ ॥ हें कांहींच न धरी जो मनीं। तो मृतप्राय वर्ते जनीं। जन्मास येऊन तेणें जननी। वांयांच कष्टविली ॥ ७ ॥ नाहीं भक्ति नाहीं प्रेम। नाहीं निष्ठा नाहीं नेम। नाहीं देव नाहीं धर्म। अतित अभ्यागत ॥ ८ ॥ नाहीं सद्बुद्धी नाहीं गुण। नाहीं कथा नाहीं श्रवण। नाहीं अध्यात्म निरूपण। ऐकिलें कदा ॥ ९ ॥ नाहीं भल्यांची संगती। नाहीं शुद्ध चित्तवृत्ती। नाहीं कैवल्याची प्राप्ती। मिथ्याँमदें ॥ १० ॥ नाहीं नीति नाहीं न्याय। नाहीं पुण्याचा उपाय। परत्रींची सोय। युक्तायुक्त क्रिया ॥ ११ ॥ कर्म नाहीं उपासँना नाहीं। ज्ञान नाहीं वैराग्य नाहीं। योग नाहीं धारिष्ट नाहीं। कांहींच नाहीं पाहतां ॥१२॥ परगुणांचा संतोष नाहीं। परोपकारें सुख नाहीं। हरिभक्तीचा लेश नाहीं। अंतर्यामीं ॥ १३ ॥ ऐसे प्रकारचे पाहतां जन। जे जितँचि प्रेतासमान। त्यांसि न करावें संभाषण। पवित्र जनीं ॥ १४ ॥ दश० २ स० ४

---

## नवविधा भक्ति.

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम्।
अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥

( १ ) **श्रवण.**—कर्ममार्ग उपासना मार्ग। ज्ञानमार्ग सिद्धांतमार्ग। योगमार्ग वैराग्यमार्ग। ऐकत जावे ॥ १ ॥ चौदा विद्या चौसष्ट

---

१ ईश्वरा कारणें. २ अतिथी, गोसावी यांचा सत्कार. ३ खोट्या गर्वानें. ४ भाक्ति ५ जिवंत असतांना. ६ गुरुभक्ति मार्ग.

कळा । सामुद्रिक लक्षणें सकळ कळा । बत्तीस लक्षणें नाना कळा । ऐकत त्या जाव्या ॥ २ ॥ कोण्या दोषें कोण रोग । कोण्या रोगास कोण प्रयोग । कोण्या प्रयोगास कोण योग[3] । साधे तो ऐकावा ॥ ३ ॥ कैशा नवविधा भक्ती । कैशा चतुर्विधा मुक्ती । कैशी पाविजे उत्तम गती । ऐसें हें ऐकावें ॥ ४ ॥ पिंडब्रह्मांडांची[3] रचना । नाना तत्व विवेचना । सारासार विचारणा । कैसी ती ऐकावी ॥ ५ ॥ सायुज्यता मुक्ति कैसी होते । कैसें पाविजे मोक्षातें । या कारणें नाना मतें । शोधीत जावीं ॥ ६ ॥ ऐसें हें अवघेंचि ऐकावें । परंतु सार शोधून घ्यावें । असार तें जाणोनि त्यागावें । या नांव श्रवण भक्ती ॥ ७ ॥ सगुणांचीं चरित्रें ऐकावीं । कां ते निर्गुण अध्यात्में शोधावीं । श्रवण भक्तीचीं जाणावीं । लक्षणें ऐसीं ॥ ८ ॥

---

(२) कीर्तन.–बहुत करावें पाठांतर । कंठीं धरावें ग्रंथांतर । भगवत्कथा निरंतर । करीत जावी ॥ १ ॥ आपुलिया सुख स्वार्था । केलीच करावी हरिकथा ।हरिकथेविण सर्वथा । राहोंचि नये ॥ २ ॥ भगवंतासि कीर्तन प्रिय।कीर्तनें समाधान होय। बहुत जनांसि उपाय।हरिकीर्तन कलियुगीं ॥ ३ ॥ सगुण[4] कथा[5] या नांव कीर्तन । अद्वैत ह्मणिजे निरूपण । सगुण रक्षून निर्गुण । बोलत जावें ॥४॥ असो वक्तृत्वाचा अधिकार।अल्पास न घडे सत्योत्तर । वक्ता पाहिजे साचार।अनुभवाचा ॥५॥ कीर्तनें महा-

---

१ हस्तचिन्हें वगैरे. २ संबंध, योजना. ३ विश्वाची. ४ ईश्वरास परमदयाळू, न्यायी, भक्तवत्सल, मंगळधाम वगैरे विशेषणांनीं आपण आळवूं लागलों ह्मणजे तीच सगुण भक्ति; कारण निर्गुणाला गुण वगैरे कांहींच नाहींत. ५ भक्त किंवा दीन दुर्बळ ह्यांच्या रक्षणाकरितां कसे अवतार घेतले, त्यांचें त्यानें कसें रक्षण केलें, या सगुण कथा होत.

दोष जाती । कीर्तनें होय उत्तम गती ॥ कीर्तनें भगवत्प्राप्ती । यदर्थी संदेह नाहीं ॥ ६ ॥ कीर्तनें वाचा पवित्र । कीर्तनें होय सत्पात्र । कीर्तनें प्राणी मात्र । सुशील होती ॥ ७ ॥ कीर्तनें अव्यग्रता[1] घडे । कीर्तनें निश्चय सांपडे । कीर्तनें संदेह उडे । श्रोत्यावक्त्यांचा ॥ ८ ॥

(३) **स्मरण.**—स्मरण देवाचें करावें । अखंड नाम जपत जावें । नामस्मरणें पावावें । समाधान ॥१॥ नित्यनेम प्रातःकाळीं । मध्यान्हकाळीं सायंकाळीं । नामस्मरण सर्व काळीं । करीत जावें ॥२॥ सुखदुःख उद्वेग[2] चिंता । अथवा आनंदरूप असतां । नामस्मरणेंविण सर्वथा । राहोंच नये ॥ ३ ॥ कोडें[3] सांकडें संकट । नाना संसार खटपट । अवस्था लागतां चटपट । नामस्मरण करावें ॥ ४ ॥ चालतां बोलतां धंदा करितां । खातां जेवितां सुखी होतां । नाना उपभोग भोगितां । नाम विसरूं नये ॥ ५ ॥ संपत्ति अथवा विपत्ती ॥ जैसी पडेल काळगती । परी नामस्मरणाची स्थिती । सोडूं नये ॥ ६ ॥ बाळपणीं तारुण्यकाळीं । कठिणकाळीं वृद्धापकाळीं । सर्व काळीं अंतकाळीं । नामस्मरण असावें ॥ ७ ॥ हरिनामें प्रल्हाद तरला । नाना आघातांपासून[4] सुटला ॥ नारायण नामें पावन झाला । अजामिळ ॥ ८ ॥ परमेश्वराचीं अनंत नामें । स्मरतां तरिजे नित्यनेमें । नामस्मरण करितां यमें । बाधिजेना ॥९॥ नाम स्मरे निरंतर । तें जाणावें पुण्य शरीर । नाना दोषांचे गिरिवर[5] । रामनामें नासती ॥ १० ॥ चहुं वर्णां[6] नामाधिकार । नामीं नाहीं लहान थोर । जडमूढ पैलपार । पावती नामें ॥ ११ ॥

(४) **पादसेवन.**—पादसेवन तेंचि जाणावें । काया वाचा मनोभावें । सद्गुरूचे पाय सेवावे । सद्गती कारणें ॥ १ ॥ या नांव पादसेवन । सद्गुरु-

---

१ एकाग्रता २ त्रास. ३ ज्यांत मात कुंठित होते अशी मनाची स्थिति. ४ क्लेशांपासून. ५ मोठे पर्वत. ६ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चार वर्णांस.

पदीं अनन्य[1] शरण । निरसावया जन्ममरण । यातायाती[2] ॥ २ ॥ नाना समाधानें पाहतां । बाणती सद्गुरु करितां । सद्गुरूविण सर्वथा । सन्मार्ग नसे ॥ ३ ॥ प्रयोग साधनें सायास । नाना साक्षेपें विद्याभ्यास । अभ्यासें कांहीं गुरुगम्यास[3] । पाविजेत नाहीं ॥ ४ ॥ जें अभ्यासें अभ्यासितां न ये । जें साधनें असाध्य होय । तें हें सद्गुरूविण काय । उमजों जाणे ॥ ५ ॥ या कारणें ज्ञानमार्ग । कळाया धरावा सत्संग । सत्संगेंविण प्रसंग[4] । बोलोंचि नये ॥ ६ ॥ सेवावे सद्गुरूचे चरण । या नांव पादसेवन । चौथे भक्तीचें लक्षण । तें हें निरोपिलें ॥ ७ ॥

---

( ५ ) **अर्चन.**—काया वाचा आणि मनें । चित्तें वित्तें जीवें प्राणें । सद्भावें भगवदर्चनें । या नांव अर्चनें[5] भक्ती ॥ १ ॥ ऐसेंचि सद्गुरूचें भजन । करून असावें अनन्य । या नांव भगवद्भजन । पांचवी भक्ती ॥ २ ॥ ऐसी पूजा न घडे बरवी । तरी मानसपूजा करावी । मानस-पूजा अगत्य व्हावी । परमेश्वराची ॥ ३ ॥ मनें भगवंतासि पूजावें । कल्पून सर्वही समर्पावें । मानसपूजेचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ ४ ॥ जें जें आपणास पाहिजे । तें तें कल्पून वाहिजे । येणें प्रकारें कीजे । मानसपूजा ॥ ५ ॥

---

( ६ ) **वंदन.**—जेथें दिसती विशेष गुण । तें सद्गुरूचें अधिष्ठान[6] । या कारणें तयासी नमन । अत्यादरें करावें ॥ १ ॥ नमस्कारें लीनता घडे । नमस्कारें विकल्प[7] मोडे । नमस्कारें सख्य घडे । नाना सत्पात्रांशीं[8] ॥ २ ॥ नमस्कारें दोष जाती । नमस्कारें अन्याय क्षमती । नमस्कारें मोडलीं

---

१ सर्वस्वी. २ दगदग. ३ गुरुच्याद्वारें समजण्याची जी वस्तु ती केवळ अभ्यासानें कळत नाहीं. ४ समय, व्यवहार. ५ पूजन. ६ ठिकाण. ७ शंका. ८ उत्तम लोकांशीं.

जडती । समाधानें ॥ ३ ॥ नमस्कारें कृपा उचंबळे । नमस्कारें प्रसन्नता प्रबळे । नमस्कारें गुरुदेव वोळे । साधकांवरी ॥ ४ ॥ निःशेष करितां नमस्कार नासती दोषांचे गिरिवर । आणि मुख्य परमेश्वर । कृपा करी ॥ ५ ॥ परम अन्याय करूनि आला । आणि साष्टांग नमस्कार घातला । तरी तो अन्याय क्षमा केला । पाहिजे श्रेष्ठीं ॥ ॥ ६ ॥ नमस्कारास वेंचावें नलगे । नमस्कारास कष्टावें नलगे । नमस्कारास कांहींच नलगे । उपकरण सामुग्री ॥ ७ ॥ नमस्कारा ऐसें नाहीं सोपें । नमस्कार करावा अनन्यरूपें । नाना साधनीं साक्षेपें । कासया शिणावें ॥ ८ ॥ या कारणें नमस्कार श्रेष्ठ । नमस्कारें वोळती वरिष्ठ । येथें सांगितली स्पष्ट । सहावी भक्ती ॥ ९ ॥

———:o:———

(७) दास्य.—ऐसें वैभव चालवावें । आणि नीचें दास्यत्वहि करावें । पडिले प्रसंगीं सावध असावें । सर्व काळ ॥ १ ॥ जें जें कांहीं पाहिजे । तें तें तात्काळचि दीजे । अत्यंत आवडीं कीजे । सकळ सेवा ॥ २ ॥ सकळांचें करावें पारपत्य । आलियांचें करावें आतिथ्य । ऐसी हे जाणावी सत्य । सातवी भक्ती ॥ ३ ॥ वचनें बोलावीं करुणेचीं । नाना प्रकारें स्तुतीचीं । अंतरें निवती सकळांचीं । ऐसें वदावें ॥ ४ ॥

———

(८) सख्य.—देवाशीं परम सख्य करावें । प्रेम प्रीतीनें बांधावें । आठवे भक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ १ ॥ देवास जयाची अत्यंत प्रीती । आपण वर्तावें तेणेंचि रीती । येणें करितां भगवंतीं । सख्य घडे नेमस्त ॥ २ ॥ भक्ति भाव आणि भजन । निरूपण आणि कथा कीर्तन । प्रेमळ भक्तांचें गायन । आवडे देवा ॥ ३ ॥ देवाच्या सख्यत्वा कारणें । आपुलें सौख्य सोडून देणें । अनन्यभावें जीवें प्राणें । शरीर तेंहि वेंचावें ॥ ४ ॥

---

१ वाढते. २ हलकीसेवा. ३ तृप्ति, समाचार.

देवाच्या सख्यत्वासाठीं । पाडाव्या जिवलगांसि तुटी । सर्व अर्पावें शेवटीं । प्राण तोहि वेंचावा ॥ ५ ॥ जैसें जयाचें भजन । तैसाच देवहि आपण । ह्मणोनि हें अवघें जाण । आपणाचि पाशीं ॥ ६ ॥ ऐसें असावें सख्यत्व । विवेकें धरावें सत्त्व । भगवंता वरील ममत्व । सांडूंचि नये ॥ ७ ॥ सखा मानावा भगवंत । मातापिता गणगोत । विद्या लक्ष्मी धन वित्त । सकळही परमात्मा ॥ ८ ॥ देव भक्तांचा कैवारी । देव पतितांसि तारी । देव होय सहाकारी । अनाथांचा ॥ ९ ॥ देव कृपेचा सागरु । देव करुणेचा जलधरु । देवासि भक्तांचा विसरु । पडणार नाहीं ॥ १० ॥

(९) आत्मनिवेदन.—नवम निवेदन जाणावें । आत्मनिवेदन करावें । तेंहि सांगिजेल स्वभावें । प्रांजळ करूनी ॥ १ ॥ ऐका निवेदनाचें लक्षण । देवासि वहावें आपण । करावें तत्वविवरण । ह्मणिजे कळे ॥ २ ॥ तस्मात् विचार करावा । देव कोण तो ओळखावा । आपला आपण शोध घ्यावा । अंतर्यामीं ॥३॥ पंचभूतांमध्यें आकाश । सकळ देवांमध्यें जगदीश । नवविधा भक्तींमध्यें विशेष । भक्ति नवमी ॥ ४ ॥ नवमी भक्ती आत्मनिवेदन । न होतां न चुके जन्ममरण । हें वचन सत्य प्रमाण । अन्यथा नव्हे ॥ ५ ॥ द० ४.

## देवाविषयीं विविध कल्पना.

### [ १ ]

मुख्य देव तो कळेना । कशास कांहींच मिळेना । एकास एक वळेना । अनावर ॥ १ ॥ ऐसा नासला विचार । कोण पाहतो सारासार । कैंचा

१ वियोग. २ नेट. ३ प्रेम. ४ सहाय्यकर्ता. ५ अर्पण. ६ स्वतांचें अर्पण. ७ स्पष्ट. ८ तत्वचिकित्सा. ९ असत्य.

लहान कैंचा थोर । कळेचिना॥ २ ॥ शास्त्रांचा बाजार भरला । देवांचा गलबला झाला । लोक कामनेच्या[1] व्रताला । झोंबोन पडती ॥ ३ ॥ ऐसें अवघें नासलें । सत्यासत्य हारपलें । अवघें अनायेकें[2] जालें । चहूंकडे ॥ ४ ॥ मतमतांचा गलबला । कोणी पुसेना कोणाला । जो जे मतीं सांपडला । तयासि तोचि थोर ॥ ५ ॥ असत्याचा अभिमान । तेणें पाविजे पतन[3] । ह्मणोनियां ज्ञातेजन । सत्य शोधिती ॥ ६ ॥ लोक वर्तती सकळ । तें ज्ञात्यास करतळामळ[4] । आतां ऐका केवळ । विवेकी हो ॥ ७ ॥ लोक कोण्या पंथें जाती । आणि कोण्या देवास भजती । ऐसी हे रोकडी प्रचीती । सावध ऐका ॥ ८ ॥ मृत्तिका धातु पाषाणादिक । ऐसिया प्रतिमा अनेक । बहुतेक लोकांचा दंडक । प्रतिमा[5] देवीं ॥ ९ ॥ नाना देवांचे अवतार । चरित्रें ऐकती एक नर । जपध्यान निरंतर । करिती पूजा ॥ १० ॥ एक सकळांचा अंतरात्मा । विश्वीं वर्ते जो विश्वात्मा । द्रष्टा साक्षी ज्ञानात्मा । मानिती एक ॥ ११ ॥ एक ते निर्मळ निश्चळ । कदापि नव्हेति चंचळ । अनन्यभावें केवळ । वस्तूच ते ॥ १२ ॥ एक नाना प्रतिमा । दुसरा अवतार महिमा । तिसरा तो अंतरात्मा । चौथा तो निर्विकारी ॥ १३ ॥ ऐसे हे चत्वार[6] देव । सृष्टीमधील स्वभाव । या वेगळा अंतर्भाव । कोठेंचि नाहीं ॥ १४ ॥ क्षीरें[7] नीरें[8] निवडिती । ते राजहंस बोलिजेती । सारासार जाणती । महानुभाव॥ १५ ॥

दश. ११ स० २

---

१ इच्छा धरून केलेलीं व्रतें. २ ज्याला कोणी त्राता किंवा नायक नाहीं असा. ३ दुर्गती. ४ हातांतील आंवळ्याप्रमाणें, हातच्या मळाप्रमाणें ५ मूर्ति. ६ चार प्रकारचे. ७ दूध. ८ पाणी.

काव्य ११७८

[ २ ]

सगुणाचेनि आधारें । निर्गुण पाविजे निर्धारें । सारासार विचारें । संतसंगें ॥ ६–६–५५ । ऐक निश्चयो तो ऐसा । मुख्य देव आहे कैसा । नाना देवांचा वळसा । करूंचि नये ॥ १ ॥ जेणें निर्मिलें चराचर । त्याचा करावा विचार । शुद्ध विवेकें परमेश्वर । ओळखावा ॥ २ ॥ दश ५ स० १०. ऐसीं अनंत नामें धरी । अनंत शक्ति निर्माण करी । तोचि जाणावा चतुरीं । मूळ पुरुष । ८–३–१३. देव सदोदित संचला । लोकीं बहुविध केला । परंतु बहुविध झाला । हें तों घडेना ।९–३–१३। शाश्वत देव तो निर्गुण । ऐसी अंतरीं बाणली खूण । देव कळला मी कोण । कळलें पाहिजे । १२--३--२ । निर्गुण ऐसें जें नांव । त्या जोवास कैंचा ठाव । गुणेंविण गौरव । येईल कैंचें ॥ ७–३–३५.

---

## देव

[ १ ]

जेणें केलें चराचर[२] । केले सृष्ट्यादि व्यापार । सकळकर्ता निरंतर । नाम जयाचें ॥ १ ॥ जेणें केल्या मेघमाळा । चंद्रबिंबीं अमृत-कळा । तेज दिधलें रविमंडळा । जया देवें ॥२॥ ज्याची मर्यादा सागरा । जेणें स्थापिलें फणिवरा[३] । जयाचेनि गुणें तारा । अंतरिक्ष[४] ॥ ३ ॥ ठायीं ठायीं देव असती । तिहीं केली नाहीं क्षिती[५] । चंद्र सूर्य तारा जीमूती[६] । तयांचेनि नव्हे ॥ ४ ॥ सर्वकर्ता तोचि देव । पाहूं जातां निरवयव । ज्याची कळा लीलालाघव । नेणती ब्रह्मादिक ॥ ५ ॥ देवें निर्मिली हे क्षिती । तिचे पोटीं पाषाण होती । तयासाच देव म्हणती । विवेक-

---

१ हव्यास. २ सजीव व निर्जीव सृष्टि. ३ शेष. ४ आकाश. ५ पृथ्वी. ६ मेघ.

हेनि ॥ ६ ॥ जो सृष्टि निर्माणकर्ता । तो ये सृष्टिपूर्वी होता । मग हे तयाची सत्ता । निर्माण जाहली ॥ ७ ॥ कुलालें[1] पात्रापूर्वी आहे । पात्रें कांहीं कुलाक नव्हे । तैसा देव पूर्वींच आहे । पाषाण नव्हे सर्वथा ॥ ८ ॥ अवघी सृष्टि जो कर्ता । तो ते सृष्टीहूनि परता[2] । तेथें संशयाची वार्ता । काढूंचि नये ॥ ९ ॥ तैसा सृष्टिकर्ता देव । परी तो नव्हे सृष्टिभाव[3] । जेणें केले नाना जीव । तो जीव कैसेनि ॥ १० ॥ एवं[4] जगदीश तो वेगळा । जग निर्माण ज्याची कळा । तो सर्वांमध्यें निराळा । असोनि सर्वी ॥ ११ ॥ पदार्थ वस्तु नाशवंत । हें तों अनुभवास येत । या कारणें भगवंत । पदार्थी वेगळा ॥ १२ ॥ देव विमळ आणि अचळ । शास्त्रें बोलती सकळ । तया निश्चळास चंचळ । ह्मणों नये सर्वथा ॥ १३ ॥ देव आला देव गेला । देव उपजला देव मेला । ऐसें बोलतां दुरितांला[5] । काय उणें ॥ १४ ॥ जन्ममरणाची वार्ता । देवास लागेना सर्वथा । देव अमर ज्याची सत्ता । त्यास मृत्यु कैसोनि ॥ १५ ॥ ——— दश. ८ स० १

[ २ ]

जन्म नाहीं मृत्यु नाहीं । येणें नाहीं जाणें नाहीं । बंधमोक्ष दोन्ही नाहीं । परमात्मयासि ॥ १ ॥ परमात्मा निर्गुण निराकार । परमात्मा अनंत अपार । परमात्मा नित्य निरंतर । जैसा तैसा ॥ २ ॥ परमात्मा सर्वांस व्यापक । परमात्मा अनेकीं एक । परमात्मयाचा विवेक । अतर्क्य आहे ॥ ३ ॥ ——:०:—— दश ८ स. ८

## ईश्वराची अतर्क्य शक्ति.

नानाफळें रसाळें लागलीं । नाना जिन्नसें गोडीस आलीं । गोडी पाहावया निर्माण केलीं । नाना शरीरें ॥ १ ॥ निर्माण झाले उत्तम

---

१ कुंभार. २ पलीकडे. ३ सृष्ट पदार्थ. ४ ह्या प्रमाणें. ५ पापाला.

विषय । शरीराविण भोगितां नये । म्हणोनि निर्मिला उपाय । नाना शरीरें ॥ २ ॥ ज्ञानेंद्रियें निर्माण केलीं । भिन्न भिन्न गुणांचीं निर्मिलीं । एका शरीरास लागलीं । परी वेगळालीं ॥ ३ ॥ श्रोत्रेंद्रियीं शब्द पडिला । त्याचा भेद पाहिजे कळला । ऐसा उपाय निर्माण केला । इंद्रियांमध्यें ॥ ४ ॥ त्वचेंद्रियें शीतोष्ण भासे । चक्षुरिंद्रियें सकळ दिसे । इंद्रियांमध्यें गुण ऐसे । वेगळाले ॥ ५ ॥ जिव्हेमध्यें रस चाखणें । घ्राणामध्यें परिमळ घेणें । इंद्रियांमध्यें वेगळाल्या गुणें । भेद केले ॥ ६ ॥ कर्मेंद्रियें लागवेगीं । जीव भोगी विषयांलागीं । ऐसा हा उपाय जगीं । ईश्वरें केला ॥ ७ ॥ अस्थिमांसांचीं शरीरें । निर्माण केलीं जगदीश्वरें । विवेकें गुण विचारें । करूनियां ॥ ८ ॥ अस्थिमांसाचा पुतळा । जाणे ज्ञानें सकळ कळा । शरीर भेद वेगळा । ठायीं ठायीं ॥ ९ ॥ देह सामर्थ्यानुसार । सकळ करी जगदीश्वर । थोर सामर्थ्यें अवतार । बोलिजेती ॥ १० ॥ एकासि एक वर्म केलें । महद्भूतें महद्भूत आळिलें । सकळ समभागें चालिलें । सृष्टि रचनेसी ॥ ११ ॥ दश. २० स. ८

---

## प्रकरण ९ वें.

### मनाचे श्लोक.

मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें । तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें ।
जनीं निंद्य तें सर्व सोडूनि यावें । जनीं वंद्य तें सर्व भावें करावें ॥ १ ॥
मना वासना दुष्ट कामा नये रे । मना सर्वथा पापबुद्धी नको रे ।

---

१ धर्मांची. २ कानांत. ३ डोळ्यांनीं. ४ नाकाठायीं. ५ एकदम. ६ प्रसन्न केलें. ७ भक्तिमार्गानें. ८ सहज.

मना सर्वथा[1] नीति सोडूं नको हो । मना अंतरीं सार[2] विचार राहो ॥२॥
मना पाप[3]-संकल्प सोडोनि यावा । मना सत्य[4]-संकल्प जीवीं धरावा ।
मना कल्पना ते नको विषयाची।विकारें[5] घडे हो जगीं सर्व छीछी ॥३॥
नको रे मना क्रोध हा खेदकारी । नको रे मना काम[6] नाना विकारी ।
नको रे मना सर्वदा अंगिकारू । नको रे मना मत्सरू दंभभारू[7] ॥ ४ ॥
मना श्रेष्ठ धारिष्ट[8] जीवीं धरावें । मना बोलणें नीच सोशीत जावें ।
स्वयें सर्वदा नम्र वाचे वदावें । मना सर्व लोकांसि रे नीववावें ॥ ५ ॥
तनू त्यागितां कीर्ति मागें उरावी । मना सज्जना हेचि क्रीया धरावी ।
मना चंदनाचे परी त्वां झिजावें । परी अंतरीं सज्जना नीववावें ॥ ६ ॥
नको रे मना द्रव्य तें पुढीलांचें । अति स्वार्थ-बुद्धी नको पाप साचें ।
घडे भोगणें पाप तें कर्म खोटें[9] । न होतां मनासारिखें दुःख मोठें ॥७॥
जनीं सर्वसूखी असा कोण आहे । विचारें मना तूंचि शोधून पाहे ।
मना त्वांचि रे पूर्वसंचीत केलें । तयासारिखें भोगणें प्राप्त झालें ॥८॥
मना मानसीं दुःख आणूं नको रे । मना सर्वथा शोक चिंता नको रे ।
विवेकें देहबुद्धि सोडूनि यावी । विदेहीपणें मुक्ति भोगीत जावी ॥ ९ ॥
मना सांग पां रावणा काय झालें । अकस्मात तें राज्य सर्वे बुडालें ।
ह्मणोनी कुडी वासना सांडि वेगीं । बळें लागला काळ हा पाठिलागीं॥१०॥
जिवा कर्मयोगें जनीं जन्म झाला । परी शेवटीं काळ घेऊनि गेला ।
महा थोर ते मृत्युपंथेंचि गेले । असंख्यात ते जन्मले आणि मेले॥११॥
मना पाहतां सत्य हें मृत्युभूमीं । जितां[10] बोलती सर्वही जीव मी मी ।
चिरंजीव[11] ते सर्वही मानिताती । अकस्मात सांडूनियां सर्व जाती ॥१२॥

१ सर्वथैव, मुळींच. २ खरा, सत्य. ३ कुकल्पना, वाईट हेतु. ४ सद्धेतु. ५ विकारानें, वासनेनें. ६ विषयवासना. ७ गर्वभार. ८ धैर्य. ९ ज्या कर्मामुळें पाप घडतें तें कर्म खोटें. १० जिवंत असतांना. ११ आपण चिरंजीव आहों असें मानितात.

मरे एक त्याचा दुजा शोक वाहे। अकस्मात तोही पुढें जात आहे।
पुरेना जनीं लोभ रे क्षोभे होतो। ह्मणोनि जनीं मागुता जन्म घेतो॥१३॥
मना मानसीं व्यर्थ चिंता वहाते। अकस्मात होणार होऊनि जातें।
घडे भोगणें सर्वही कर्मयोगें। मतीमंद तो खेद मानी वियोगें॥ १४॥
मना सर्वथा सत्य सांडूं नको रे। मना सर्वथा मिथ्य मांडूं नको रे।
मना सत्य तें सत्यवाचें वदावें। मना मिथ्य तें मिथ्य सोडूनि द्यावें॥१५॥
समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळीं कोण आहे।
जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही। नुपेक्षी कदा राम दासाभिमानी॥१६
वसे मेरु मांदार हे सृष्टिलीला। शशी सूर्य तारांगणें मेघमाळा।
चिरंजीव केले जगीं दास दोन्ही। नुपेक्षी कदा राम दासाभिमानी॥१७॥
असे हो जया अंतरीं भाव जैसा। वसे हो तया अंतरीं देव तैसा।
अनन्यांसी रक्षीतसे चापपाणी। नुपेक्षी कदा राम दासाभिमानी॥ १८॥
सदा चक्रवाकासि मार्तंड जैसा। उडी घालितो संकटीं स्वामि तैसा।
हरीभक्तिचा घाव घाली निशाणीं। नुपेक्षी कदा राम दासाभिमानी॥१९॥
मना पाविजे सर्वही सूख जेथें। अती आदर ठेविजे लक्ष तेथें।

---

१ संताप. २ संचिताच्या योगानें. ३ मनाप्रमाणें घडत नाहीं ह्मणून किंवा वियोगाच्या योगानें. ४ प्रतिपादूं नकोस. ५ स्वर्ग, मृत्यु आणि पाताळ हे तीन लोक. ६ जोंवर पृथ्वी, चंद्र, सूर्य तारांगणें व मेघमाळा हीं आहेत, तोंवर श्रीरामानें आपले भक्त मारुती व बिभीषण ह्यांना चिरंजीव केलें आहे. ७ तो दासाचा कैवारी राम भक्तांची हेळसांड करणार नाहीं. ८ चक्रवाक पक्षी मादीस सोडून नदीपलीकडे गेला असतांना सूर्यास्तनंतर रात्रीं तो विरहयुक्त होऊन तिकडून ओरडतो व मादी इकडून ओरडते. सूर्योदय त्यांचें विरहदुःख संपवितो तद्वत स्वामी अथवा गुरु भक्तांना संकटांतून मुक्त करतो. ९ शत्रूंच्या निशाणावर.

विवेकें कुडी कल्पना पालटीजे । मना सज्जना राघवीं वस्ति कीजे॥२०॥
जयाचेनि संगें समाधान भंगे । अहंता अकस्मात येऊनि लागे ।
तया संगतीची जनीं कोण गोडी । जिये संगतीनें मती राम सोडी ॥ २१ ॥
सदा बोलण्यासारिखें चालताहे । अनेकीं सदा एक देवासि पाहे ।
सगूणीं भजे लेश नाहीं भ्रमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥२२॥
नसे अंतरीं काम नानाविकारी । उदासीन[1] तो तापसी ब्रह्मचारी ।
निवाला[2] मनीं लेश नाहीं तमाचा। जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा २३
मदें मत्सरें[3] सांडिली स्वार्थ-बुद्धी । प्रपंचीक नाहीं जयातें उपाधी ।
सदा बोलणें नम्र वाचा सुवाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥ २४ ॥
सदा आर्जवी प्रीय जो सर्व लोकीं । सदा सर्वदा सत्यवादी विवेकी ।
न बोले कदा मिथ्य वाचा त्रिवाचा[4]। जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा २५
सदा सेवि आरण्य तारुण्यकाळीं । मिळेना कदा कल्पनेचेनि मेळीं ।
चळेना मनीं निश्चयो दृढ ज्याचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥२६॥
नसे मानसीं दुष्ट आशा दुराशा । वसे अंतरीं प्रेम पाशा पिपाशा[5] ।
ऋणी देव हा भक्तिभावें जयाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥२७॥
दिनाचा दयाळू मनाचा मवाळू । स्नेहाळू कृपाळू जगीं दासपाळू ।
जया अंतरीं क्रोध संताप कैंचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥२८॥
मना कल्पना कल्पितां कल्पकोटी । नव्हे रे नव्हे सर्वथा रामभेटी ।
मनीं कामना राम नाहीं जयाला[6] । अती आदरें प्रेम नाहीं तयाला[7] ॥२९॥
घरीं कामधेनू पुढें[8] ताक मागे । हरी-बोध सोडोनि वीवादिं लागे ।
करीं सार चिंतामणी कांच खंडें । तया मागतां देत आहे उदंडें ॥ ३० ॥

---

१ विरक्त, वीतरागी. २ शांत झाला ३ मदासह व मत्सरासह. ४ तिनदां बोलत नाहीं, एकदांच सत्य बोलतो. ५ पिपासा-तृष्णा. ६ जयाला मनीं कामना तयाला राम नाहीं. ७ तयाला रामाठायीं अतिआदरें प्रेम नाहीं. ८ दुसरीकडे.

आति मूढ त्या दृढबुद्धी[१] असेना । अती काम त्या राम चित्तीं वसेना ।
अती लोभ त्या क्षोभें[२] होईल जाणा । अती विषयीं सर्वदा दैन्यवाणा ॥३१॥
सुखानंदकारी[३] निवारी भयातें । जनीं भक्ति-भावें भजावें तयातें ।
विवेकें त्यजावा अनाचार हेवा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ ३२ ॥
जयाचेनि नामें[४] महा दोष जाती । जयाचेनि नामें गती[५] पाविजेती ।
जयाचेनि नामें घडे पुण्य-ठेवा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ ३३ ॥
बहूतां परी संकटें साधनाचीं । व्रतें दान उद्यापनें तीं धनाचीं ।
दिनांचा दयाळू मनीं आठवावा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥३४॥
अहो ज्या नरा राम विश्वास नाहीं । तया पामरा बाधिजे सर्व कांहीं ।
महाराज तो स्वामी कैवल्य दाता । वृथा वाहणें देह-संसार-चिंता ॥३५॥
मुखीं राम त्या काम बाधूं शकेना[६] । गुणीं इष्ट धारिष्ट त्याचे चुकेना[७] ।
हरीभक्त तो शक्त[८] कामासि मारी । जगीं धन्य तो मारुती ब्रह्मचारी[९] ॥३६॥
मुखीं नाम नाहीं तया मुक्ति कैंची । अहंता–गुणें यातना ते फुकाची ।
पुढें अंत येईल तो दैन्यवाणा । ह्मणोनी ह्मणा रे ह्मणा देवराणा ॥ ३७ ॥
यथा सांग रे कर्म तेंही घडेना । घडे कर्म तों पुण्य गांठीं पडेना ।
दया पाहतां सर्व भूतीं असेना । फुकाचें मुखीं नाम तेंही वसेना ॥३८ ॥
अती लीनता सर्वभावें स्वभावें । जना सज्जना लागिं संतोषवावें ।
देहे[१०] कारणीं सर्व लावीत जावे । सगूणा[११] अती आदरेंशीं भजावें ॥ ३९ ॥

---

१ दृढनिश्चय. २ दुःख. ३ सुखदायक आणि आनंददायक. ४ ज्याच्या नामस्मरणानें. ५ सद्गति. ६ जो ईश्वरभक्त आहे त्याला विषयाची पीडा होणें नाहीं. ७ सद्गुणाच्या योगानें संकटांत त्याचें धैर्य ढळत नाहीं. ८ जो हरिभक्त तो शक्तिमान्. ९ मारुतीचें ह्याप्रकारचें उदाहरणआहे. १० देह ईश्वरकारणीं लावावा. ११ सगुणाला अति आदरानें भजावें, ( सगुणाचेनि आधारें । निर्गुण पाविजे निर्धारें. ) सगुणा पासून निर्गुण देवाचीप्राप्ती होते.

क्रियेवीण नानापरी बोलिजे तें । परी चित्त दुश्चित्त तें लाजवीतें ।
मना कल्पना धीट सैराट धांवे । तया मानवा देव कैसोनि पावे ॥ ४० ॥
विवेकें क्रिया आपुली पालटावी । अती आदरें शुद्ध क्रीया धरावी ।
जगीं बोलण्यासारखें चालबापा । मनीं कल्पना सोड संसारतापा॥४१॥
सदा सर्वदा सज्जनांचेनि योगें । क्रिया पालटे भक्ति भावार्थ लागे ।
क्रियेवीण वाचाळता ते निवारीं । तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥४२॥
हिता कारणें बोलणें सत्य आहे । हिता कारणें सर्व शोधोनि पाहे ।
हिताकारणें बंड पाखांड वारी । तुटे वादसंवाद तो हीत-कारी ॥४३॥
जनीं सांगतां ऐकतां जन्म गेला । परी वादविवाद तैसाचि ठेला ।
उठे संशयो वाद हा दंभ-भारी । तुटे वाद संवाद तो हीत-कारी ॥४४॥
ध्रुव लेंकरूं बापुडें दैन्यवाणें । कृपा भाकितां दीधली भेट जेणें ।
चिरंजीव तारांगणीं प्रेमखाणी । नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ ४५॥
गजेंद्रू महा संकटीं वाट पाहे । तया कारणें श्रीहरी धांवताहे ।
उडी घातली जाहला जीवदानी । नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी॥४६॥
अजामीळ पापी तया अंत झाला । कृपाळूपणें तो जनीं मुक्त केला ।
अनाथांसि आधार हा चक्रपाणी।नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥४७॥

---

१ जो स्वतः आचरण न करितां दुसऱ्याला उपदेश मात्र करतो त्याचें दुश्चित्त त्याला लाजवितें, खातें. २ ज्याचें वर्तन शुद्ध नाहीं परंतु मनोकल्पना मात्र भराऱ्या मारीत आहेत अशाला देव कसा मिळेल ? ३ सज्जन संगतीनें अशुद्ध कर्मै पालटलीं जातात व भक्तिभाव उत्पन्न होतो. ४ क्रियेवांचून नुसती बडबड सोडून दे. ५ ज्या भाषणानें वाद मिटतो तो संवाद हितकारक. ६ सत्य बोलणें भाग आहे. ७ सर्व प्रकारें शोध कर. ८ जगामध्यें सांगतांना व ऐकतांना लोकांचे जन्मच्या जन्म गेले आहेत; परंतु वितंडवाद तसाच चालू आहे. ९ जो प्रेमाची खाण तो ध्रुव.

मना वासना वासुदेवीं वसों दे । मनो कामना कामसंगीं नसों दे ।
मना कल्पना वाउगी ते न कीजे । मना सज्जना सज्जनीं वस्ति कीजे४८
मना अल्प संकेल्प[1] तोही नसावा । सदा सत्य संकल्प चित्तीं वसावा ।
जनीं जल्प वीकल्प[2] तोहि त्यजावा । रमाकांत एकान्त काळीं भजावा[3]४९
विचारूनि बोले विवंचूनी चाले[4] । तयाचेनि संतप्त[5] तेही निवाले ।
बरें शोधल्यावीण बोलों नको हो । जनीं बोलणें शुद्ध[6] नेमस्त राहो ५०
धरीं रे मना संगती सज्जनाची । जिणें वृत्ति हे पालटे दुर्जनाची ।
बळें भाव सद्बुद्धि सन्मार्ग लागे । महा क्रूर तो काळ विक्राळ भंगे५१
जिवां श्रेष्ठ ते स्पष्ट सांगोनि गेले । परी जीव अज्ञान तैसेचि ठेले ।
देह बुद्धिचें कर्म खोटें ढळेना । जुनें ठेवणें मीपणें आकळेना ॥ ५२ ॥
जगीं पाहतां साच तें काय आहे । अती आदरें सत्य शोधूनि पाहें ।
पुढें पाहतां पाहतां देव जोडे । भ्रम भ्रांति अज्ञान हें सर्व मोडे[7] ॥ ५३ ॥
नव्हे पिंडज्ञानें नव्हे तत्वज्ञानें । समाधान कांहीं नव्हे तानमानें[8] ।
नव्हे योग यागें नव्हे भोग त्यागें । समाधान तें सज्जनाचेनि योगें ॥५४॥
बहूशास्त्र धुंडाळितां वाड आहे । जया निश्चयो एक तोही न साहे ।
मती[9] भांडती शास्त्रबोधें विरोधें । गती खुंटती ज्ञानबोधें प्रबोधें[10] ॥५५॥

---

१ अल्प काळ टिकणारा निश्चय करण्यापेक्षां तो न करणें बरें. २ सर्व प्रकारची बडबड आणि कुतर्क हीं सोडून द्यावीं. ३ एकान्त स्थळीं ईश्वराचें भजन करावें; कारण एकांतांत उपाधि नसल्यानें ध्यान धारणा उत्तम होते. ४ विचारपूर्वक बोलतो व चालतो. ५ त्रिविधतापांनीं पोळलेले. ६ बोलणें खरें व निश्चित असावें. ७ याप्रमाणें चिंतन करीत असतांना ईश्वरप्राप्ति होईल व भ्रम, भ्रांति आणि अज्ञान यांचें निरसन होईल. ८ गायनादि कलांच्या योगानें. ९ शास्त्रांचे परस्पर विरुद्ध असे अर्थ करून मताभिमानी लोक भांडत बसतात. १० ज्ञानाचा यथार्थ बोध झाल्यावर मनाची गति कुंठित होते; वितंड वाद संपतात.

जयें मक्षिका भक्षिली जाणिवेची[1] । तया भोजनाची रुची प्राप्त कैंची ।
अहंभाव ज्या मानसींचा विरेना[2]।तया ज्ञान हें अन्न पोटीं जिरेना ॥५६॥
नको रे मना वाद हा खेदकारी । नको रे नको भेद नानाविकारी ।
नको रे मना शीकवूं पूढिलांसी । अहंभाव जो राहिला तूजपाशीं ५७
अहंतागुणें सर्वही दुःख होतें । मुखें बोलिलें ज्ञान तें व्यर्थ जातें[3] ।
सुखें[4] राहतां सर्वही सूख आहे । अहंता तुझी तूंचि शोधोनि पाहे ॥५८॥
बरा निश्चयो शाश्वताचा[5] करावा । ह्मणे दास संदेह तो नीरसावा ।
घडीनें घडी[6] सार्थकाची करावी । सदा संगती सज्जनाची धरावी ॥५९॥
करी वृत्ति जो संत तो संत जाणा । दुराशागुणें जो नव्हे दैन्यवाणा ।
उपाधी देहबुद्धितें वाढवीते । परी सज्जना[7] केंवि बाधूं शके ते ॥ ६० ॥
जया मानला देव तो पूजिताहे । परी देव शोधोनि कोणी न पाहे ।
जगीं पाहतां देव कोट्यानुकोटी । जया मानली[8] भक्ति जे तेचि मोठी ६१
तिन्ही लोक जेथूनि निर्माण झाले । तया देवरायासि कोणी न बोले ।
जगीं थोरला देव तो चोरिलासे । गुरूवीण तो सर्वथाही न दीसे ॥६२॥
गुरू पाहतां लक्ष कोट्यानुकोटी । बहूसाल मंत्रावळी शक्ति मोठी ।
मनीं कामना चेटकें घातपाता । जनीं व्यर्थ रे तो नव्हे मुक्तिदाता ६३
नव्हे चेटकू चाळेकू[9] द्रव्यभोंदू[10]। नव्हे निंदकू मत्सरू भक्तिमंदू[11] ।

---

१ ज्ञानामृत भोजनांतील अहंभाव ही माशी होय. २ नाहींसा होत नाहीं. ३ अहंकारी मनुष्याचें बोलणें कोणाला रुचत नाहीं. व्यर्थ जातें. ४ अहंता सोडून सुखानें राहिल्यास. ५ जें चिरकाल टिकणारें त्याचा ६ आयुष्य क्षणोक्षणीं नाहींसें होत आहे, हें मनांत बाळगून क्षणसुधां व्यर्थ जाऊं देऊं नये. ७ जो संत किंवा सिद्ध झाला आहे त्याला देहबुद्धीचा उपसर्ग होणें नाहीं. ८ आवडली. ९ नादीं लावणारा, फसविणारा. १० द्रव्य उकळणारा. ११ भक्तिरहित.

नव्हे उन्मतूं[1] व्येसनी[2] संगबाधू[3] । जनीं ज्ञानियां[4] तोचि साधू अगाधू ६४॥
नव्हे वाउगी चावटी काम पोटीं । क्रियेवीण वाचाळता तेचि मोठी[5] ।
मुखीं बोलिल्या सारिखें चालताहे । मना सद्गुरू तोचि शोधोनि पाहे ६५
जनीं भक्त ज्ञानी विवेकी विरागी । कृपाळू मनस्वी[6] क्षमावंत योगी ।
प्रभू दक्ष व्युत्पन्न चातुर्य जाणे । तयाचेनि योगें समाधान बाणे ॥ ६६ ॥
देहबुद्धीचा निश्चयो ज्या ढळेना[7] । तया ज्ञान कल्पांत काळीं कळेना ।
परब्रह्म तें मीपणें आकळेना । मनीं शून्य[8] अज्ञान हें मावळेना[9] ॥ ६७ ॥
न जायें जपासी न जायें तपासी । न जायेंचि काशी न जायें गयेसी ।
गुरू चींतनेवीण कोठें न जायें । त्रिकाळीं सदा पाय तूं तेचि पाहें॥६८॥
मना गूज रे तूजला प्राप्त झालें[10] । परी अंतरीं पाहिजे यत्न केले ।
सदा श्रवणें पाविजे निश्चयासी । धरीं सज्जनां संगती धन्य होसी ॥६९॥
मना संगें[11] हा सर्व सोडोनि द्यावा । अती आदरें सज्जनाचा धरावा ।
जयाचेनि संगें महा दुःख भंगे । जनीं साधनेंवीणें[12] सन्मार्ग लागे ॥ ७०
मनाचीं शतें ऐकतां दोष जाती । मतीमंद ते साधना योग्य होती ।
चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य अंगीं । ह्मणे दास विश्वासतां मुक्ति भोगीं॥७१॥

---

१ उन्मत्त. २ व्यसनाधीन. ३ ज्याच्या संगतीनें बाधा होते तो. ४ जो चेटुक करणारा, फसविणारा निंदक इ० नव्हे, असा ज्ञानी लोकांत लोकोत्तर साधु होय. ५ जो वाचाळ ज्याच्या अंतरीं कामवासना, सत्क्रियेचा अभाव परंतु बडबड मात्र फार असा मनुष्य सद्गुरु नव्हे. ६ उदार मनाचा किंवा मन स्वाधीन ठेवणारा. ७ देह तो मीच हा निश्चय ज्याचा ढळत नाहीं; किंवा जो विषयासक्त त्यास कधींही ज्ञान प्राप्त होणार नाहीं. ८ जो विषयासक्त किंवा अहंमन्य तो मनीं शून्य, कोरा. ९ त्याचें अज्ञान कधींहि नाहींसें होणार नाहीं. १० तुला गुप्त गोष्ट प्राप्त व्हावी अशी जर इच्छा असेल तर मनःपूर्वक प्रयत्न केला पाहिजे. ११ अहंपणाचा, देहबुद्धीचा इ० अनेक संग. १२ साधनांचे श्रम केल्यावांचून.

# प्रकरण ७ वें.

## स्फुट अभंग.

### प्रपंच.

जन्मास घातलें देवें । काय येऊनि साधिलें । भुलले चुकले देवा । प्रपंच घातकी पहा ॥ १ ॥ आधींच सर्व जाणावें । काय येतें समागमें । निर्वाणीं अंतींचा देवो । कोणीं एके चुकों नये ॥ २ ॥ माझें माझें ह्मणे वेडा । स्वार्थबुद्धी बहूतसी । सर्व सांडूनि गेला रे । एकाएकीं उठोनियां ॥ ३ ॥ प्रपंचें भुलला प्राणी । व्यर्थ आयुष्य वेंचिलें । देव ना धर्म ना कांहीं । ऐसा सहावा रिपु ॥ ४ ॥ सर्वांसं योग साधेना । पुण्य उदंड पाहिजे । सहस्रामाजी तो एक । ज्ञान वैराग्य नेटका ॥ ५ ॥ षड्रिपु जिंकिले जेणें । तोचि ज्ञानी महा भला । दीक्षेनें उद्धरी लोकां । वैरागी तो उदासिनू ॥ ६ ॥

### सोंवळें ओंवळें.

[ १ ]

ऐसें कैसें रे सोंवळें । शिवतां होतसे ओवळे ॥ १ ॥ स्नान संध्या टिळेमाळा । पोटीं क्रोधाचा उमाळा ॥ २ ॥ नित्य दंडीतो[1]सी देह । परी फिटेना संदेह ॥ ३ ॥ नित्य नेम खटाटोप । मनीं विषयाचा जप ॥ ४ ॥ बाह्य[2] केली झळफ[3]ळ । देह बुद्धीचा विटाळ ॥ ५ ॥ रामदासी दृढभाव । तयावीण सर्व वाव ॥ ६ ॥

---

१ देहाला दंड किंवा शिक्षा करतो. २ बाहेरून ३ टिळेमाळा.

[ २ ]

अस्थीचा विटाळ होतां स्नान केलें । चुडे दांतवळें कासयाचीं ॥ १ ॥
आचमन करावें शूद्राच्या विटाळें । हाटाचे चौढोळे कोण जाणे ॥ २ ॥
नदीचे प्रवाहीं अंत पाहों नये । स्नान संध्या होय अग्रोदकीं ॥ ३ ॥
ओले चर्मी शुद्ध होत आहे हिंग । स्वयंपाकीं सांग सेविताती ॥ ४ ॥
रामदास ह्मणे हें कोणी न पाहे । देह मुळीं आहे विटाळाचा ॥ ५ ॥

चित्तशुद्धि.

[ १ ]

शौचँ केलें तेणें शुचिर्भूत झाला । जळस्नानें गेला मळ त्याचा ॥ १ ॥
मळत्यागें झालें शरीर निर्मळ । अंतरींचा मळ कैसा गेला ॥ २ ॥
कैसा जातो काम क्रोध लोभ दंभ । नांदतो स्वयंभ अंतर्यामीं ॥ ३ ॥
अंतर्यामीं आधीं होइजे निर्मळ । तेणें तुटे मूळ संसाराचें ॥ ४ ॥
विभ्रमासी बरें शोधोनि पहावें । अंतरी रहावें निष्ठावंत ॥ ५ ॥
निष्ठावंत ज्ञान पूर्ण समाधान । मग संध्यास्नान सफळित ॥ ६ ॥
सफळित संध्या संदेह नसतां । निःसंदेह होतां समाधान ॥ ७ ॥
समाधान नाहीं स्नानसंध्या कांहीं । लौकिकाचे ठायीं लोकलाज ॥ ८ ॥
लोकलाजे सर्व लौकिकचि केला । देव दुरावला वरपंगें ॥ ९ ॥
वरपंगें देव कदा सांपडेना । निष्ठेचा घडेना भक्तिभाव ॥ १० ॥
खटाटोपें देव कदा पाविजेना । निश्चय घडेना शाश्वताचा ॥ ११ ॥
शाश्वताचा शोध अंतरीं असतां । सर्व कांहीं पाहतां निरर्थक ॥ १२ ॥
निरर्थक तीर्थें निरर्थक व्रतें । दास म्हणे जेथें ज्ञान नाहीं ॥ १३ ॥

[ २ ]

चित्त आहे कैसें मळीण तें कैसें । शुद्ध होतें कैसें विचारावें ॥ १ ॥
वैद्य ओळखेना रोगही कळेना । औषध मिळेना प्रचीतीचें ॥ २ ॥

---

१ हरितदंताचें भूषण. २ बाजारांतील स्पर्शास्पर्श. ३ शुद्धता. ४ शुद्ध. ५ पाप.

अनुमानें देव अनुमानें भक्त । अनुमानें मुक्त अनुमानीं ॥ ३ ॥
अनुमानें केलें अनुमानें कल्पिलें । निर्फळ जाहालें सर्व कांहीं ॥ ४ ॥
सर्व कांहीं बरें प्रचीत आलिया । दास ह्मणे वांयां अप्रचीती ॥ ५ ॥

[ ३ ]

काम क्रोध आवरावे । मद मत्सर वारावे ॥ १ ॥ सांडोनियां कुल-क्षणें । शुद्ध धरावीं लक्षणें ॥ २ ॥ लोभदंभासी लुटावें । मीपणासि[3] आटोपावें ॥ ३ ॥ विवेक वैराग्यविश्वास । धरणें ह्मणे रामदास ॥ ४ ॥

## कल्पना.

कल्पनेचा देव कल्पनेची पूजा । तेथें कोणी दुजा आढळेना ॥ १ ॥
आढळेना देव आढळेना भक्त । कल्पनेरहित काय आहे ॥ २ ॥
आहे तैसें आहे कल्पना न साहे । दास ह्मणे पाहें अनुभवें ॥ ३ ॥

## मन.

रात्रंदिवस गव्हार । फिरतसे दारोदार ॥ १ ॥ आपलें मन आटोपावें । नाहीं तरी फाजित व्हावें ॥ २ ॥ कल्पनेचे भरोवरीं । करूं नये तेंचि करी ॥ ३ ॥ दास ह्मणे हें ओढाळ । आटोपिना तो चांडाळ ॥ ४ ॥

## माया.

काळ जातो क्षणक्षणां । मूळ येईल मरणा ॥ १ ॥ कांहीं धांवा धांव करीं । जंव तो काळ आहे दुरी ॥ २ ॥ देह आहे जाईजणे[4] । भुल-लासी कवण्या गुणें ॥ ३ ॥ मायाजाळीं गुंतलें मन । परि हें दुःखाचें कारण ॥ ४ ॥ सत्य वाटतें सकळ । परि हें नाहीं वेळ[5] ॥ ५ ॥ रामी रामदास ह्मणे । आतां सावधान होणें ॥ ६ ॥

---

१ कल्पनेनें. २ जें अनुभविक नाहीं तें. ३ अहंपणाला. ४ नश्वर. ५ शाश्वत.

काव्य

## लोकाचार.

संशयाचें कर्म संशयीं पडिला । तो कोणें सोडिला ज्ञानेंविण ॥ १ ॥
ज्ञानेंविण देव कैंचा ठाईं पडे । अज्ञानें बापुडे गुंढाळले ॥ २ ॥
गुंढाळले सर्व लौकिकाकरितां । लौकिक पाहतां उद्धरीना ॥ ३ ॥
उद्धरीना लोक हा कोणी कोणासी । व्यर्थचि देवासी अंतरावें ॥ ४ ॥
अंतरावें व्हावें बहुतां आधीन । बहुतांचें मन राखवेना ॥ ५ ॥
राखवेना मन या बहु जनाचें । आणि सज्जनाचें वर्म चुके ॥ ६ ॥
वर्म चुके कर्म आडवेंचि आलें । नाहीं ओळखिलें आत्मयासी ॥ ७ ॥
विवेकानें लाभ पावावा आपुला । लौकिकें देवाला सोडूं नये ॥ ८ ॥

——:o:——

## ज्ञान.

[ १ ]

ज्ञानावीण जी जी कळा । ती ती जाणावी अवकळा ॥ १ ॥
ऐसें भगवंत बोलिला । चित्त यावें त्याचे बोला ॥ २ ॥
एकें ज्ञानेंचि सार्थक । सर्व कर्म निरर्थक ॥ ३ ॥
दास ह्मणे ज्ञानाविण । प्राणी जन्मला पाषाण ॥ ४ ॥

[ २ ]

जया ज्ञान हें नेणवे । पशु तयासी ह्मणावें ॥ १ ॥ कोणें केले चराचर । कोण विश्वासि आधार ॥ २ ॥ ब्रह्मादिकांचा निर्मिता । कोण आहे त्या परता ॥ ३ ॥ अनंत ब्रह्मांडाच्या माळा । विचित्र भगवंताची कळा ॥ ४ ॥ रामदासाचा विवेक । सर्वांघटीं देव एक ॥ ५ ॥

---

१ भ्रमित झाले. २ कळत नाहीं. करणी.

[ ३ ]

प्रत्ययाचें ज्ञान तेंचि तें प्रमाण । येर अप्रमाण सर्व कांहीं ॥ १ ॥
सर्व कांहीं धर्म आणि कर्माकर्म । चुकलिया वर्म व्यर्थ जाती ॥ २ ॥
व्यर्थ जाती जन्म ज्ञानावांचुनियां । केले कष्ट वायां निरर्थक ॥ ३ ॥
निरर्थक जन्म पशुचीये परी । जंव तें अंतरीं ज्ञान नव्हे ॥ ४ ॥
ज्ञान नव्हे सोपें तें आधीं पहावें । शाश्वत शोधावें दास म्हणे ॥ ५ ॥

## सत्संगति.

[ १ ]

साधुसंगें साधु भोंदुसंगें भोंदू । वायांसंगें वादू होत असे ॥ १ ॥
होत असे लाभ भल्याच्या संगतीं । जाय अधोगती दुष्टसंगें ॥ २ ॥
दुष्ट संगें नष्ट झाला महा पापी । होतसे निष्पापी साधुसंगें ॥ ३ ॥
संग जया जैसा लाभ तया तैसा । होतसे आपैसा अनायासें ॥ ४ ॥
अनायासें गती चुके अधोगती । धरितां संगती सज्जनाची ॥ ५ ॥
सज्जनाची कृपा जयालागीं होय । तयालागीं सोय परत्राची ॥ ६ ॥
परत्राची सोय भक्तीचे उपाय । चुकती अपाय दास ह्मणे ॥ ७ ॥

[ २ ]

शरण जावें संतजना । सत्य मानावें निर्गुणा ॥ १ ॥ नाना मतीं काय चाड । करणें सत्याचा निवाड ॥ २ ॥ ज्ञानें भक्तीसी जाणावें । भक्त तयासी म्हणावें ॥ ३ ॥ रामी रामदास सांगे । सर्वकाळ संतसंगें ॥ ४ ॥

## कुसंगति.

दुर्जनसंगती कदा धरूं नये । घडती अपाये बहुविध ॥ १ ॥
बहुविध झाले अपाय बहुतां । तेचि आतां सांगें सावकाश ॥ २ ॥
कुसंग हेमाया धरितां संगती । गेले अधोगती नेणो किती ॥ ३ ॥

१ भांडखोरांबरोबर. २ सहज. ३ अनेक प्रकारचे.

चांडाळा संगतीं होइजे चांडाळ । होय पुण्यशीळ साधुसंगें ॥ ४ ॥
कुरुंदासंगतीं झिजला चंदन । कुसंगें जीवन नासतसे ॥ ५ ॥
खाराचे संगतीं नासे मुक्ताफळें[1] । होतसे तत्काळ कळाहीन ॥ ६ ॥
लाखेच्या संगतीं सोनें होय उणें । दुग्ध हें लवणें नासतसे ॥ ७ ॥
दुर्जनासंगतीं सज्जन ढांसळे[2] । क्रोध हा प्रबळे अकस्मात ॥ ८ ॥
दास ह्मणे संग त्याग दुर्जनाचा । धरा सज्जनाचा आदरेंसी ॥ ९ ॥

## सज्जन.

### [ १ ]

पतित हे जन करावे पावन । तेथें अनमान करूं नये ॥ १ ॥
करूं नये गुणदोष उठाठेवी । विवेकें लावावी बुद्धि जना ॥ २ ॥
बुद्धि सांगे जना त्या नांव सज्जन । पतित पावन दास ह्मणे ॥ ३ ॥

### [ २ ]

त्याचे पाय हो नमावे । त्याचें कीर्तन हो ऐकावें ॥ १ ॥ दुजियासी सांगे कथा । आपण वर्ते त्याची पथा ॥ २ ॥ कीर्तनाचें न करी मोल । जैसे अमृताचे बोल ॥ ३ ॥ सन्मानितां नाहीं सुख । अपमानितां नाहीं दुःख ॥ ४ ॥ किंचित् दिलें दातयानें । तेंही घेत आनंदानें ॥ ५ ॥ ऐसा आहे हरिदास । लटकें न वदे रामदास ॥ ६ ॥

### [ ३ ]

जाणावा तो नर देवचि साचार । वाचे निरंतर रामनाम ॥ १ ॥
सगुणी सद्भाव नाहीं ज्ञानगर्व । तयालागीं सर्व सारिखेची ॥ २ ॥
निंदका वंदका संकटी सांभाळी । मन सर्व काळीं पालटेना ॥ ३ ॥
पुढिलांसी नाना सुख देत आहे । उपकारीं देह लावितसे ॥ ४ ॥
लावितसे देह रामभजनासी । रामी रामदास हरिभक्ती ॥ ५ ॥

---

१ मोती. २ पतित होतो.

## क्रोध.

कोप आरोपणा खोटी । कोपें कोपची वाढतो ॥ मोडतो मार्ग न्यायाचा । अन्याय प्रबळे बळें ॥ १ ॥ क्रोध हा खेद संपादी । जेथें तेथें चहूंकडे ॥ विवेक पाहतां कैंचा । शुद्धि तेथें असेचिना ॥ २ ॥ कुशब्द वोखटे काढी । त्रासकें वचनें वदे ॥ घेतसे वालटें ढालें । उणें काढी परोपरी ॥ ३ ॥ ताडिले पाडिले पडले । रक्तबंबाळ जाहले । घरची मारिती हांका । हांका बोंबा परोपरी ॥ ४ ॥ भल्यांनीं कोप सांडावा । शांतीनें असतां बरें ॥ क्षुल्लकें कोप पाळावा । भल्यांचें काम तो नव्हे ॥५॥ मद हा वोखटा मोठा । मद हो खेद कारक ॥ मदानें पद लाभेना । मद शोक करी भला ॥ १ ॥ देहाचा मद शक्तीचा । द्रव्याचा मद अंतरीं ॥ विद्येचा मद भाग्याचा । मद स्वरूप बहुविधा ॥ २ ॥ मदानें भुलला प्राणी । विचारें उमजेचिना ॥ परांचें सत्य मानेना । विवरेना कदापिही ॥ ३ ॥ चालणें थोर तें माझें । मोहरा मीच बहु भला । न्यायाची गोष्ट मानेना । नीतीनें कोप येतसे ॥ ४ ॥ आपणापरतें नाहीं । सर्व कांहीं भूमंडळीं । गुणग्राहकता नाहीं । पराचें तुच्छ होतसे ॥ ५ ॥ थोर आयुष्य मोलाचें । मदें व्यर्थचि नाशिलें ॥ पापी हा उमजों नेदी । शेवटीं दुरी होतसे ॥ ६ ॥

## मत्सर.

मद तो तिसरा शत्रू । चौथा मत्सर आईका ॥ मत्सरें सत्य मानेना । सत्याचें लटकें करी ॥१॥ आपणु टोणपा आहे । सर्वज्ञा न मनी कदा॥ आपणु तामसी आहे । पुण्यवंता पडेचिना ॥२॥ आपणु कुकर्मी प्राणी।

---

१ धारणा. २ अमंगल. वाईट. ३ नसते आरोप. ४ हलक्या लोकांनीं. ५ श्रेष्टपद. ६ दावेदार. ७ मूर्ख. ८ मानीत नाहीं. ९ ऐकत नाहीं.

सत्कर्मासी उच्छेदितो ॥ आपणु चोरटा आहे । सकळां चोरटें करी ॥ ॥ ३॥ आपणु भ्रष्टला आहे । भल्याला भ्रष्ट भाविती[1] ॥ आपणु घातकी मोठा । पराला घातकी म्हणे ॥ पोटींचा कपटी मोठा । जनाला कपटी म्हणे ॥ आपणा भक्ति ठाकेनां[2] । हरिभक्तां उच्छेदितो ॥ ५ ॥ मत्सरें भाग्यही गेलें । मत्सरें बुद्धि नासिली ॥ भक्ति ज्ञान ना कांहीं । आरत्र परत्र नसे ॥ ६ ॥

## दंभ.

स्वार्थ हा व्यर्थ जाणावा । परंतु जन आंधळे ॥ दंभानें आंधळे केलें । ऐसा हा दंभ तस्करू[3] ॥ १ ॥ देहाचा दंभ तो खोटा । परंतु आवडे जना । विवेक पाहतां नाहीं । दुःखी होती ह्मणोनियां ॥ २ ॥ निस्पृहा दंभ बाधीना । निस्पृह पाहिजे बरा । अंतरें अंतरा भेदी । तेथें दंभचि नाढळे ॥ ३ ॥ धन्य तो विवेकी राजा । वैराग्यबळ आगळें ॥ भक्तीचा बोळला सिंधु । दंभ तेथें दिसेचिना ॥ ४ ॥

## करुणापर अभंग.

### [ १ ]

तुज कैसें पाहूं देवा । तुझी कैसी करूं सेवा ॥ १ ॥ बहु देव पाहुनि आलों । बहुरूपीं भांबावलों[4] ॥ २ ॥ बहुतांच्या बोलें गेलों । तेणें बहुत कष्टलों ॥ ३ ॥ रामी रामदास म्हणे । ऐशीं जनांचीं लक्षणें ॥ ४ ॥

### [ २ ]

एक देव आहे खरा । माये नाथिला पसारा ॥ १ ॥ हेंचि विचारें जाणावें । ज्ञाता तयासी म्हणावें ॥ २ ॥ रामदासाचें बोलणें । स्वप्नापरी जाई जिणें ॥ ३ ॥

---

१ समजतो. २ कळत नाहीं. ३ चोर. ४ घाबरलों.

[ ३ ]

भाव धरीं संतापायीं । तेणें देव पडे ठायीं ॥ १ ॥ नाना देवांचें भजन । तेणें नोहे समाधान ॥ २ ॥ सकळा देवांमध्यें सार । आहे अनंत अपार ॥ ३ ॥ रामी रामदास म्हणे । अवघे देव केले जेणें ॥ ४ ॥

[ ४ ]

तुजविण देवा मज कोणी नाहीं । माझी चिंता कांहीं असों द्यावी ॥१॥ वैराग्यें कनिष्ठ अभावें वरिष्ट । माझे मनीं नष्ट संदेह तो ॥ २ ॥ विवेकें सांडिलें ज्ञानें वोसंडिलें । चित्त हें लागलें तुझे पायीं ॥ ३ ॥ तुझें नाम वाचें उच्चारीत असे । अंतरीं विश्वासें धरियलें ॥ ४ ॥ रामदास म्हणे मी तुझें अज्ञान । माझें समाधान करीं देवा ॥ ५ ॥

[ ५ ]

दीनाचा दयाळु कीर्ति ऐकियेली । ह्मणूनि पाहिली वाट तुझी ॥ १ ॥ अनाथाचा नाथ होशील कैवारी । ह्मणोनियां हरी बोभाईलें ॥ २ ॥ तुजविण कोण जाणे हें अंतर । कोणासी जोजार घालूं माझा ॥ ३ ॥ दास म्हणे आह्मी दीनांहुनी दीन । करावें पालन दुर्बळाचें ॥ ४ ॥

[ ६ ]

आम्हां पतितांची सांड केली जरी । आमचा कैवारी कोण आहे ॥१॥ आम्हीं भरंवसा कोणाचा धरावा । सांगावें केशवा दयानिधे ॥ २ ॥ तुजविण आम्हां नाहीं त्रिभुवनीं । धांवें चक्रपाणी दीनबंधो ॥ ३ ॥ पतित पावन ब्रीद हें बांधिलें । तारावें वहिलें दासालागीं ॥ ४ ॥

[ ७ ]

शिरीं आहे रामराज । औषधाचें कोण काज ॥ १ ॥ जो जो प्रयत्न रामाविण । तो तो दुःखासि कारण ॥ २ ॥ शंकराचें हळाहळ । जेणें केलें सुशितळ ॥ ३ ॥ आह्मां तोचि तो रक्षिता । रामदासी नाहीं चिंता ॥ ४ ॥

---

१ धांवा केला. २ ज्याप्रमाणें देवावर त्याच प्रमाणें सत्यावर निस्सीम प्रेम ठेवून व्यवहार केले असतां अनेक संकटांचें आपोआप निवारण होईल. ३ विष.

## उपदेशपर.

[ १ ]

अंतकाळ येत येतां । पुढें नये चुकवितां ॥ १ ॥ अकस्मात लागे जावें । कांहीं पुण्य आचरावें ॥ २ ॥ पुण्यावीण जातां प्राणी । घडे यमाची जाचणी ॥३॥ रामदास ह्मणे जनां । कठीण यमाची यातना॥४॥

[ २ ]

कर्ता एक देव तेणें केलें सर्व । तयापाशीं गर्व कामा नये ॥ १ ॥ देह हे देवाचे वित्त कुबेराचें । तेथें या जीवाचें काय आहे ॥ २ ॥ देता देवविता नेता नेवविता । कर्ता करविता जीव नव्हे ॥ ३ ॥ निमित्ताचा धनी केला असे प्राणी । पाहतां निर्वाणीं जीव कैंचा ॥ ४ ॥ लक्ष्मी हीं देवाची सर्व सत्ता त्याची । त्याविण जीवाची उरी नाहीं ॥५॥ दास म्हणे मना सावध असावें । दुश्चित नसावें कदा काळीं ॥ ६ ॥

[ ३ ]

कष्ट करितां मनीं विटे । तरि तों कळेल शेवटें ॥ १ ॥ कष्टें उदंड आटोपावें । तरि मग पुढें सुखी व्हावें ॥ २ ॥ असतां परधन वेडें । काय निवेल बापुडें ॥ ३ ॥ शहाणे उदंड कष्टती । वडिल उपकारें दाटती ॥४॥ बहुत राखिले लौकिक । त्यांचें जीणें अलौकिक ॥ ५ ॥ ज्यास त्यास पाहिजे तो । जनीं वाटपास येतो ॥ ६ ॥ मनोगत जाणे सूत्रें । जेथें तेथें जगमित्रें ॥ ७ ॥ न सांगतां काम करी । ज्ञान उदंड विवरी ॥ ॥ ८ ॥ स्तुती कोणाची न करी । प्राणीमात्रा लोभ करी ॥ ९ ॥ कदा विश्वास मोडिना । कोणी माणूस तोडिना ॥ १० ॥ जनीं बहूतांचि

१ मरण. २ जाचणी. ३ बद्ध होतात. ४ ज्यांनीं अनेक प्रकारें अब्रु सांभाळली आहे, त्यांचें आयुष्य धन्य होय. ५ कामास. ६ धोरण, संबंध.

साहतो । कीर्तिरूपेंचि रहातो ॥ ११ ॥ दास म्हणे नव्हे दुःखी । आपण सुखी लोक सुखी ॥ १२ ॥

[ ४ ]

कामक्रोध खवळले । मद मत्सर मातले ॥ १ ॥ त्यांचे अधीन लागे होणें । ऐसें केलें नारायणें ॥ २ ॥ लोभ दंभ अनावर । जाहला गर्व अहंकार ॥ ३ ॥ दास म्हणे सांगों किती । पडली ऐशांची संगती ॥४॥

[ ५ ]

काम क्रोधें खवळला । तेणें सन्निपात झाला ॥ १ ॥ त्यासि औषध करावें । पोटीं वैराग्य धरावें ॥ २ ॥ कुपथ्य अवज्ञेचें झालें । मग तें पुढें उफाळेलें ॥ ३ ॥ मर्यादेनें निर्बुजलें । वारें अभिमानें घेतलें ॥ ४ ॥ रामदास म्हणे भले । लोक म्हणती पिसाळले ॥ ५ ॥

[ ६ ]

लक्ष्मी[३] आहे रे चंचळ । इस जातां नाहीं वेळ ॥ १ ॥ सत्य मानावें उत्तर । देव नित्य निरंतर ॥ २ ॥ नाना वैभव समस्त । येती जाती अकस्मात ॥ ३ ॥ म्हणे रामी रामदास । काय देहाचा विश्वास ॥ ४ ॥

[ ७ ]

नदी मर्यादा सांडिती । उष्णकाळीं वोस होती ॥ १ ॥ तैसा तारुण्याचा भर । सवेंचि[४] होतसे उतार ॥ २ ॥ भाग्य चढों लागे वेगें । सवेंचि प्राणी भीक मागे ॥ ३ ॥ रामदास म्हणे काळ[५] । कोणे दिवस पर्वकाळ[६] ॥ ४ ॥

---

१ सहन करतो. २ विकोपास गेलें. ३ संपत्ति. ४ लागलीच. ५ वाईट दिवस. ६ चांगला दिवस.

[ ८ ]

काया हे काळाची घेऊनि जाणार । तुझेनी होणार काय-बापा-॥१॥
काय बापा ऐसें जाणोनि नेणसी । मी माझें ह्मणसी वांया-विण ॥ २॥
वांयाविण शीण केला जन्मवरी । दंभ लोकाचारी नागवण ॥ ३ ॥
नागवण आली परलोकां जातां । लौकिक तत्वतां इहीं लोकीं ॥ ४ ॥
केली नाहीं चिंता नामीं कानकोंडें[1]। आतां कोण्या तोंडें जात आहे ॥ ५ ॥
जात आहे सर्व सांडूनि करंटा । जन्मवरी ताठा धरूनियां ॥ ६ ॥
धरूनियां ताठा कासया मरावें । भजन करावें दास ह्मणे ॥ ७ ॥

[ ९ ]

गतीचें लक्षण हेंची हें प्रमाण । श्रवण मनन सर्वकाळ ॥ १ ॥
सर्वकाळ सारासार विचारणा । वस्तुची चाळना निरंतर ॥ २ ॥
निरूपणें होय अलभ्याचा लाभ । साधन सुलभ दास म्हणे ॥ ३ ॥

[ १० ]

निरूपणा ऐसें नाहीं समाधान । आणिक साधन आढळेना ॥ १ ॥
भक्तिज्ञान घडे वैराग्य आतुडे । भावार्थ सांपडे निरूपणें ॥ २ ॥
शांति क्षमा दया नैराशता[3] मनीं । अवस्था उन्मनी निरूपणें ॥ ३ ॥
रिद्धी सिद्धी दासी होती निरूपणें । श्रवणें मननें निदिध्यासें ॥ ४ ॥
भ्रांतीचा संदेह तुटे एकसरां । दास म्हणे करा निरूपण ॥ ५ ॥

[ ११ ]

अर्थाविण पाठ कासया करावें । व्यर्थ कां मरावें घोकोनियां ॥ १ ॥
घोकुनियां काय वेगीं[4] अर्थ पाहें । अर्थ रूप राहे होउनियां ॥ २ ॥
होऊनियां अर्थ सार्थक करावें । रामदास भावें सांगतसे ॥ ३ ॥

———:०:———

१ चोरटें, साशंक- २ प्रगतीचें, सद्गतीचें. ३ विरक्ति. ४ लवकर.

## करुणाष्टकें.

[ १ ]

अनुदिनिं अनुतापें तापलों रामराया ।
परम दिनदयाळा नीरसीं मोहमाया ॥
[1]अचपल मन माझें नावरे आवरीतां ।
तुजविण शिण होतो धांव रे धांव आतां ॥ १ ॥
विषयजनित सूखें सूख होणार नाहीं ।
तुजविण रघुनाथा ओखटें सर्व कांहीं ॥
रघुकुळटिळकारे हीत माझें करावें ।
दुरित दुरि रहावें स्वस्वरूपीं भरावें ॥ २ ॥
तनुमन धन माझें राघवा रूप तूझें ।
तुजविण मज वाटे सर्व संसार ओझें ॥
प्रचलित न करावी सर्वथा बुद्धि माझी ।
अचल भजन लीला लागली आस तूझी ॥ ३ ॥
तुजविण करुणा हे कोण जाणेल माझी ।
शिणत शिणत पोटीं पाहिली वाट तूझी ।
झडकरि झड घालीं धांव पंचानना रे ।
तुजविण मज नेती जंबुकी वासना रे ॥ ४ ॥
जळचर जळवासी नेणती त्या जळासी ।
निशिदिनीं तुजपाशीं चूकलों गूणरासी ॥
[2]भुमिधर निगमांसी वर्णवेना तयासि ।
सकळ भुवनवासी भेटि दे रामदासीं ॥ ५ ॥

[ २ ]

असंख्यात ते भक्त होऊन गेले । तिहीं साधनांचे वहु कष्ट केले ।
नव्हे कार्यकर्ता भुमीभार झालों । तुझा दास मी व्यर्थ जन्मासि आलों १

१ चंचल. २ शेष.

बहू दास ते तापसी तीर्थवासी । गिरी कंदरीं भेटि नाहीं जनासी ।
स्थिती ऐकतां थोर विस्मीत झालों । तुझा दास मी व्यर्थ जन्मासि आलों २
सदा प्रेमळासी तया भेटलासी । तुझ्या दर्शनें स्पर्शनें पुण्यराशी ।
अहंतामदें शब्दज्ञानें बुडालों । तुझा दास मी व्यर्थ जन्मासि आलों ॥३॥
नसे भक्ति ना ध्यान ना ज्ञान कांहीं । नसे प्रेम हें राम विश्राम नाहीं ।
असा दीन अज्ञान मी दास तूझा । समर्था जनीं घेतला भार माझा ॥४॥
रघूनायका दीन हातीं धरावें । अहंभाव छेदोनियां उद्धरावें ।
अगूर्णी[1] तयालागिं गूणी करावें । समर्थें भवां सागरीं ऊतरावें ॥ ५ ॥
किती भार घालूं रघुनायकाला । मजकारणें शीण होईल त्याला ।
दिनानाथ हा संकटीं धांव घाली । तयाचेनि हे सर्व काया निवाली ॥६॥

[ २ ]

उदासीन हे वृत्ति जीवीं धरावी । अती आदरें सर्व सेवा करावी ।
सदा प्रीति लागो तुझे गूण गातां । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥१॥
सदा सर्वदा योग[2] तुझा घडावा । तुझे कारणीं देह माझा पडावा ।
उपेक्षूं नको गूणवंता अनंता । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ २ ॥
मनीं कामना कल्पना ते नसावी । कुबुद्धी कुडी वासना नीरसावी ।
नको संशयो तोडिं संसार-वेथा । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ ३॥
ब्रिदाकारणें दीन हातीं धरावें । म्हणे दास भक्तांसि रे उद्धरावे ।
सुटे ब्रीद आम्हांसि सोडोनि जातां । रघूनायका मागणें हेंचि आतां ४

---:०:---

## अमृत तुषार.

सवे लावितां सवे पडे । सवे पडतां वस्तु आतुडे । नित्यानित्य विचारें घडे । समाधान । ७-७-१५

भूस सांडून कण घ्यावा । तैसा वांच्यांश[3] त्यजावा । कण लक्ष्यांशें[4] लक्षावा । शुद्ध स्वानुभवें । ६-१०-२४

---

१ मूढ. २ संग. ३ शब्दभाग. ४ विचारार्ह भाग.

जाणिजे परमात्मा निर्गुण । त्यासीच ह्मणावें ज्ञान । त्यावेगळें तें अज्ञान । सर्व कांहीं । ६-१-१९

प्रीतीचें लक्षण ऐसें । अंतरीं उठे अनायासें । पाणी पाणवाटें जैसें । आपणाचि धांवें । ७-९-२१

ज्याचा जो व्यापार । तेथें असावें खबरदार । दुश्चित्तपणें तरी पोर । वेढा लावी । ११-३-१९

जाणावें पराचें अंतर । उदासीनता निरंतर । नीति न्यायास अंतर । पडोंच नेदावें । १२-५-६

दोष देखोन झांकावे । अवगुण अखंड न बोलावे । दुर्जन सांपडोन सोडावे । परोपकार करूनी । २१-५-१०

भल्यांची महिमा ऐसी । जे सन्मार्ग लावी लोकांसी । पोहणार असतां बुडतयासी । बुडों नेदी । १७-१-१४-

वींट नाहीं कंटाळा नाहीं । आलस्य नाहीं त्रास नाहीं । इतुकी माया कोठेंचि नाहीं । माते वेगळी । १७-२-२७.

आधीं राखावा आचार। मग पहावा विचार । आचारें विचारें पैल-पार । पाविजेतो । ७-१०-१५

अंतरनिष्ठ[1] तितुके तरले । अंतरभ्रष्ट तितुके बुडाले । बाह्यात्कारें भरं. गळले । लोकाचारें ॥ १८-१-२४

अति सर्वत्र वर्जावें । प्रसंग पाहोन चालावें । हट निग्रहीं[2] न पडावें । विवेकी पुरुषें ॥ १८-६-७

जो दुसऱ्याचें अंतर जाणे । देशकाळ प्रसंग जाणे । तया पुरुषा काय उणें । भूमंडळीं ॥ १४-७-२७

जो बहुतांस मानला । तो जाणावा शहाणा झाला । जनीं शहाण्या मनुष्याला । काय उणें ॥ १२-३-२६

---

१ स्वतःच्या ठायीं ज्यांची निष्ठा आहे असे. २ हटयोग मार्गांत, हेकेखोरपणांत.

विचारें ऊर्ध्वं[1]चढती । तयासीच ऊर्ध्वगेती[2] । येरां सकळां अधोगेति[3] । पदार्थ ज्ञानें ॥ १७-३-२१

जे ग्रंथीं जो विचार । वृत्ती होय तदाकार । म्हणोनि निरूपण सार । भक्तिज्ञान वैराग्य ॥ विधि. सं. सो. ४-७

देहें जैसें केलें तैसें होतें । यत्न केल्या कार्य साधतें । तरी मग कष्टावें तें । काय निमित्य । १७-७-३०

ज्ञानदृष्टीचें देखणें । चर्मदृष्टी पाहों नेणें । अंतर वृत्तीचिये खुणे । अंतरवृत्ति साक्ष ॥ ७-५-४८

बहुताचि करितां हट । तेथें येऊन पडले तट । कोणी एकाचा शेवट । झाला पाहिजे ॥ १८-६-८

धर्म स्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार । जाले आहेत पुढें होणार देणें ईश्वराचे ॥ १८-६-२०

जितुकें कांहीं आपणासी ठावें । तितुकें हळु हळु शिकवावें । शहाणे करून सोडावें । बहुत जन ॥ १९-१०-१४

परोपरीं शिकवणें । आडणुका सांगत जाणें । निवळ करून सोडणें । निस्पृहांसी ॥ १९-१०-१५

सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें । परंतु येथें भगवंताचें । अधिष्टान पाहिजे ॥ २०-४ २६

शांति क्षमा दयाशील । पवित्र आणि सत्वशील । अंतर शुद्ध ज्ञान शील । ईश्वरी पुरुष ॥ १-८-१९

जो आपुलें हित न करी । तो आपुला आपण वैरी । येथें कांहीं कोणावरी । शब्द नाहीं ॥ सेवकधर्म १-४

ज्याचें अंतरीं स्वार्थबुद्धी । तेथें कैंची असेल शुद्धि । बुद्धि सांडितां अवधी । दुःखासि होय । सेवकधर्म १-७४

समाप्त.

---

१ वर, उंच. २ सद्गति. ३ दुर्गति.

# कठिण शब्दांचा कोश.

अ

अंकित— अधीन
अखंड—निरंतर
अगाध—खोल, फार
अर्चन—पूजन
अघवा—सर्व
अंजन—नेत्रौषध, ज्ञानदृष्टी होण्यास आवश्यक जी गुरुकृपा किंवा ईश्वरी प्रसाद तो
अंतर—मन, हृदय
अंतराळ—आकाश
अर्थांतर—अर्थाचें मर्म, दुसरा [अर्थ
अधिष्ठान—ठिकाण, स्थळ
अधोगति—पतन, नरक
अध्यात्मविद्या—ब्रह्मज्ञान विषयक ज्ञान
अनर्गल—स्वच्छंदी वर्तन
अनन्य—एकनिष्ठ
अनुताप—पश्चात्ताप
अभ्यंतर—मन, हृदय
अत्रीं—ह्या लोकीं
अलक्ष्य--अतर्क्य
अवगुण--दुर्गुण
अवधान—लक्ष
अविद्या--अज्ञान, माया
अव्हाट—आडमार्ग
असार खोटें.
अहंता—, अहंभाव— } गर्व, ताठा
अक्षर—स्थिर, जो नाश पावत नाहीं तो

आ

आगम—शास्त्र
आगळा—अधिक
आर्जव—सरळपणा, लीनता
आणिक—दुसरें
आर्त—आवड
आतुडे—मिळे, लाभे
आपैसा—सहज, आपोआप
आत्मनिवेदन—देहसमर्पण, आत्मसमर्पण
आत्मविद्या—वेदान्तविद्या, आत्मज्ञान
आत्महत्यारा---आत्मघातकी,

आत्मज्ञान—आत्मा म्हणजे ब्रह्म तें जाणणें. स्वरूपाविषयीं ज्ञान
आवांका—आटोका, धैर्य
आशंका—शंका
आर्ष—असमंजस, असंबद्ध
आश्रम—ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास
आसक्ती—अधीनता
आहाच—वरवर, सहज

उ

उचित— योग्य
उक्ति—भाषण, वचन
उच्छेदणें—उपटून टाकणें
उदंड—बहुत, पुष्कळ,
उद्वेग—चिंता, खेद, त्रास
उन्मन—वृत्तिरहित, विरक्त
उपरती—विरक्ती वैराग्य,
उपाधी—उपसर्ग, त्रास
उपासना—सेवा
उपेक्षा—हयगय
उरी—बाकी, ठाव,
ऊर्मि—मनाचा आवेग, तरंग

ए

एकनिष्ठ—अनन्य, एके ठिकाणीं निष्ठा असणें
एकसरां—एकदम, सरसकट

ओ

ओखटें—वाईट

क

करंटा—दुर्दैवी, हतभाग्य
कष्टी—दुःखी
कल्पतरु—जो इच्छित कामना पूर्ण करतो असा स्वर्गांतील वृक्ष
कल्पांत—चार अब्ज बत्तीस कोटी वर्षांचा काल, जेव्हां सृष्टी नाश होऊन पुनः सृष्टी निर्माण होते तो.
कामना—इच्छा, वासना
काम—विषयवासना, मदन
कामिक—इच्छित
काळ—यम
कुटिल—द्वाड, खोडसाळ
कुडी—खोटी वाईट
कुसरी कौशल्य
कुलाल—कुंभार
कैंवी—कसें

कैंचा—कशाचा
कैंपक्ष—कैंवार, पक्षपात
कैवल्य—मोक्ष
केवाड—प्रकार
कोटी—प्रकार
कोड—कौतुक, हौस
कोवसा—आधार

ग

गति—सद्गति
गव्हार—मूर्ख, अजागळ मनुष्य
गाबाळ—केरकचरा
गोमटें—सुंदर
गोवा—गुंता, गोंधळ.

च

चतुर्विध मुक्ति—सलोकता, समपिता, सरूपता व सायुज्यता,
चाड—पर्वा, आवड
चावटी—चावटपणा
चाळणा—चिकित्सा, विचार
चिंतामणि—इच्छित वस्तु प्राप्त करून देणारा मणि
चेटकें—जारण मरण उच्चाटण, इत्यादि मांत्रिक क्रिया
चेतना—जीवित्व, चलनवलन
चोज—लाड, कौतुक

ज

जंव—जोंपर्यंत
जल्प—बडबड
जाड—मोठा
जाणिव—ज्ञान, गर्व
जिणावा—जिंकावा
जिणें—जीवित
जिवलग—प्राणप्रिय
जितां—जिवंत आहे तोंपर्यंत
जीवन—पाणी,
जीवखाणी—जीवयोनी
जीवन्मुक्त—जीवंत असूनही देहादि अभिमान, विषयासक्ति इ० सोडून ज्ञानें करून जो मुक्त तो
जीवीं—मनामध्यें
जोजार—भार, त्रास
जोडी—मिळवितो

ठ

ठाई पडे—ठाऊक पडे, कळे
ठाकेना कळेना

त

तपीळ—तापट
तम—अज्ञान
तत्वतां—खरोखर

तरंग—लहरी

तऱ्हेभरणें—नादीं लागणें, हटास पेटणें

त्याग वैराग्य [ पाताळ

तीन लोक—स्वर्ग मृत्यु आणि

त्रिपुटी—ध्याता, ध्येय आणि ध्यान; ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञान इ० त्रिक अवस्था

तंडणें—वादघालणें

थ

थीत—व्यर्थ.

द

दर्प—गर्व

दंडक—नियम, चाल, रीति

दंभ—ढोंग

द्वंद्व—तंटा, भांडण

द्रव्यभोंदु—लुटारू, ठक

दीर्घ सूचना—दूरदृष्टी

दुराशा—ज्या आशेची सिद्धी होत नाहींत ती, वाईट आशा

दुश्चित्त—बेसावध, मूढ

दुश्चित्तपण—असावधपण, दुर्लक्ष

दृढबुद्धि—दृढनिश्चय

देहबुद्धि—इंद्रियसुखभोगाची लालसा, देह मीच अशी बुद्धि, अहंभाव

दैन्यवाणा—दीनवाणा, बापुडा

द्रोही—द्रोह, द्वेष करणारा

ध

धारणा—बुद्धि

धारिष्ट—धैर्य

धांडोळणें—शोधणें

न

न मनी—न मानी

न वचे—वर्णन करतां येत नाहीं

नागवण—फसवणूक.

नातळे } प्राप्त होत नाहीं.
नातुडे }

नाथिला—खोटा. जो नाहीं तो

निगम—वेद

निदसुरा—झोंपाळू

निदिध्यास—निरंतर चिंतन

निधान—ठेव, द्रव्य

निबुजे—न उमजे

निरय—नरक.

निरंजन—जन्ममरण इत्यादि प्रकारच्या उपाधिरहित परमेश्वर तो

निरूपण—बोध, कथन

निर्भर—पूर्ण

निवळे—प्रकट होते
निवारी—सोडून दे
निवे—संतोष पावे
निववावे—संतोषित करावे
निर्वाणीं—अंतीं, शेवटीं
निवृत्ति—सर्वसंगपरित्यागमार्ग
निसुगपण—निसंगपणा
निस्पृह—निरिच्छ
निःसंदेह—खरोखर, संशयरहित
नेणता—लहान, अजाण
नेमस्त—खरोखर
नुरे—उरत नाहीं

## प

पतित—पापी
पर, पगावा / पारिखा } दुसरा, परका
परम—अत्यंत, फार
परता / परतें } पेक्षां, पलीकडे
परत्रीं—परलोकीं
परिस—पेक्षां
परिस—ज्याच्या स्पर्शानें लोखंडाचें सोनें होतें असा एकप्रकारचा दगड
परी—प्रमाणें, परंतु, प्रकारें
पवाडे—शिरे, पसरे.
पंथ—मार्ग
प्रचीत / प्रतीति / प्रत्यय } अनुभव
प्रतिमा—मूर्ति
प्रबंध—कविता
प्रस्तावला—पश्चात्ताप पावला
पाषांड—पाखांड, नास्तिकपणा
पिंड—शरीर
पिशुन—चहाडखोर
पुण्यश्लोक—पुण्यकारक कीर्तीचे
पुढिलांचे—दुसऱ्यांचे

## फ

फुकाचें—फुकटचें, व्यर्थ
फुंजे—फुगतो

## ब

बद्ध—विषयासक्त, अज्ञानी
बराडी—आशाळभूत, दरिद्री
बहुसाल—पुष्कळ
बहुविध—अनेक प्रकारचा
ब्रह्मांड—सर्वजग, विश्व
बाहे—बोलावतो
बाष्कळ—वायफळ, वाचाळ
ब्रीद—बाणा

बुझे—समजे
बुझावा—जाणावा
बोहरी—राख, नाश

भ

भरीं भरणें—भरीस पडणें, गर्व करणें
भरंगळणें—कष्टणें, भ्रमणें
भरोवरी—भरी पडून
भव—संसार
भार—समुदाय
भाव—श्रद्धा
भूमंडळ—पृथ्वी
भोग—विषयसेवन

म

मंडन—भूषण
महानुभाव—मोठा, श्रेष्ठ
महंत—मोठा, श्रेष्ठ
मा—मग नको
मायिक—खोटा, दांभिक
मुद्रा—चिन्ह
मुमुक्षु—मोक्ष इच्छिणारा
मूढ—दुश्चित्त, मतिमंद,
मैंद—ठक, लुटारू, लुच्चा

य

यथातथ्य—बरोबर, योग्य
याग—यज्ञ
येर—इतर, अन्य
योग—संबंध, संग
योग—प्राणवायूचें निरोधन करून अंतःकरणाची एग्रता करण्याचा मार्ग. जसे भक्ति योग, ज्ञानयोग, कर्मयोग इ०

र

राग— क्रोध, प्रेम.
रिता—रिकामा
रोकडा—तूर्त, खरोखर, सत्य

ल

लटिका—खोटा
लंडी—भित्रा
लाहो—छंद, लाभ
लिंपे—शिवे
लोलंगता—लोलुपता, आसक्ति
लोह— लोखंड

व

वक्ता—उपदेशक
वर्म—गुह्य, तत्व
वयसा—वय, आयुष्य.

वरपंग—वरवर, बाह्यरंगाची
वस्तु—ब्रह्म
वहिलें—लवकर, लगेंच
व्यसनीं—संकटीं
वाउगा—व्यर्थ, अयोग्य
वांच्छा—इच्छा
वाड—पुष्कळ, मोठी
वायां } व्यर्थ
वाव }
वारी—निवारी, नाहींसें करी
वावडे—फिरे
विकल्प—शंका, कुतर्क
विटंबना—फजिती
विचक्षण—शहाणा, ज्ञानी
विरक्ति—वैराग्य
विधि } ब्रह्मदेव
विरंचि }
विरोध—द्वेष
विवेक—विचार
विवरण—स्पष्टीकरण, विवेचन
विवरावा—विचार करावा
विवंचूनि—विचार करून
विहित—योग्य
विषय—काम, क्रोध, लोभ,
इत्यादि षड्विकार
विज्ञान—अनुभवयुक्त ज्ञान,
साक्षात्कार.

वीतरागी—वैराग्यशील
वृक—लांडगा
वृथापुष्ट—आळसी, निरुद्योगी
वेंचणें—खर्चणें
वैखरी—वाणी
वोखटें—वाईट
वोसंडिला—टाकिला
वोळला—मिळाला, वळला,
अनुकूल झाला
वोळंगती—प्राप्त होतात

## श

शाश्वत—चिरकाल टिकणारे
शुचि—शुद्ध, पवित्र
शुचिष्मंत-शुचिर्भूत, पवित्र लोक
श्रुति—वेद
श्लाघ्यवाणें—स्तुत्य
शेखीं—शेवटीं

## स

सगट—सर्व, एकसारखें
संचित—दैव, पूर्व कर्म
संदेह—संशय
सन्निध—जवळ
सन्निपात—रोगी बेशुद्ध होऊन
बरळूं लागतो ती स्थिती

समर्थ—सत्ताधीश, श्रेष्ठ
सरी—तुलना, बरोबरी
सर्वथा—कधींही, सर्व प्रकारें
संवाद—ज्याच्या योगानें समाधान होतें असें भाषण
सहज स्थिति—स्वात्मस्थिति
स्वभावें—सहज
सांग—पूर्ण
साच } खरा.
साचार }
सांड—उपेक्षा, त्याग
साधक—ज्याला कांहीं साध्य करून घ्यावयाचें आहे तो
सायुज्यमुक्ति—ज्या मुक्तीमध्यें ईश्वराचा जीवाशीं योग होतो ती
सायास—श्रम
सावकाश—बराच वेळ, विस्तारपूर्वक
साहणें—सहन करणें
साहेब—धनी
साक्षेप—प्रयत्न, अगत्य
सिणावें—श्रमावें
सिंतरे—फसे, ठके
सिद्ध—पूर्णस्थितीप्रत पावलेले
सुरवाडती—सुखांत निमग्न होतात
सैराट—स्वैर, स्वच्छंदी, ओढाळ
स्वयंभ—स्वयंभू, स्वतःसिद्ध

## ह

हव्यास—हौस, छंद
हिंपुटी—दुःखी, कष्टी
हेवा—अभिलाष करण्याची बुद्धि

## क्ष

क्षोभ—क्रोध, संताप
क्षोभले—संतप्त झाले

११५
ता.

# शुद्धिपत्र.

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १७ | १० | एकातीं | एकांतीं |
| २४ | १५ | धार | धीर |
| ३१ | १८ | दृष्टीं | दृष्टी |
| ३३ | १५ | फोडनि | फोडूनि |
| ३४ | टीप २ | सद्गुरुच | सद्गुरूचें |
| ३५ | १८ | तें | ते |
| ३८ | १ | विशेष | विशेष |
| ३८ | १७ | पावनई | पावन |
| ४० | १० | कार | तदाकार |
| ४१ | ५ | होतीं | होती |
| ४१ | १५ | ह्मणजें | ह्मणजे |
| ४१ | टीप २ | सेकडे | रोकडे |
| ४२ | १ | वाचिलाच | वाचिलेंचि |
| ४२ | १३-१४ | अंतरी, तैसे | अंतरीं, तैसें |
| ४४ | ५ | असाव | असावें |
| ४४ | ११ | नित्यनम | नित्यनेम |
| ४९ | १० | मूर्खाच | मूर्खाचे |
| ५८ | ९ | विचारेंविण | विचारेंविण |
| ५८ | ११-१२ | नय | नये |
| ५८ | १७ | परुषार्थ | पुरुषार्थ |
| ६२ | १९ | .जाणानि | जाणोनि |
| ६४ | ४ | गेल | गेलें |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ६५ | ८ | जेण | जेणें |
| ६५ | १५ | पजा | पूजा |
| ६७ | १७ | शांतिहान | शांतिहीन |
| ६८ | १५ | झालें | झाले |
| ७५ | ९ | कलें | केलें |
| ७६ | ११ | गोष्टा | गोष्टी |
| ७७ | ३ | ... | माने |
| ८४ | १५ | बाल | बोले |
| ८५ | ९ | जाणें | जाणे |
| ९२ | २ | प्रबेळ | प्रबळे |
| ९५ | १८ | तयासाच | तयासीच |
| ९९ | १५ | आदर | आदरें |
| १०९ | ११ | एकें | एके |
| १११ | १६ | सगुणी | सगुणीं |
| ११९ | १ | गिरी | गिरीं |
| १२१ | ७ | नेणें | नेणे |
| १२१ | २३ | असले | असेल |

# याच ग्रंथकाराचीं पुस्तकें.

**वाचन.**—या अत्यंत उपयुक्त विषयावर मराठींत विस्तृत व सर्वमान्य असा हाच निबंध आहे. प्रौढ स्त्रीपुरुषांना व विशेषतः मुलांमुलींना वाचण्यास तो उत्तम असून सर्वमान्य झाल्यामुळें त्याची तिसरी आवृत्ति चालू आहे. त्यांत–( १ ) ज्ञानाची महती ( २ ) ज्ञानार्जनाचीं पांच साधनें ( ३ ) ग्रंथ ( ४ ) वाचनाभिरुचि ( ५ ) वाचावें कसें ? ( ६ ) प्रसिद्ध ग्रंथकार आणि त्यांचें वाचन ( ७ ) स्मरण शक्ति व ती वाढवावी कशी ( ८ ) वाङ्मय ( ९ ) मराठी पुस्तकें व ( १० ) उपसंहार, अशीं १० प्रकरणें असून कै. न्या. रानडे यांच्या मराठी निवडक पुस्तकांच्या यादीसह विस्तृत यादी दिली आहे. मुंबई इलाखा, वऱ्हाड, नागपूर, बडोदें, हैद्राबाद, सांगली इत्यादि सर्व शाळाखात्यांत तो मंजूर झाला असून सरकारी, म्युनसिपल, व खाजगी शाळांतून बक्षिसाकरितां व लायब्ररीकरितां त्याची दरवर्षी मागणी होत आहे. किंमत ५ आणे. व्ही. पी. सह ६ आणे.

**तुकारामाचे निवडक अभंग** अथवा **बालगाथा**—साधुवर्य तुकाराम बुवांच्या अभंग वाणीचा लाभ मुलांमुलींना घडावा व त्यांच्या बोधामृताचें सिंचन त्यांच्या कोंवळ्या मनावर व्हावें, या हेतूनें ही **बालगाथा** तयार केली आहे. मुंबई इलाखा, वऱ्हाड, नागपूर, बडोदें, देशी संस्थानें इ० शाळाखात्यांत ती बक्षिसाकरितां व लायब्ररीकरितां मंजूर झाली आहे. मुलांमुलींच्या धार्मिक व नैतिक शिक्षणास यासारखें उत्तम पुस्तक नाहीं. हींत मातृप्रेम आईबापांची योग्यता, गुरु, अभ्यास, प्रेम, नम्रता, दया, क्षमा, शांति, गर्व, वैर, लाज, पोट, शरीर, आशा, नीति, संगति इ० ३२ विषय असून शिवाय १०० वेचें, चरित्र, स्पष्टीकरण व कोश हीं दिलीं आहेत. तमाम शाळाखात्यांत पुस्तकाचा बक्षिसाकरितां व लायब्ररीकरितां खप होत आहे. किंमत ५ आणे. व्ही. पी. सह ६ आणे.

झावबाची वाडी. चाळ नं. ३८<br>ठाकुरद्वार. मुंबई. पोष्ट नं. २ } **यशवंत महादेव वावीकर.**

REFBK-0000796

REFBK-0000796